
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.

# थंडीचे दिवस



REFBK 0026898
REFBK-0026898

रमेश मंत्री

# थंडीचे दिवस

रमेश मंत्री

REFBK-0026898

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१-क शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

# थंडीचे दिवस

THANDICHE DIVAS

प्रकाशक :
राजीव दत्तात्रय बर्वे, मॅनेजिंग डायरेक्टर
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१-क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

© रमेश मंत्री
'श्रीधर' हनुमान रस्ता,
विलेपार्ले (पू.) मुंबई ४०० ०५७

अक्षरजुळणी :
टाइपो आर्टस्
१४८१ शुक्रवार पेठ, शनिपार-मंडई रस्ता,
पुणे ४११ ००२

मुद्रक :
श्री. गिरीश जोशी
श्रीपाद ऑफसेट
११४/२-अ शिवकृपा, नवी पेठ,
पुणे ४११ ०३०

प्रकाशन क्र. ५५२

I S B N -81-7294-011-4

मुखपृष्ठ :
दिपक संकपाळ

प्रकाशन दिनांक :
३१ जानेवारी १९९३

मूल्य : रुपये साठ मात्र

# थंडीचे दिवस

## श्री. रमेश मंत्री यांची प्रकाशित पुस्तके

विनोद :

१. साखरेची चित्रे
२. वाटाण्याच्या अक्षता
३. खसखशीचा मळा
४. कोल्हापुरी चिवडा
५. साखरपेरणी
६. एक हाती टाळी
७. बायकोचा राग
८. सह्याद्रीची चोरी
९. दहीहंडी
१०. जनू बांडे
११. रुखवत
१२. कागदी वाघ
१३. चोरवाटा
१४. विनोदाचा अमरकोश
१५. ताजा कलम
१६. कोल्ह्याची द्राक्षे
१७. हास्यधारा
१८. थट्टामस्करी
१९. सूर्याची पिल्ले
२०. पळसाला पाने पाच
२१. स्वल्पविराम
२२. हलके-फुलके
२३. आपलेच दात आणि दुसऱ्याचे ओठ
२४. निवडक मंत्री
२५. हसवाहसवी
२६. विनोदी महाराष्ट्र
२७. वाघाचा मुलगा
२८. जॅकपॉट
२९. हास्यपूर्णा
३०. हजार हास्यक्रिया
३१. बायकोवर दात
३२. साप्ताहिकी
३३. हास्यरुचिरा
३४. हेमामालिनीचा हंगामा
३५. मावशी हरवली
३६. तिरकस तिरंदाजी
३७. एलिझाबेथ टेलर आणि मी
३८. गंमत काय झाली
३९. गालावरच्या खळ्या
४०. जपानी आटापिटा
४१. टिवल्या-बावल्या
४२. धूळफेक
४३. हुलकावणी
४४. बारा बायकांचा नवरा
४५. कात्रजचा घाट
४६. आधुनिक महाभारत
४७. टोळभैरवी
४८. चोरांचा सौजन्य सप्ताह
४९. मी मंत्री झालो
५०. थंडीचे दिवस
५१. बायको रिटायर होते
५२. रविवारचं नाटक

५३. पंतप्रधानांची छत्री

## नाटक आणि नाटिका :

५४. वरातीमागून घोडं
५५. करीन ती पश्चिम
५६. नवऱ्याला हवी मैत्रीण
५७. हनिमून झालाच पाहिजे
५८. शहाणीला भेटला दीडशहाणा
५९. चंदेरी
६०. शेजाऱ्यावर प्रेम करा
६१. चटकचांदणी
६२. हासविता धनी
६३. पुरुषांना आवडतात बायका
६४. मृगजळ
६५. लक्षाधीश
६६. ज्ञानाचे इंजेक्शन
६७. विदूषक कॉलेज
६८. लांबनाक्यांचा देश
६९. बोल बोल म्हणता
७०. भोपळे राजा (बालनाट्य)

## विनोदी कादंबरी :

७१. बारा लाखांत जगाची सफर
७२. मुंबई ते बांडुंग
७३. सोलकढीचा सुपरमॅन
७४. धृतराष्ट्र
७५. कलमदानी फटाके
७६. ठकासी व्हावे महाठक
७७. कागदी सिंह

## कादंबरी :

७८. तुमच्या पायी ठेविले मन
७९. महानगर
८०. अक्षर
८१. उत्तरकाल
८२. स्वप्नसुंदरी

## प्रवासवर्णन :

८३. नवरंग
८४. क्षणाचा प्रवासी
८५. सुखाचे दिवस
८६. ओ कलकत्ता
८७. सुखाच्या रात्री
८८. सागरकन्या
८९. बहारीचे दिवस
९०. सूर्यपुत्रांचा देश
९१. तरंगणारे शहर
९२. दिशांतर
९३. उत्तरकांड
९४. सुंदर सातारा
९५. वाळवंटातील वैभव
९६. सोमनाथ ते साबरमती
९७. वैभवाचे दिवस
९८. संगमरवरी प्रदेश

## ललितगद्य :

९९. विझणारी आग
१००. हे अद्भुत जग
१०१. गुजगोष्टी

कथा :

१०२. अखेरची शिकार

प्रबंध :

१०३. वृत्तपत्रव्यसाय

बालवाङ्मय :

१०४. संजीवचा वाढदिवस

१०५. मुलांची जागतिक राजधानी

१०६. एक रुपयाचा हत्ती

१०७. वाघाची फजिती

१०८. हत्तीकाका घरी आले

१०९. मोठी आई

११०. राणीचा बाग

१११. परग्रहाची सफर

# अनुक्रम

बोलक्या ढलप्याचे वाटप / ९
माझी नृत्यसाधना / २१
नृत्यगृहातील गमती-जमती / ३३
लष्करच्या भाकऱ्या / ४७
अति-सुधारक अनौरस मंडळीचे वेगळे जग / ६१
फळांच्या कारखान्यात / ८०
स्मृतींचे त्रिदळ / ९८
'एजन्सी' तील बनेल तरुणी / ११६
खेड्याची ओढ / १३४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ६८८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# एक : बोलक्या ढलप्यांचे वाटप

थ्-थ्-थ् थंडीचे दिवस होते. डिसेंबर महिना. लंडन शहर. गोठलेल्या रात्री आणि बर्फाचे दिवस. सारी दारे बंद करून, शेगडी पेटवून, अंगावर रग घेऊन उबदार अंथरुणात पडून राहण्याचे दिवस. पण मी पहाटे पाच वाजताच उठत होतो आणि नोकरीवर जात होतो. लंडनच्या ' चेल्सी मॅनर ' पोस्ट ऑफिसात मी काही दिवस सॉर्टर म्हणून काम करीत होतो. चेल्सी, ग्लीब स्ट्रीट, चेनी वॉक, या रस्त्यांवर पोस्टमन म्हणून मी काम केले. ' पी.ई.एन. ' या आंतरराष्ट्रीय संघटनेची कचेरी ' ग्लीब प्लेस ' वर आहे. लेखक, संपादक, कवी, इत्यादींची ही जागतिक संघटना. या संघटनेची पत्रे मी वाटीत होतो. ' मॅन ऑफ् लेटर्स ' म्हणून माझा आणि ' पी.ई.एन. ' चा एवढाच संबंध आला आहे. हे लिहिण्याचे कारण एवढेच की, आजकाल आमच्याकडील अनेक लेखक परदेशी जात आहेत. तिथे अनेक परकीय जगविख्यात लेखक, कलावंत, नेते, इत्यादींशी त्यांचा संबंध येतो. त्यांची वर्णने वाचून मला वाटले की, मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय संस्थांचा आणि

आपलाही बादरायण संबंध आहे एवढे तरी जाहीर करावे आणि कृतकृत्य व्हावे !

इंग्लंडमधील टपालखात्यात माझा कसा शिरकाव झाला, ही वास्तविक आश्चर्याची गोष्ट नाही. राष्ट्रकुटुंबातील कोणत्याही विद्यार्थ्याला इंग्लंडमध्ये नाताळच्या सुमारास तीनचार आठवडे पोस्टात नोकरी करता येते. कारण नाताळात इंग्लंडमध्ये नेहमीच्या अनेकपटींनी पत्रे, शुभेच्छा-कार्डे, भेटीदाखल वस्तू वगैरे येत असतात. आणि त्यांचा उरक नेहमीच्या नोकरवर्गाकडून होत नसावा, हे साहजिकच आहे. म्हणून नाताळच्या सुट्टीमध्ये इंग्लंडमधील निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांत 'हंगामी नोकर पाहिजेत', अशा जाहिराती लावल्या जातात. मात्र जाहिरात पाहून अर्ज टाकला की काम झाले, असे होत नाही. आपण ज्या संस्थेत काम करतो, तेथील विद्यार्थी-संघटनेचे (NUS=National Union of Students) कार्ड आणि इंग्लंडमधील 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज' चे कार्ड ही प्रथम घ्यावी लागतात. मग टपालखात्याच्या अर्जावर दोन ओळखी द्याव्या लागतात. या साऱ्या तंत्रातून मी गेल्यावर, डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यातच मला नेमणुकीचे पत्र आले. आमच्या शिक्षण-संस्थेलाही त्या सुमारास नाताळची सुट्टी लागलेली होती. त्यामुळेच मला शक्य तितक्या लवकर कामावर रुजू होता आले.

चेल्सी हा लंडनमधील कलावंतांचा आणि फॅशनेबल लोकांचा भाग आहे. हा भाग म्हणजे लंडनमधले जणू पॅरिसच ! पॅरिसच्या 'नाइट-क्लब' ची आठवण करून देणारे 'चेल्सी पॅलेस' हे 'रेव्ह्यू' चे किंवा पाश्चात्य तमाशाचे थिएटरही येथे आहे. या भागातल्या उपाहारगृहांची एक लोकप्रिय फॅशन म्हणजे, उपाहारगृहात अतिशय थोडा प्रकाश ठेवायचा. आतील सर्व जवळजवळ झाकूनच टाकायचे, किंवा विजेचे सर्व दिवे मालवून नुसत्या चार-सहा मिणमिणत्या मेणबत्त्याच ठेवायच्या. बाकी सर्व उपाहारगृह अद्ययावत् आणि झकपक ! एका बाजूला मंदमधुर संगीत चाललेले असते.

उपाहारगृहात खरोखरीच्या वेली, झुडपे, फुले असतात आणि सर्व वातावरण मोठे काव्यमय असते. अर्थात् अशा ठिकाणी उजेडाचा त्रास होत असावा, हे उघड आहे!

साहित्यिक आणि चित्रकार यांची या भागात उदंड वस्ती आहे. येथील चित्रकार दाढी वाढवून, गबाळे कपडे घालून, आपल्या प्रेयसीच्या कमरेवर हात टाकून या भागात फिरत असतात, आणि 'स्लोन स्क्वेअर' मध्ये चित्रांची विक्री करीत असतात. कार्लाइलसारखे जगप्रसिद्ध लेखक याच भागात रहात होते.

जगातील सर्वात मोठे दुकान याच भागात आहे. आणि 'बॅटर्सी पार्क' हे लंडनमधील सर्वात रमणीय उद्यानही येथेच आहे. अशी मिश्र वसाहत असलेल्या या भागात चित्रकारांच्याविषयी काही फारसा आदर तेथील घरमालकांना दिसला नाही. कारण, एका घरमालकाने आपल्या घरावर पुढील आशयाचा फलक लावलेला होता, –'जागा भाड्याने देणे आहे. फक्त सभ्य माणसांनीच चौकशी करावी. –चित्रकार नकोत.'

मी 'शेफर्डस् बुश' विभागात रहात होतो. तेथून चेल्सी विभाग कमीत कमी पंधरा मैल दूर असावा. पोस्टात काम सुरू करण्याची वेळ सकाळी सहाची होती. कारण साहेब उठून जेव्हा आठच्या सुमारास न्याहारीला बसतो, तेव्हा त्याला आपली ताजी डाक हवी असते. अर्थातच पोस्टाच्या कामाला त्यापूर्वी दोन तास तरी सुरुवात करणे आवश्यक असते. पंधरावीस मैलांवर सहा वाजता पोचायचे, तर साडेचार वाजता तरी उठावे लागे.

साडेचारचा गजर झाला आणि मी डोळे चोळीत जागा झालो. थंडी अगदी कडाक्याची पडली होती. अंगावर तीन पांघरुणे असूनही कुडकुडायला होत होते. एकदा वाटले, कसली नोकरी आणि कसले काय? दोन आठवड्यात पैसा तो काय मिळणार आणि इंग्लंडच्या शिक्षणात त्याचा उपयोग तो काय होणार? अशा थंडीत थिजून जाण्यापेक्षा असेच उबदार अंथरुणात पडून राहावे. पण अशी श्रीमंती चैन करण्यासारखी माझी परिस्थिती

नव्हती. या हंगामी नोकरीत मला दर तासाला सुमारे अडीच रुपये मिळणार होते. सकाळी सहा ते संध्याकाळी चारपर्यंत काम. आठ तासांनंतरच्या कामाचे सव्वापट वेतन. एकंदरीत मला दररोज सुमारे तीस रुपये मिळणार होते. त्याशिवाय जादा काम केले तर अधिक पैसे मिळायचे होते. आणि अर्थातच एवढ्या पैशाला-केवळ थंडीला भिऊन-मुकण्याची माझी तयारी नव्हती.

कसाबसा उठलो. विजेची शेगडी सुरू केली. तिचा परिणाम होऊन खोलीत ऊब येण्यास अर्धा तास तरी लागणार होता. स्टोव्ह पेटवला आणि दाढीसाठी पाणी गरम केले. मग एकदम लक्षात आले की, आदल्या दिवशी रात्री बर्फातून आणि पावसातून यावे लागल्याने बूट भिजून चिंब झाले होते, ते अद्याप ओलेच होते. त्यावेळी माझ्याकडे बुटाची एकच जोडी होती. बूट घालून दिवसभर हिंडले, तर त्या कडाक्याच्या थंडीत आजारी पडण्याची शक्यता होती; आणि अल्पावधीत बूट वाळवण्याची तर काही सोय नव्हती. म्हणून मी दीड शहाण्यासारखे स्टोव्हवर बूट ठेवले. आणि दाढी केल्यावर माझ्या लक्षात आले की, बुटांचे तळ जवळजवळ जळून गेले आहेत!

आता तेच बूट घालून जाण्यावाचून गत्यंतर नव्हते. आमच्या घराजवळच भुयारी आगगाडीचे स्टेशन होते. तेथून सेंट्रल रेल्वेने दोन स्टेशने जायचे आणि मग डिस्ट्रिक्ट रेल्वेने साउथ-केन्सिंग्टनला उतरून चेल्सी मॅनर पोस्टाकडे जाता येते. लंडनच्या भुयारी गाड्या पहाटे पाचच्या सुमाराला सुरू होतात. ही आगगाडी चाळीस ते साठ फूट रस्त्याखाली असल्याने त्या स्टेशनवर किंवा गाडीत मात्र थंडीचा फारसा उपद्रव होत नव्हता. गाडीत फारच थोडे प्रवासी होते. साउथ-केन्सिंग्टन स्टेशनबाहेर आलो तेव्हा परत गार वारे आणि थिजवणारी थंडी बोचकारे घेऊ लागली. तुरळक बर्फ पडत होते. रस्ता अगदी निर्जन होता. स्टेशनजवळच्या मोठमोठ्या फलकांवर चित्रपटांच्या जाहिराती लावलेल्या होत्या. एखाद्या इंग्रजी

डिटेक्टिव्ह चित्रपटात असावे, तसे वातावरण उत्सुकतेने- आणि तरीही भीतीच्या शिडकाव्याने भरलेले होते.

टपाल-खात्याचे नेमणुकीचे पत्र घेऊन मी सहा वाजण्यापूर्वीच चेल्सी मॅनर पोस्टात शिरलो. तेथे माझ्यासारखेच पंधरा वीस विद्यार्थी जमलेले पाहून बरे वाटले. पण कामाला लागण्यापूर्वी गरमगरम चहा घेण्याची उत्सुकता होती, ती मात्र तशीच राहिली. कारण, लंडनमधील उपाहारगृहे सकाळी नऊ वाजण्यापूर्वी सर्वसाधारणपणे उघडतच नाहीत. आपल्याकडे पहाटेपासूनच उपाहारगृहे सुरू होत असल्यामुळे, थंडीच्या दिवसातही चहा न मिळणे किती दु:खदायक असेल याची कल्पना येणार नाही.

पोस्टातील अधिकाऱ्यांनी प्रथम आम्हाला आमच्या कामाची कल्पना दिली. पत्रांचे ' सॉर्टिंग ' करणे हे आमचे काम होते. इंग्लंडच्या पोस्टातली कामाची आखणी इतकी रेखीव आहे की, सॉर्टर आणि पोस्टमन या दोघांचेही काम अगदी सोपे होते. पत्रांचे वर्गीकरण (सॉर्टिंग) करताना, पत्र कोणाचे आहे हे नाव वाचण्याची काहीच आवश्यकता नसते. फक्त घरांचे क्रमांक पाहून त्याप्रमाणे पत्रांचे वर्गीकरण करावयाचे असते. एका घरात कितीही बिऱ्हाडे असली तरी त्या सर्वांची पत्रे एकत्रच ठेवली जातात. आणि मग पोस्टमन ही सर्व पत्रे त्या घराच्या एकाच पेटीत टाकतो. अर्थातच जेथे स्वतंत्र ब्लॉक्सची पद्धत असते, तेथे प्रत्येक ब्लॉकची पत्रे वेगळी ठेवावी लागतात. इंग्लंडमध्ये पत्रांचे वर्गीकरण अगदी सुलभ होण्याचे आणखी एक कारण असे की, घरांचे सर्व विषम क्रमांक रस्त्याच्या एका बाजूला असतात. आणि सर्व सम क्रमांक दुसऱ्या बाजूला असतात. उदाहरणार्थ :

१ ३ ५ ७ ९ ११ १३ १५ १७ ↓

२ ४ ६ ८ १० १२ १४ १६ १८

पत्रांचे वर्गीकरण करताना पुढीलप्रमाणे सर्व पत्रे लावली जातात:

१, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, १७, १८, १६, १४, १२, १०, ८, ६, ४, २. म्हणजे पोस्टमन एकदा एका बाजूने निघाला, की सरळ

रस्त्याच्या टोकापर्यंत जातो, आणि मग दुसऱ्या बाजूने उलट येतो त्यामुळे त्याचेही काम अगदी सहज अल्पावधीत होते.

अर्थातच पोस्टाचे कामकाज कसे चालवावे याचा हा वस्तुपाठ नाही पण मी पाहिलेली एक सुलभ पद्धत सांगितली, एवढेच. घरातील अनेक बिऱ्हाडांची पत्रे एकाच पेटीत ठेवण्यात एक गोष्ट गृहीत धरलेली आहे. ती म्हणजे, एका बिऱ्हाडाची पत्रे दुसऱ्या बिऱ्हाडातील लोक घेणार नाहीत किंवा वाचणार नाहीत. दुसरे असे की, इंग्लंडमधील थंड हवेमुळे सर्व घरांचे मुख्य दरवाजे बंद ठेवावे लागतात. तेव्हा प्रत्येक वेळी घंटा वाजवून पोस्टमनला दार उघडण्याची आवश्यकता वाटू नये, म्हणून मुख्य दरवाज्यालाच एक फट ठेवून आत पत्रांची पेटी ठेवलेली असते. रजिस्टर्ड पत्रे किंवा पार्सले अशा रीतीने टाकता येत नाहीत हे खरे, पण इंग्लंडमध्ये ज्याच्या नावावर रजिस्टर आले असेल त्याच्या इमारतीतील कोणीही सही करून ती रजिस्टर वस्तू अगर पत्र घेतले तरी चालते.

सकाळी साडेसातच्या सुमारास पोस्टमन पत्रांचा बटवडा करण्यासाठी बाहेर पडले. त्यापूर्वी दहा मिनिटे चहाची सुट्टी झाली. चहाचे कॅन्टीन पोस्टानेच चालविलेले होते. इतरत्र कोठेही न पाहायला मिळालेली एक गोष्ट तेथे दिसली. ती म्हणजे, चहाचे कप किंवा 'जग्' ज्याचा त्यानेच आणायचा. अनेकांनी भलेमोठे काचेचे जग् किंवा पेले आणले होते. तेव्हा चौकशी करता मला असे कळले की, त्या कॅन्टीनला सरकारी मदत असल्याने तेथे फक्त दोन पेनीला पेलाभर चहा मिळतो. मग पेल्याचा आकार कितीही मोठा असला, तरी किंमत मात्र दोनच पेनी ! या सवलतीचा फायदा घेण्यासाठी अनेकांनी सहासहा कप चहा मावेल असे बीअरचे मोठे जग्ही आणले होते. चहाप्रमाणेच इतर खाद्यपदार्थही त्या उपाहारगृहात अगदी नाममात्र किंमतीला मिळत असत.

त्यावेळी आमच्याबरोबर तीसपस्तीस विद्यार्थी काम करीत होते. त्यांपैकी सुमारे पंधरा मुली होत्या. स्कॉच, भारतीय, आयरिश, इंग्लिश,

पाकिस्तानी, वेस्ट इंडियन-अशा अनेक देशांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी काम करीत. कोणी पोस्टाचे काम संपल्यानंतर केव्हा तरी फिरायला जाताना किंवा नर्म प्रणय करताना दिसत. पण सर्वचजण आर्थिक टंचाईमुळे काम करीत होते. प्रणयाची बादशाही वाटचाल आणि आर्थिक टंचाईची परवड यांचे एकंदरीत जमणे कठीणच. ज्यूडिथ सदरलंड नावाची स्कॉटलंडची एक मुलगी मला अजून आठवते. ती चांगली उंचनिच, सुंदर, रेखीव होती. पण प्रतिकूल परिस्थितीमुळे असेल, किंवा स्कॉच लोकांच्या परंपरागत चिक्कूपणामुळे असेल, तिचे कपडे अगदी जुने, जवळजवळ फाटलेलेच असत. इंग्लंडमध्ये स्त्रिया नायलॉनचे अगदी पातळ स्टॉकिंग्ज घालतात. हे स्टॉकिंग्ज अगदी अंगाला चिकटून राहणारे पारदर्शक आणि कातडीच्या रंगाचेच असतात. पण ही ज्यूडिथ काही ते स्टॉकिंग्ज घालीत नसे. ती लिपस्टिकही लावीत नसे. तिच्या या साधेपणाला किंवा चिकटपणाला बाकीच्या मुली हसत. पोस्टात काम करताना इमारतीत सिगारेट ओढण्याची मनाई होती. (उपाहारगृह हे अर्थातच अपवाद होते.) पण कुणी दिलीच, तर ज्यूडिथ काम करता करता हळूच चोरून सिगारेट ओढी आणि अधिकारी जवळपास आला, की पत्राच्या खणात सिगारेट लपवून ठेवी. एकदा जेवणाच्या वेळी ती माझ्या टेबलाजवळ बसली होती. जेवण झाल्यावर ती पत्र लिहू लागली. मी सहज म्हटले, "कोणाला?" ती म्हणाली, "माझ्या प्रियकराला." तिने पत्राचा काही भाग मला दाखविला. त्याची सुरुवात अशी होती, – 'My Christopher,...' पत्र लिहिण्याचा तो मायना दीर्घकाळ माझ्या लक्षात राहिला. 'My dear ' या नेहमीच्या मायन्यातील फक्त एकच शब्द तिने गाळला होता, पण त्यामुळे त्या मायन्याला एक नवी जवळीक आली होती.

चार पाच दिवस पोस्टात सॉर्टर म्हणून काम केल्यावर मला इमारतीत बसून काम करण्याचा कंटाळा आला. मी ज्या पत्रांचे वर्गीकरण करीत असे, ती पत्रे वाटणारा पोस्टमन-जॉन ब्रिग्ज-माझा मित्र झाला होता. त्याला

मी म्हटले की, हे काम काही त्रासाचे नाही, पण कंटाळवाणे आहे. तो म्हणाला, "माझ्याबरोबर बाहेरच्या ड्यूटीवर तुला यायचं आहे का?" मी आनंदाने रुकार दिला. त्याबरोबर त्याने पोस्टमास्तरांना सांगून माझी हंगामी पोस्टमन म्हणून बदली करविली, आणि दुसऱ्याच दिवसापासून मी जॉन ब्रिग्जबरोबर पत्रे वाटण्यासाठी जाऊ लागलो.

सकाळी साडेसातचा सुमार होता. ब्रॉग्टन रस्त्यावर मी पत्रे वाटीत होतो. वेळ मोठी उत्साहाची होती. थंडी होती, पण ती सुखद होती. या रस्त्याजवळच एक प्राथमिक शाळा होती, आणि शाळेतील पाचसहा वर्षांची मुले तुरुतुरु रस्ता ओलांडीत होती. मुलांनी सुरक्षितपणे रस्ता ओलांडावा म्हणून एक महिला-पोलीस त्या जागी ठेवण्यात आलेली होती. ती वाहने थांबवून मुलांना जाऊ द्यायची. पस्तीशीच्या सुमाराची ती प्रसन्न पोलीस-महिला पाहून मला मोठे कौतुक वाटले. इतक्यात तिचेही माझ्याकडे लक्ष गेले. "गुड मॉर्निंग, पोस्टमन." ती हसून म्हणाली आणि उलट अभिवादन केले. एव्हाना सर्व मुलांनी रस्ता ओलांडला होता. ती महिला-पोलीस माझ्याजवळ येऊन म्हणाली, "एकोणचाळीस नंबरच्या मिसेस् हॉवेल यांचं काही पत्र आहे का?" मला किंचित आश्चर्य वाटले. कारण इंग्लंडमध्ये अशी कोणी इतरांची चौकशी करीत नाही. तरी पण मी माझ्या हातातली पत्रे चाळीत म्हटले, "हो. एक पत्र आणि एक बुकपोस्टचं कार्ड आहे." त्यावर ती म्हणाली, "छान! हे पहा, तिची पत्रं पेटीत टाकू नका हं. कृपा करून घंटा वाजवा आणि तिला बाहेर बोलावून घ्या. आणि ती बाहेर आली की, तिला हॅपी बर्थ-डे टु यू म्हणा. कारण आज तिचा वाढदिवस आहे." मी तिचे आभार मानले आणि हसून संमती दिली. मला मोठी गंमत वाटली. तिचे सौजन्य, जिव्हाळा, दुसऱ्याच्या जीवनात लहान का होईना, पण आनंदाचा कवडसा पाडण्याची धडपड, याचे मला कौतुक वाटले. मी एकोणचाळीस नंबरच्या घराची घंटा दाबली, आणि दार उघडायला आलेल्या पन्नाशीच्या बाईला विचारले,

" गुड मॉर्निंग. आपणच मिसेस् हॉवेल काय ? " तिने " होय " म्हटल्यावर मी तिच्या वाढदिवसाबद्दल तिचे अभिनंदन केले. त्यावेळी तिच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले, आणि कोठल्यातरी दूरच्या देशाच्या अनोळखी माणसाने आपल्या वाढदिवसाची चौकशी करून आपले अभिनंदन करावे याबद्दल तिच्या डोळ्यात कृतज्ञतेचे पाणीही तरारले. ती भारावलेल्या अंत:करणाने म्हणाली, " थँक्यू ! थँक्यू, यंग मॅन ! प्लीज्, वेट फॉर ए मिनिट. " (" मी फारच आभारी आहे तुमची. थोडा वेळ थांबा हं. ") आणि तिने आत जाऊन पसाभर चॉकलेट्स् आणून माझ्या ओंजळीत घातली ! मला वाटते, त्या महिला पोलिसाचा तो निर्हेतुक चांगुलपणा आणि त्या बाईची कृतज्ञता हीच खरी इंग्लंडमधील प्रेक्षणीय स्थळे. कारण अशा लहानसहान गोष्टीत त्या देशाची परंपरा आणि एकमेकांविषयीचा आदर ही दिसतात, तशी इंग्लंडच्या इतिहासाच्या आणि भूगोलाच्या रुक्ष पानांच्या चळथीत ती दिसणार नाहीत.

माझ्या बटवड्याच्या भागात काही वृद्ध इंग्रज मला अनेकवार भेटत. इंग्रज माणूस सहसा परकीयांशी आपण होऊन बोलत नाही. पण पोस्टमन हा त्याला अपवाद आहे की काय न कळे. कारण या चारपाच वृद्ध लोकांपैकी कोणीही मला रस्त्यात दिसला की, तो मला सहास्य मुद्रेने सल्ला देई, " ही पत्रं नेऊन द्यायचा त्रास तुम्ही स्वत: कशाला घेता राव ? पोस्टात टाका म्हणजे झालं ? " त्यांनी इमानेइतबारे केलेल्या या विनोदाला मीही तितक्याच कर्तव्याच्या जाणिवेने हसून प्रतिसाद देत असे.

संध्याकाळी चारचा सुमार होता. ग्लीब स्ट्रीटवर जॉन आणि मी पत्रे वाटीत होतो. रस्त्याच्या एका कडेला मी होतो आणि दुसऱ्या कडेने तो पत्रे टाकीत होता. मधेच तो एका घरापाशी थांबला आणि मग थोडा वेळ पुढे जाऊन त्याने मला हाक मारली. मी त्याच्याजवळ जाऊन विचारले, तेव्हा तो म्हणाला, " त्या घराच्या पेटीत हे पत्र टाक आणि जाता जाता काही दिसलं तर मला सांग. " मी आपला सरळपणे ते पत्र घेऊन निघालो.

त्या घराला तळघर होते. त्यामुळे तळघराच्या खिडक्यांच्या काचा रस्त्याच्या पातळीबरोबरच होत्या. जाता जाता मी पाहिले, तो एक तरुण आणि एक तरुणी प्रेमाराधनात मशगुल झाली होती. त्याने तिला मांडीवर घेतले होते आणि तिने मोठ्या प्रेमभराने त्याच्या गळ्यात हात घातले होते. चुंबनांच्या त्या समाधीतच तिचे माझ्याकडे लक्ष गेले, पण ती लाजली नाही. मग त्यानेही माझ्याकडे वळून पाहिले. तोही लाजला नाही. तेव्हा अखेर मीच लाजून बाजूला गेलो आणि हळूच पत्र पेटीत टाकले. सुमारे पंधरा-वीस मिनिटांनी आम्ही दोघे त्या रस्त्याने परत येत होतो, त्यावेळीही हेच दृश्य दिसले!

चेनी वॉक या रस्त्यावरून आम्ही जात होतो. जॉन म्हणाला, " या पंचेचाळीस नंबरच्या घरात एक पोलिश तरुणी आहे. चल, मी तुझी आणि तिची ओळख करून देतो. " मी संकोचाने म्हटले, " छे: छे: ! कशाला ? मी तर या भागात अगदी थोड्याच दिवसांसाठी येणार आहे. " त्यावर तो म्हणाला, " तुमच्यासाठीच नव्हे. तिच्यासाठीही मी ओळख करून देणार आहे. मागच्या युद्धात पोलंडमध्ये तिच्या घराण्यापैकी ती एकटीच जिवंत राहिली. बाकीचे सर्व लोक मारले गेले. त्यामुळे ती पोलंडमधून पळून आली. आणि आता इतकी वर्षे झाली, तरी त्या भयंकर आठवणींनी ती अनेकदा व्याकुळ होते. नवीननवीन लोकांना भेटण्यात आणि त्यांच्याशी मैत्री करण्यात तिला आनंद वाटतो. "

त्याने घंटा दाबली, तेव्हा निळ्या वेषातील विशीच्या सुमाराची एक मोहक तरुणी बाहेर आली. तिच्या सहास्य मुद्रेमागेही अपार दु:खाची झाक दिसत होती. जॉनने माझी ओळख करून देताच ती म्हणाली, ' इंडियन ? आय् लव्ह हिम ! ' पहिल्याच ओळखीत असे म्हणणारी मुलगी आयुष्यात मी प्रथमच पाहिली. आणि नंतर दुसऱ्याच क्षणी माझ्या लक्षात आले की, हिंदुस्थानात काहीकाही शब्दांचे विशिष्ट अर्थ आपल्या मनात इतके रुजलेले असतात की, त्या शब्दांना त्याविना काही दुसरा अर्थ असतो

याची आपल्याला कल्पना असत नाही. तिचा तो शब्दप्रयोग म्हणजे केवळ एक उपचार, सौजन्याचे एक निदर्शक वाक्य होते. पण 'आय् लव्ह हिम' या वाक्याचा आमच्याकडे होणारा अर्थच माझ्या मनात अभिप्रेत असल्याने पहिल्या क्षणी तरी मी चमकलो, हे मात्र खरे.

त्यानंतर दोनतीन दिवसांचीच गोष्ट. संध्याकाळी सात वाजता आमचे काम संपले. आमच्या पोस्टाजवळच 'चेल्सी पॅलेस' हे तमाशाचे थिएटर होते. पोस्टातून परत येता येता मी बाहेरच्या खिडक्यांतील चित्रे पाहू लागलो, तो 'युरोपमधील सर्वांत सुंदर तरुणी' म्हणून कोणा 'इरिस' नावाच्या मदमस्त स्त्रीची अर्धनग्नावस्थेतील छायाचित्रे तिथे लावली होती. कंपनी दुसऱ्या दिवशीच परगावी जाणार होती आणि त्या रात्रीचा खेळ शेवटचा होता. मला दुसऱ्या दिवशी पहाटे उठायचे होते. पण युरोपमधील सर्वोत्तम प्रमदेला पाहण्याचा मोहही आवरेना. जवळच्याच हॉटेलात जेवलो आणि तमाशाला गेलो. इरिसचे लावण्य अप्रतिम होते यात शंका नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटे मी कसाबसा उठलो आणि धावतपळत वेळेवर पोस्टात हजर झालो. प्रत्येक नोकरावर तिथे संपूर्ण विश्वास टाकला जात होता आणि प्रत्येकाने आपली हजर होण्याची व परत जाण्याची वेळ स्वत:च लिहायची होती. तशी मी हजेरी लिहिली आणि पत्रे वाटण्याच्या माझ्या जागेवर गेलो. पाहतो तो जॉन त्या दिवशी दुसऱ्या कामावर नेमला गेला होता आणि त्याच्याऐवजी दुसराच कोणी पोस्टमन तिथे होता. त्याने मला सांगितले, "चहा घेऊन आल्यावर मग कामाला सुरुवात केलीत तरी चालेल." मी कॅन्टीनमध्ये चहासाठी गेलो. चहा घेतला आणि तिथेच भिंतीला जरा टेकलो. रात्रीच्या जागरणाने मला न कळतच झोप लागली, आणि जागा झालो तेव्हा चांगला अर्धा तास होऊन गेला होता. मी चटकन् खाली आलो आणि दिलगिरीपूर्वक म्हणालो, "चहा घ्यायला गेलो होतो." त्यावर तो नवीन पोस्टमन एवढेच म्हणाला, "यू ड्रिंक ए लॉट ऑफ टी!" ("बराच चहा फस्त केलेला दिसतोय्!") ब्रिटिश माणूस

आमच्यासारखा रागावून ताडताड कधीच बोलत नाही. आपली नापसंती तो अशा काही मोजक्याच, पण तिरकस शब्दात व्यक्त करतो, की समजदार माणसाला तेवढा टोमणा पुरेसा व्हावा.

पोस्टातील माझ्या या पंधरा दिवसांच्या नोकरीत, मला त्या इमारतीबद्दल, माझ्या सहकाऱ्यांबद्दल आणि त्या वातावरणाबद्दल मोठी आपुलकी वाटू लागली. पण इतर अनेक स्नेहबंधनांप्रमाणेच वेळ येताच हीही बंधने दूर करावी लागली आणि मी पुन्हा पूर्वीच्या दैनंदिन जीवनाकडे वळलो.

◇ ◇ ◇ ◇

# दोन : माझी नृत्यसाधना !

आकाश नितळ होते. टिपूर चांदणे पडले होते. आमची बोट अरबी समुद्रातून जात होती. रात्री नऊचा सुमार असावा. मी आणि माझे मित्र बोटीच्या बारमध्ये गप्पा मारीत बसलो होतो. तेवढ्यात बँडचे आर्त स्वर कानावर आले. डेकवर पाश्चात्य पद्धतीचे नृत्य चालले होते.

आम्ही धडघडत्या अंत:करणाने डेकवर गेलो. अनेक वेळा मी इंग्रजी चित्रपटात 'बॉल डान्स' पाहिला होता, पण खरोखरीचे असले नृत्य पाहण्याची ही माझी पहिलीच खेप होती. एखादे निर्बंधित चित्र लहान मुलांनी चोरून पाहावे, तसे मी भीतभीत, लांब उभा राहून ते नृत्य पाहत होतो. त्या चांदण्या रात्री 'तेनेसी वॉल्ट्झ्' ने माझ्या मनात जे घर केले ते आता मला जवळजवळ चिरस्थायी वाटू लागले आहे. त्या रात्री अकरा वाजेपर्यंत आम्ही ते नृत्य पाहिले. बोटीवर माझ्या ओळखीचें अनेक ऑस्ट्रेलियन आणि इंग्रज स्त्री-पुरुष त्यावेळी आनंदाने नाचत होते. त्यांचा मला हेवा वाटला. आपणही नृत्य शिकावे आणि करमणुकीच्या या नव्या

प्रकाराचा मनमुराद आस्वाद घ्यावा, असे मला वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी जॉइस लुई नावाच्या एका ऑस्ट्रेलियन बाईला मी विचारले, "इंग्लंडमध्ये गेल्यावर नृत्य केलंच पाहिजे, अशी त्या लोकांची अपेक्षा असते का ?"

ती म्हणाली, "तशी अपेक्षा असतेच असं नव्हे, पण इंग्लंडच्या सामाजिक जीवनाची चांगली ओळख होण्यासाठी नृत्याची फार मोठी मदत होते. नव्या ओळखी जोडण्यासाठी आणि वाढवण्यासाठी नृत्यगृहासारखं ठिकाण नाही. मला वाटतं, तुम्ही इंग्लंडला गेल्याबरोबर नृत्य शिकायला सुरुवात करावी."

इंग्लंडमध्ये दोनतीन वर्षे राहिलेल्या माझ्या एका मित्रानेही सांगितले की, पाश्चात्य पद्धतीचे नृत्य आल्याशिवाय इंग्लंडमधील वास्तव्याचा पुरेपूर उपयोग करून घेता येणार नाही. मीही या पडत्या फळाच्या आज्ञेची वाटच पाहत होतो.

पण नृत्य शिकण्याचा निश्चय करणे आणि खरोखरच ते शिकणे यात महदंतर आहे असे मात्र मला प्रत्यक्ष अनुभवाने जाणवू लागले. कारण मी लंडनमधील एका वृत्तपत्रातील जाहिरात वाचून 'लंडन स्कूल ऑफ डान्सिंग' या ऑक्स्फर्ड स्ट्रीटवरील सुप्रसिद्ध नृत्यशाळेत गेलो. ही शाळा तळघरात आहे. तिचे बंद दार उघडावे की न उघडावे, या विचारातच माझी दहा मिनिटे गेली. अखेर मनाचा धडा करून मी दार ढकलले.- पण आतील वातावरण पाहून मला एकदम बुजल्यासारखे झाले. तिथल्या मुली अतिशय सुंदर होत्या. अशा अर्धवस्त्र, देखण्या, यौवनप्रमत्त ललनांच्या कमरांभोवती हातांचा विळखा घालून सर्वांसमक्ष नाचायचे? छे: छे: ! काहीतरीच !

"गुड इव्हिनिंग सर, व्हॉट कॅन आय डू फॉर यू?" ("नमस्ते, मी आपली काय सेवा करू ?") एका विनयशील इंग्रजाने सस्मित मुद्रेने मला विचारले. त्याचे कपडे इतके परीटघडीचे आणि उंची होते की, मला

अगदीच गबाळ्यासारखे वाटू लागले. मी चाचरत सांगू लागलो, “ मला-मला-नृत्य शिकायचं आहे. ”

उपाहारगृहातील वेटरने फराळाच्या मालाची यादी सांगावी तसे त्याने पटापट सांगितले, ‘ अर्धा तासाला दहा शिलिंग. ग्रामोफोन-रेकॉर्डवर नृत्य शिकवलं जाईल, तज्ज्ञ मुली शिकवतील. प्रॅक्टिससाठी कमी दर. सकाळी दहापासून रात्री नऊपर्यंत केव्हाही या. सात धड्यांचे एकदम पैसे भरले तर पाच शिलिंग सवलत. हे माहितीपत्रक घ्या. यू आर वेलकम्! ”

त्याने माझ्या स्वागताची भाषा केली, तरी त्या एकंदर उंची वातावरणात मला अगदीच ओशाळल्यागत वाटू लागले. आणि “ थँक्यू! पुन्हा येईन केव्हातरी ”- असे पुटपुटत मी परतलो. या नृत्यशाळेत दहाबारा तरुणी आणि सातआठ तरुण होते, पण ते सारे गौरकाय होते. भारतीय, सिलोनी किंवा अशा पौर्वात्य देशांचे तेथे कोणीही नव्हते. त्यामुळे मला अधिकच भीड वाटली होती, हे काही खोटे नाही. म्हणून मी त्या ‘ लंडन स्कूल ऑफ डान्सिंग ’कडे पुन्हा कधीच वळलो नाही.

आमची वृत्तपत्र-व्यवसायाची शाळा सुरू झाली, आणि त्याच वेळी नृत्यांच्या जाहिराती फलकांवर झळकू लागल्या. वर्गातल्या मुली नृत्याविषयी बोलू लागल्या, आणि मित्रही मला विचारू लागले, “ गेल्या शनिवारी तुम्ही नृत्याला कुठे गेला होता ? ” नृत्यगृहातील संगीतमय, रोमांचकारक, तरल वातावरणाची वर्णने मित्रांकडून ऐकू येऊ लागली, आणि वसंत ऋतू झाल्याच्या घोषणा वृत्तपत्रात दिमाखाने दिसू लागल्या. तेव्हा मी ‘फिरून यत्न ’ करून पाहण्याचे ठरविले. माझ्या एका मित्राने सांगितले की, ‘ नृत्य शिकताना प्रथमप्रथम लाजल्यासारखे वाटते हे खरे, पण त्यावर एक उपाय म्हणजे नृत्यगृहात जाऊन नाच पाहत बसणे. दोनतीन वेळा गेल्यावर ओळखी होतात, भीड चेपते, आणि एखाद्या तरुणीचा हात आपल्या खांद्यावर आला, तर झुरळ आल्यासारखे हुळहुळायचे काहीच कारण पडत नाही. ’

बेकर स्ट्रीटजवळ ‘ ऑल नेशन्स क्लब ’ या नावाचा एक क्लब

आहे. तेथे भारतीय, पाकिस्तानी आणि आफ्रिकन लोक येतात, असे मला कळले. तेव्हा त्याच क्लबात जाऊन प्रथम नुसते नृत्य पाहावे असे मी ठरवले. त्या क्लबमध्ये एका वेळी तीन शिलिंग पडत. प्रत्यक्ष नृत्य शिकण्यास सुरुवात करण्यापूर्वी तीनचार वेळा तरी मी या क्लबात गेलो. नृत्यगृहात जायचे तर इव्हिनिंग-ड्रेस निदान काळा सूट तरी पाहिजे होता. पण हिंदुस्थानात आम्हाला याची कल्पना नसल्याने मी काही तसा सूट शिवला नव्हता. मात्र कोणाच्या तरी सल्ल्याने भारताचा राष्ट्रीय वेश म्हणून मी लांब काळा कोट शिवून घेतला होता, तो अडकवून मी 'ऑल नेशन्स क्लब' मध्ये गेलो. तेथे गेल्यावर मला जरा मोकळे वाटले. कारण तेथे येणारे बहुतेक स्त्री-पुरुष मध्यमवर्गीय दिसले. नृत्यगृहात येणाऱ्या प्रत्येकाने नाचलेच पाहिजे असे नाही. हॉलच्या कडेने खुर्च्या व टेबले ठेवलेली असतात तेथे बसून नृत्य पाहिले तरी चालते. दोनतीन नृत्ये झाल्यावर पाचसहा मिनिटे विश्रांती होते आणि मग साहजिकच या खुर्च्या भरून जातात. अशा पहिल्याच विश्रांतीच्या वेळी माझ्याजवळ एक तरुणी बसली. शिष्टाचार म्हणून मी सिगारेट पुढे केली. ती घेऊन तिने विचारले, "तुम्ही धर्मोपदेशक (प्रीस्ट) आहात काय"?

"नाही बुवा!" मी आश्चर्य व्यक्त करीत उत्तरलो.

"तुम्ही लांब काळा कोट घातला आहे, त्यावरून मला वाटलं की तुम्ही धर्मोपदेशकच आहात." तिने स्पष्टीकरण केले. त्या राष्ट्रीय वेषामुळे मी ख्रिश्चन धर्मोपदेशक म्हणून मानला जाईन, अशी कल्पनासुद्धा माझ्या मनात आली नव्हती. पण त्या मुलीने ती कल्पना स्पष्टपणे बोलून दाखविताच मी ठरविले, की उगीच आता काटकसरीच्या मागे लागण्यात अर्थ नाही. नृत्य हवे, तर काळा सूटही हवाच!

"तुम्ही इथं नेहमी येता का?" मी विचारले.

"होय. मला हा क्लब फार आवडतो. छोटासाच, पण छान आहे." ती कौतुक करीत म्हणाली.

त्यावेळी मला कल्पना नव्हती, पण नंतर मला समजले, ही आवड-निवड सारी थाप होती. अशा क्लबमध्ये दहापंधरा मुली तरी रोज पैसे देऊन ठेवाव्या लागतात, त्याशिवाय मुले येत नाहीत. कारण प्रत्येक मुलाला नाचण्यासाठी आपली मैत्रीण आणता येईलच असे नाही. काहीजण मैत्रिणींना घेऊन येत हे खरे, पण बहुतेकजण तेथेच मैत्रीण मिळेल या अपेक्षेने येत, ही वस्तुस्थिती आहे. लंडनप्रमाणेच भारतातही दिल्ली, मुंबई इत्यादी शहरातील पाश्चात्य पद्धतीच्या नृत्यगृहात अशा पगारी नर्तिका ठेवण्याची प्रथा पडली आहे.

'ऑल नेशन्स क्लब' मध्ये मी तीनचार वेळा गेलो, पण स्वत: नृत्य केले नाही. मात्र तेथे गेल्यामुळे मला नाचण्याचा मोठा बाऊ वाटेनासा झाला हे मात्र खरे. म्हणून मी लौकरच हॅमरस्मिथ विभागातील 'हॅमरस्मिथ पॅलेस' या अवाढव्य नृत्यगृहातील शाळेत नाव घालण्याचे ठरवले. तेथे अर्ध्या तासाला सात शिलिंग फी होती.

एका सायंकाळी मी माझा नवा काळा सूट घालून या नृत्यगृहाकडे गेलो. 'हॅमरस्मिथ पॅलेस' हे प्रचंड नृत्यगृह आहे. 'Britain's largest and smartest dance rendezvous'- अशी त्याची जाहिरात करण्यात येते. एखाद्या वैभवशाली राजवाड्याच्या मुख्य दिवाणखान्याप्रमाणे हे नृत्यगृह भव्य आणि झगमगाटाचे आहे. आत शिरल्याबरोबर तिकिटे देण्याच्या खिडकीसारखी एक खिडकी होती. तेथे चौकशी केली. तेथील गृहस्थाने 'लंडन स्कूल ऑफ डान्सिंग' च्या माणसाप्रमाणे नृत्यांचे सर्व दर आणि माहितीपत्रक दिले. मी एक पौण्ड दिला आणि तीन धड्यांचा पास घेतला. त्याने मला सोयीची वेळ विचारली आणि नृत्यशिक्षिकांच्या वेळापत्रकात पाहून सांगितले, "ठीक आहे. सोमवारी संध्याकाळी पाच वाजता या."

त्याप्रमाणे मी सोमवारी संध्याकाळी गेलो. तेथे त्याने मरियम स्टुमे नावाच्या शिक्षिकेची ओळख करून दिली. तिने मला नृत्यगृहात नेले. तिचे वय असेल साधारण पंचविशीपर्यंतचे. ती सुंदर होतीच, पण तिने

‘ स्ट्रॅपलेस ’ फ्रॉक घातला होता. या फ्रॉकला हात नसतात आणि तो छातीवर घट्ट बसतो. गळ्याखाली तो स्तनांच्या सुरुवातीच्या उभार भागावर रबराच्या साहाय्याने चिकटून बसला होता. अशा तरुणीच्या जवळ जाणे मला मोठे अवघड वाटू लागले. कारण चुकून रबर तुटून हा फ्रॉक आता खाली पडणार, अशी मला दर क्षणाला उगीचच भीती वाटू लागली. चटकन् पडण्याची भीती दाखवणाऱ्या अशा फ्रॉकमधील मुलीच्या इतक्या जवळ जाण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे नृत्याचे शिक्षण घेण्यास सुरुवात करण्यापूर्वीच माझी छाती धडधडू लागली होती.

मरियमने एकदोन औपचारिक प्रश्न विचारले, आपल्या हातातील घड्याळाकडे पाहिले, आणि मायक्रोफोनवर नवी रेकॉर्ड सुरू होताच ती चटकन् उठली.

“ आता धड्याला सुरुवात करू हं! ” मरियम म्हणाली. मी नृत्यगृहात लक्षपूर्वक पाहिल्याप्रमाणे मोठ्या रुबाबात पुढे सरसावलो. तिच्या उजव्या हाताचा पंजा माझ्या डाव्या हातात धरला, आणि माझा उजवा हात तिच्या कमरेमागे घेऊन कण्यावर ठेवला. त्याबरोबर ती किंचित् हसली आणि मॉंटेसरीच्या मुलाला बाई समजावून देतात तशा सुरात म्हणाली, “ थांबा ! मला पकडण्याची अशी घाई करू नका. ती वेळ आली म्हणजे मी तुम्हाला सांगेनच. ” असे म्हणून तिने स्वत:ला अगदी अलगद सोडवून घेतले. मी चांगलाच ओशाळलो आणि म्हणालो, “माफ करा. पण मी असेच हात ठेवताना पाहिलं आहे. ” मरियन म्हणाली, “ खरं आहे. पण तो टप्पा पुढं येईल. तूर्त मी सांगते त्याप्रमाणे तुम्ही जरा ड्रिल करा. ” तिने ‘ एक दोन तीन चार ’ असे म्हणून पावले टाकली. मी तसा प्रयत्न केला. मग ती म्हणाली, “ लेफ्ट फूट फॉर्वर्ड, राइट फूट स्लाइटली फॉर्वर्ड, क्लोज लेफ्ट टु राइट, देन राइट फॉर्वर्ड, ” लगबगीने उच्चारलेले हे शब्द माझ्या कानावरून गेले, पण त्यातली मख्खी काही मला कळली नाही. अति वेगाने एखादे विमान अगदी जवळून जावे तसे वाटले. मी ‘ बेग

युवर पार्डन्' म्हटले, तेव्हा तिने पुन्हा तशाच 'कोड' भाषेत काहीतरी म्हटले. यावेळी मात्र मला ते समजले नाही असे म्हणण्याचे धाडस मला आले नाही. तेव्हा "वा:! आत्ता छान कळलं!" असे म्हणून उगीच आपला लहानपणी स्काऊटमध्ये केलेले 'लेफ्ट-राइट' करू लागलो. त्यावर मोठ्या प्रयासाने हसू दाबीत ती म्हणाली, "छे, छे: ! तसं नाही. हे रेकॉर्डचं संगीत लक्षपूर्वक ऐका. त्यात एक-दोन-तीन असा ठेका तुम्हाला ऐकू येईल. वॉल्झमध्ये मिनिटाला असे बत्तीस ठोके असतात हं! आता माझ्या हाताची बोटं अशी लांबून धरा आणि माझ्या पायाकडे लक्षपूर्वक पाहा. -हं! एक-दोन एक-दोन एक-दोन तीन-चार....."

हे नाचाचे काम या जन्मी तरी माझ्याने होणार नाही, अशी खूणगाठ मी बांधली आणि त्या शाळेत भरलेल्या वीस शिलिंगांवर मनातून पाणी सोडले. पण वरकरणी काहीतरी देखावा करून उरलेला वेळ भरून काढणे आवश्यक होते. मी अंदाजाने टाकलेली चार पावले बरोबर आली म्हणून की काय ती शिक्षिका 'लाइन ऑफ डान्स','डायगोनल टु सेंटर', 'डायगोनल टु वॉल', 'क्विक् क्विक् टर्न', 'नॅचरल टर्न', 'स्पिन' वग़ैरे असे काही अगडबंब आणि दुर्बोध वाक्प्रचार वापरू लागली की, मी नुसता हैराण होऊन गेलो. हे नृत्य आहे की, ट्रिग्नॉमेट्री आहे, असाही मला प्रश्न पडला. कुठून दुर्बुद्धी झाली, आणि पदरचे पैसे देऊन ही नसती उपाधी लावून घेतली असे मला वाटू लागले. अशा अवस्थेत दोनचारदा माझा पाय तिच्या पायावर पडावा हे साहजिकच होते. आणि तिनेही मग त्यापासून धडा घेऊन मला शिकविताना आपले पाय वाजवीपेक्षा मागे घ्यावेत हेही साहजिक होते! असे करता करता एकदाचा अर्धा तास संपला आणि मी सुटकेचा नि:श्वास टाकला. ती तरुणी ब्रिटिश होती आणि त्या लोकांना आपल्या भावना लपविण्याचे कसब मोठे छान साधले आहे. नाही तर तिने सोडलेला सुटकेचा नि:श्वास माझ्यापेक्षा खचितच मोठा ठरला असता!

धडा-खरोखर मी तो धडाच घेतला-संपल्यावर मरियमने आपली छोटी वही काढली आणि अगदी निर्विकारपणे मला सांगितले, "हं आता बुधवारी संध्याकाळी पाच वाजता यायचं. तोपर्यंत घरी मघाचा एक्झरसाइज करा. आज शिकलेल्या सर्व स्टेप्स् घरी नीट बसवून घ्या." -म्हणजे या नृत्याच्या शाळेतही 'होमवर्क' दिले जात होते तर! मी आपला पहिलीच्या मुलासारखा मान डोलावून निघालो.

पाश्चात्य पद्धतीचे नृत्य शिकवण्याची ती सुरुवात-आणि शेवटही झाला, असे मला त्याक्षणी वाटले. पण नंतर अनेक मित्रांनी सांगितले की, सुरुवातीला सर्वांचेच असे होते. नृत्य पाहताना आपल्याला तें अगदी सोपे वाटले, तरी प्रत्यक्ष नृत्य करताना मात्र त्याचे शास्त्र अवघड वाटू लागते, हा अनुभव सर्वांनी सांगितला, आणि शास्त्र अजिबात विसरून निव्वळ प्रक्टिसनेही कामचलाऊ नृत्य जमेल असेही सांगितले, तेव्हा मला जरा धीर आला. त्यानंतर मी पुन्हा दोन वेळा स्टुर्मे बाईकडे नृत्याच्या शिक्षणासाठी गेलो. पण तिची शिकवण्याची पद्धतच इतकी रुक्ष आणि तांत्रिक होती की, मला कोणी नृत्य शिकविणारचं असेल, तर 'ती ही नव्हे' अशी माझी खात्री झाली! कारण मला 'स्लो वॉल्झ' च्या काही स्टेप्स् येतात न येतात, तोच तिने 'फॉक्स ट्रॉट' सारखी अवघड नृत्ये शिकवायला सुरुवात केली. त्यामुळे माझ्या मनातील आधीचा गोंधळ अधिकच वाढला. अखेर तिसऱ्या धड्याच्या शेवटी मी तिला रामराम ठोकला. माझ्यासारखा मंद विद्यार्थी हातचा गेल्याचे तिलाही मोठे दुःख झाले नसावे एवढा अंदाज मात्र मी बांधला.

मग मी पुस्तकाच्या साहाय्याने नृत्य शिकण्याचा प्रयोग केला. पण पुस्तकाची परिभाषा इतकी अवघड होती की, त्याने स्टुर्मे बाईला बरे म्हणायला लावले. साधारणपणे त्यात असे शब्द होते: 'एल्. ओ. डी. टु. डी. टी. सी., डी. टी. सी. टु. डी. टी. डब्ल्यु, एल्. एफ्. टु. साइड अँड बॅक, आर. एफ्. टु. फॉर्वर्ड अँड साइड, बॉडी बॅकिंग डायगोनली टु

सेंटर.' आता या सैनिकी ऑर्डरमध्ये काय समजावे? तेव्हा पुस्तकावरून पोहण्याच्या प्रयत्नाप्रमाणेच मी पुस्तकावरून नाचण्याचा हा प्रयोगही सोडून दिला. (या परिभाषेचा अर्थ मला पुढे कळला. तो असा: 'एल्. ओ. डी. टु. डी. टी. सी.' म्हणजे- 'From line of dance to diagonal to centre.')

असेच काही दिवस गेल्यावर मला एका वर्गबंधूने सांगितले की, सर्वांना खुल्या असणाऱ्या क्लबमध्ये नाव घालण्यापेक्षा फक्त विद्यार्थ्यांनाच खुल्या असणाऱ्या क्लबमध्ये नाव घालणे नवशिक्याला अधिक सोयीचे असते. कारण बरेचसे परकीय विद्यार्थी व विद्यार्थिनी शिकाऊ असतात. हा सल्ला मला लगेच मानवला, आणि मी 'ब्रिटिश कौन्सिल' व 'कॉमनवेल्थ स्टुडंट्स् क्लब' या दोन क्लबात लगेच नाव घातले. या दोन्ही संस्थांना ब्रिटिश सरकारची मदत होती आणि काही प्रमाणात त्यावर सरकारचे नियंत्रणही होते. त्यामुळे तेथे सभासदांना वर्गणी नाममात्र (वर्षाला दहा ते बारा रुपये) होती, आणि त्यांचा दर्जाही चांगला होता. ब्रिटिश कौन्सिलमध्ये आठवड्यातून दोन वेळा नृत्य होत असे. पण त्याशिवाय चित्रपट, व्याख्याने इत्यादी कार्यक्रमही होत. पण हा क्लब काही दृष्टींनी गैरसोयीचा होता. ब्रिटिश कौन्सिलचा हा क्लब 'ओव्हरसीज् स्टुडंट सेंटर' म्हणून काम करीत होता, आणि त्यामुळे साहजिकच त्यात सभासदांची संख्या फार मोठी-म्हणजे सुमारे दीड हजार इतकी होती. हे केंद्र हॅनोव्हर स्ट्रीटवर, म्हणजे लंडनच्या अगदी मध्यवर्ती जागी असल्याने तेथे नृत्याला फारच गर्दी होई. बऱ्याच मुली परकीय असल्या तरी शिकाऊ नव्हत्या. फ्रान्स, इटली, जर्मनी इत्यादी पाश्चात्य मुली आपापल्या देशात आधीच नृत्यात तरबेज होऊन तेथे येत. त्यामुळे माझ्यासारख्या नवख्या माणसाला त्यांना आपल्याबरोबर नृत्य करण्याची विनंती करणे अवघड वाटत असे. हे केंद्र प्रामुख्याने परकीय विद्यार्थ्यांसाठी असल्याने तेथे ब्रिटिश मुली फारच थोड्या असत. पण सर्वांत मोठी गैरसोय म्हणजे मुलींची संख्या अगदी थोडी आणि

मुलांची संख्या फार मोठी असे. त्यामुळे नृत्यासाठी मुलगी वाटणीला येण्यास फार वेळ लागे.

या उलट, ‘कॉमनवेल्थ स्टुडंट्स् क्लब’ हा मात्र मला अगदी सोयीचा आणि योग्य वाटला. तेथे सभासदांची संख्या दोनशेपर्यंत तरी असेल. पण नेहमी येणाऱ्यांची संख्या मात्र तीस ते चाळीसच्या दरम्यान होती. मुलांची आणि मुलींची संख्या जवळजवळ समान होती. त्यामुळे नृत्यासाठी जोडीदारीण मिळणे सुलभ असे. ‘इंपीरियल इन्स्टिटट्यूट’ च्या भव्य इमारतीत हा क्लब होता. बाहेरून ही इमारत अवाढव्य, काळपट आणि काहीशी भयाण वाटली, तरी आतून ती मोठी सुबक, स्वच्छ, प्रसन्न आणि उबदार होती. त्या ठिकाणी माझी अनेकांशी आणि अनेकींशी मैत्री झाली. नृत्याशिवाय व्याख्याने, सहली असे कार्यक्रमही होत.

या सहलीवरून आठवण झाली. एकदा इंग्लंडच्या राणीचा कसला तरी कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाचे काही पास ‘कॉमनवेल्थ क्लब’ ला दिले होते. ‘ज्यांना या कार्यक्रमाला हजर राहावयाचे असेल, त्यांनी आपली नावे क्लबमध्ये आणून द्यावी’-अशी नोटिस लागली. मी आपला आमच्या भारतीय पद्धतीप्रमाणे विचार केला की, कार्यक्रमाला अजून महिनाभर अवकाश आहे. तेव्हा सध्या नाव तर देऊ. मग ऐन वेळी जमले तर जाऊ, नाहीतर रहित करू. असा विचार करून मी माझे नाव नोंदवले.

कार्यक्रमापूर्वी आठ दिवस मला स्मरणपत्र आले, आणि त्या दिवशी अमुक वेळेला अमक्या रेल्वे-स्टेशनच्या तिकिटाच्या खिडकीजवळ येण्याची सूचना दिली गेली. त्यानंतर मी दोनतीन दिवसांकरिता ऑक्सफर्डला गेलो. कार्यक्रमापूर्वी मी परत येऊ शकेन असे मला वाटले होते; आणि नाही आलो तरी राणीचा कार्यक्रम काय माझ्यावाचून थोडाच अडून राहणार आहे असा मराठमोळा विचारही माझ्या मनात येऊन गेला. मला ऑक्सफर्डहून येण्यास त्या दिवशी अपेक्षेपेक्षा दोन तास अधिक वेळ लागला, आणि मी कॉमनवेल्थ क्लबला न कळविताच राणीच्या कार्यक्रमाला गैरहजर

राहिलो. त्यात काही विशेष झाले असेही मला त्यावेळी वाटले नाही. पण मग दोन दिवसांनी क्लबच्या चिटणीसांचे एक बरेच कडक पत्र आले. त्यात त्यांनी म्हटले होते,- 'राणीसाहेबांच्या कार्यक्रमाचे दुर्मिळ तिकीट आपण स्वीकारूनही गैरहजर राहिलात, ही अतिशय अनुचित गोष्ट आहे. आपले नाव आम्ही 'क्लॅरेन्स हाऊस' कडे पाठविलेल्या यादीत समाविष्ट केले होते. आपण ही चूक पुन्हा करणार नाही अशी आशा आहे'. एरवी अगदी नम्र असणारा इंग्रज, राणीचा प्रश्न आला की किती कडक बनतो, याचा यावेळी मला अनुभव आला. अर्थात पुन्हा मला राणीच्या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारण्याचा धीर झाला नाही, हे सांगणे नकोच!

'इंडियन हाऊस'मधील एका अधिकारी मित्राला मी सहज हा प्रसंग सांगितला, तेव्हा तो म्हणाला, 'तुम्ही सुदैवी आहात. मी प्रथम इंग्लंडला आलो, तेव्हा मलाही हे माहीत नव्हतं की राणीच्या कार्यक्रमाचं निमंत्रण स्वीकारलं की जावंच लागतं. मीही राणीच्या एका कार्यक्रमाला येण्याचं मान्य केलं आणि गेलो नाही. तेव्हा संबंधित ब्रिटिश अधिकाऱ्यानं मला बोलावून माझी चांगलीच कानउघडणी केली. त्यानं मला स्पष्टपणे सांगितलं,- 'Once you accept an invitation, you MUST attand-unless you are seriously ill or dead.'
'त्या वेळेपासून मी सरकारी आमंत्रणाचा धसकाच घेतला आहे!'

इंग्लंडमधील लहानमोठे क्लब म्हणजे मैत्रिणी मिळविण्याची हमखास ठिकाणे आहेत. मात्र मैत्रिण या शब्दाचा अर्थ जरा मर्यादित अर्थाने घेतला पाहिजे. ओळखीची मुलगी इंग्लंडमध्ये आपल्याबरोबर चहा घ्यायला, जेवायला, फिरायला किंवा सिनेमालाही सहजासहजी येऊ शकेल. पण त्याचा अर्थ आपण फार भलताच करून घेता कामा नये. मर्यादेपलिकडे कोणी मुलगी जात नसेलच असे नाही; पण आपल्याबरोबर ती सिनेमाला येते म्हणून ती आपल्यावर अनुरक्त आहेच, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल.

आमच्या एका मित्राची अशीच एका आंग्ल तरुणीशी मैत्री झाली. तिने त्याच्याबरोबर मद्य घेतले, चित्रपटही पाहिला. हे समजल्यावर त्याचे मित्र म्हणाले, " अरे, याचा अर्थ उघड आहे. तिचं तुझ्यावर प्रेम असलं पाहिजे. " त्यावर तो म्हणाला, " असं म्हणता ? मग ती पुन्हा भेटल्यावर पाहतोच प्रयत्न करून. " आणि मग एके दिवशी ती दोघे 'रीजंट पार्क' मध्ये फिरायला गेली असताना त्याने तिला जरा जवळ ओढले आणि प्रेमाची भाषा काढली. त्याचा हात आपल्या कमरेजवळून काढून तिने थंडपणे सांगितले, " छे:छे: ! तू माझा केवळ मित्र आहेस. माझं प्रेमबिम कुछ नाही ! " त्यावर त्याने तिला प्रांजळपणे सांगितले, " मलासुद्धा तसंच वाटत होतं. पण माझ्या मित्रांनी सांगितलं म्हणून मी तसं केलं बघ. नाहीतर मी कशाला मर्यादा ओलांडू ? " त्यावर ती हसून एवढेच म्हणाली, -" All right. Now be a good boy." - झाले ! मुलाने अतिप्रसंग केला म्हणून आकांडतांडव नाही, शिवीगाळी नाही, - काही नाही. पुन्हा विशिष्ट मर्यादेत का होईना, पण मैत्री अबाधित चालूच ! त्यासाठी आजन्म वैर नाही, आणि सतत धुमसणारे अंतस्थ असमाधानही नाही.

कोणाला ही विचारसरणी आवडेल, कोणाला आवडणार नाही. पण आम्हा भारतीय मुलांना ती निदान वेगळी, निराळी वाटली, हे मात्र खरे. मला वाटते, परदेशच्या प्रवासाचा हा एक विलोभनीय गुण आहे. आपल्याला प्रिय असणाऱ्या किंवा न आवडणाऱ्या अनेक जीवनपद्धती, निराळे विचार, अपरिचित दृश्ये तेथे दिसतात, आणि मग आपल्याला वाटते की, अमुकच विचारसरणी चांगली असा आग्रह आपण तरी का धरावा ? निदान वेगळे विचारही योग्य असण्याची शक्यता आहे, असे गृहीत धरून मनाची कवाडे खुली का ठेवू नयेत ?

◇ ◇ ◇ ◇

# तीन : नृत्यगृहातील गमतीजमती

'कॉमनवेल्थ क्लब'मध्ये माझे बस्तान लकरच चांगले बसले. काही दिवसांनी तेथे नृत्य शिकविण्याचे वर्ग सुरू होणार असल्याची जाहिरात लागली. अर्थातच मी उत्सुकतेने नाव घातले. या वर्गात शिकणाऱ्या मुली क्लबमध्ये नेहमी भेटणाऱ्या आणि चांगल्या ओळखीच्या होत्या. त्यामुळे त्यांच्याबरोबर नृत्य करताना काही चुकले तरी संकोच वाटत नसे. येथे येणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांचे आणि विद्यार्थिनींचे नृत्याचे ज्ञान जवळजवळ सारखेच होते. त्यामुळे एकमेकांशी मैत्री जुळणे अधिक सुलभ होते.

क्लबमधील वातावरण मोठे विलोभनीय असे. मंद प्रकाश असे. अस्पष्टपणे ऐकू यावे अशा रीतीने कर्णमधुर संगीताच्या ध्वनिमुद्रिका लावलेल्या असत. हॉलच्या एका भिंतीत मोठी शेगंडी पेटलेली असे. विविध देशांची रंगीबेरंगी उत्कृष्ट नियतकालिके आणि पुस्तके असत. भिंतीवर भव्य तैलचित्रे असत, आणि हॉलमधील सबंध वातावरण काव्यमय, तरल असे.

क्लबमध्ये नृत्याची वेळ साधारणपणे सायंकाळी साडेसात ते साडेनऊपर्यंत असे. शनिवारी रात्री अकरा-साडेअकरा वाजेपर्यंत नृत्य चाले. नृत्यगृहातील शिरस्त्याप्रमाणे कोणीही पुरूप कोणत्याही स्त्रीला आपल्याबरोबर नृत्य करण्याची विनंती करू शकतो, आणि तिने ती विनंती स्वीकारली पाहिजे, असाही शिरस्ता आहे. अगदी क्वचित्प्रसंगी ' मी फारच दमले आहे, मला माफ कराल का ? ' असे ती म्हणू शकते. पण तिला नकार देता येत नाही. इतकेच नव्हे, तर तसा तिने नकार दिल्यास पुरुप नृत्यगृहाच्या व्यवस्थापकाकडे तक्रार करू शकतो, आणि त्याने आग्रहच धरला तर व्यवस्थापक त्या स्त्रीला बाहेर जाण्यासही सांगू शकतो. पण इतक्या थराला प्रकरण जवळजवळ कधीच जात नाही. साधारण दोन नृत्ये झाल्यावर संगीत थांबते आणि सर्वजण पाच मिनिटे विश्रांती घेतात. त्या वेळी आपल्याला आवडणाऱ्या कोणत्याही मुलीपुढे जाऊन पुरुप विचारतो, " May I have the next dance with you?" या विनंतीचा ती स्वीकार करते, किंवा त्यापूर्वीच तिने कोणाबरोबर ते नृत्य करण्याचे कबूल केले असेल तर " Sorry! I have promised this dance to someone else." असे सांगते.

नृत्य चालू असताना पुरुप आपल्या डाव्या हातात स्त्रीचा उजव्या हाताचा पंजा धरतो आणि आपला उजवा हात तिच्या कमरेभोवती घेऊन पाठीच्या मणक्याजवळ ठेवतो. ती आपला डावा हात त्याच्या बाहूवर ठेवते. नृत्याला सुरुवात झाल्यावर हळूहळू संभापण सुरू होते. पण मला तर पहिल्यापहिल्यांदा या संभापणाच्या ठराविक साच्यातून बाहेर कसे पडावे हे कळत नसे. बहुधा पहिला प्रश्न मी करीत असे, " तुम्ही इथं बऱ्याच वेळा येता का ? "

" कधीकधी येते. तुम्ही कोणत्या देशाचे ? "

" भारताचा. -तुम्ही ? "

"इटली. "

" लंडनमध्ये किती दिवस आहात ? "

" चार-पाच महिने. "

" लंडनची हवा कशी वाटते ? "

" भयंकर ! "

यापुढे मात्र संभाषणाचा गाडा सरकत नसे. कारण कुणाला फारसे वैयक्तिक प्रश्न विचारायचे नाहीत, असाही तिकडचा एकंदर शिष्टाचार. बरे, एक नृत्य संपल्यावर पुन्हा ती मुलगी त्या सायंकाळी नृत्याला मिळेलच अशी खात्री नाही. आणि नृत्याची वेळ संपल्यावर या मुली 'तुम्ही कोण आणि आम्ही कोण ?' अशा आविर्भावाने ओळखदेखील न दाखविता घरी जायला तयार ! काही तज्ज्ञ आणि अनुभवी मुले मात्र पहिल्याच नृत्याच्या वेळी 'मी तुम्हाला पोचवायला घरापर्यंत किंवा स्टेशनपर्यंत येईन' असे सांगत. अशा वेळी बहुतेक मुली अनोळखी मुलांना नकार देत किंवा 'माझ्याबरोबर माझी मैत्रिण आहे' असे सांगत. चांगली ओळख असेल, तर एखादी मुलगी होकारही देई.

एकदा आमच्या क्लबात 'व्हिट्सन डान्स'चा मोठा कार्यक्रम होता. नृत्य चालू असताना अनेक गमती करण्यात येत होत्या. असे खास कार्यक्रम ग्रामोफोनच्या रेकॉर्डवर न चालता ते बँडवर चालत. नृत्य चालू झाल्यावर एकदोन मिनिटातच क्लबचा चिटणीस ते थांबवी आणि सर्वांना उद्देशून सांगे, 'आपल्या जोडीदारणीच्या कानातील एक इअरिंग सर्वांत प्रथम माझ्याकडे कोण आणून देतो पाहू ?' - हे एकल्याबरोबर सर्व मुली आपले कर्णभूपण शक्य तो जलद मुलाच्या हाती देत, आणि तो ते बँडजवळ पळत देत असे. प्रथम ते देणाऱ्याला चिटणीस एक निळे कार्ड देत असे. अशा अनेक वस्तू तो मागत असे आणि शेवटी सर्वांत अधिक तिकिटे मिळवणाऱ्या जोडीला एखादी सुंदर वस्तू भेट म्हणून मिळे. या नृत्याच्या वेळी व्यवस्थापक एकदा म्हणाला, 'आपल्या जोडीदाराचा पायमोजा प्रथम कोणती मुलगी आणून देते ते पाहू ?' इतर मुलींप्रमाणे माझीही जोडीदारीण

मला चटकन् बूट काढण्याचा आग्रह करू लागली. त्याबरोबर माझ्या काळजात धस्स झाले ! कारण माझे पायमोजे फाटलेले होते ! आणि ' बुटाच्या आतले फाटके पायमोजे कोण पाहणार आहे ? ' अशा बेपर्वाईने ते घालून मी या समारंभाच्या नृत्याला आलो होतो. बरे, वस्तुस्थिती सांगण्याची चोरी ! कारण ती मुलगी मला अगदीच अपरिचित होती. तेव्हा मी चटकन् खाली वाकलो आणि बुटाचे बंद सोडण्याच्या मिषाने त्या बंदाची अगदी पक्की गाठ मारली. आणि मग मी पुटपुटलो, ' काय करावं बुवा ! ही गाठच सुटत नाही ! ' अर्थातच एवढ्या वेळात, धड पायमोजे असलेल्या कोणा एका चलाख मुलाच्या चलाख जोडीदारणीने त्याचा पायमोजा नेऊन दिला होता म्हणून मी सुटलो ! घरी परत आल्यावर मात्र ' दोर कापून 'च मला बूट सोडावे लागले.

अशाच आणखी एका नृत्याच्या वेळी क्लबच्या नृत्यगृहात नृत्याच्या ओळीवर एक वर्तुळ काढण्यात आले होते. नृत्य करणाऱ्या जोड्या हॉलच्या कडेने नृत्य करीत फिरतात. त्या ओळीत साधारण दोन फूट परीघाचे हे वर्तुळ होते.

हे नृत्य सुरू होण्यापूर्वी व्यवस्थापकाने सांगितले की, मधेच केव्हा तरी बँड एकदम थांबविण्यात येईल. त्यावेळी जी जोडी या वर्तुळात असेल, त्या जोडीतील पुरुषाने आपल्या जोडीदारणीला उचलले पाहिजे आणि हॉलच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उचलून नेले पाहिजे ! ही घोषणा ऐकल्यावर काही तरुणांच्या मनात आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या, तर काहीजणांच्या छातीत धस्स झाले ! ज्यांच्या बरोबरच्या मुली अंगाने किरकोळ व आटोपशीर होत्या, त्या पुरुषांना आनंद होणे साहजिक होते. पण ज्या किरकोळ अंगकाठीच्या पुरुषांच्याबरोबर जाडजूड आणि अवजड मुली नृत्य करीत होत्या, त्यांना मात्र या वार्तेने धडकी भरावी हेही साहजिक होते. कारण चुकून जर आपण या वर्तुळाच्या सापळ्यात सापडलो, आणि एवढे मोठे धूड उचलून हॉलच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत नेण्याची

अक्षरश: ‘ जड ’ जबाबदारी अंगावर ‘ पडली ’ तर काय करावे हा प्रश्न त्यांना भेडसावीत होता. माझ्याबरोबर त्यावेळी एक महाकाय पर्शियन मुलगी होती. मी तिच्याकडे पाहू लागलो, तेव्हा पाहण्याचा अभिप्राय अर्थातच तिच्या लक्षात आला. कारण मी तिला उचलण्याचा प्रयत्न करताना ती पडली तर माझ्यापेक्षा तिलाच ‘ तडाखा ’ बसणार होता. ती म्हणाली, ‘ आपण वर्तुळ चुकवण्याचा निकराचा प्रयत्न करू. ’

अर्थातच हा विचार आमच्याप्रमाणेच इतरही अनेकांनी केला होता. त्यामुळे प्रत्यक्ष नाचाच्या वेळी त्या वर्तुळाजवळ आलेल्या बऱ्याच जोड्या अगदी वेगाने वर्तुळातून धावत जात. सर्वांचे लक्ष नृत्याकडे न लागता वर्तुळात कोण सापडते इकडेच लागले. अखेर एकदम बँडचे संगीत थांबले आणि वर्तुळातून पळण्याचा प्रयत्न करणारी एक जोडी गळाला लागली. त्याबरोबर नृत्य थांबले, आणि तो तिला कशी उचलून नेतो ते सर्वजण पाहू लागले. त्यावेळी एक पाकिस्तानी मुलगा आपल्या ब्रिटिश जोडीदारणीला उचलण्याचा प्रयत्न करीत होता. ती त्यांच्या धाडसी प्रयत्नाकडे पाहून गमतीने हसत होती आणि आमच्यासारखे इतरेजन, ती पडली तर काय होईल ही कल्पना करीत होते. अखेर निम्म्या हॉलपर्यंतच आणून त्याने तिला खाली ठेवले आणि हे ‘ शिवधनुष्य ’ आपल्या आवाक्याबाहेरचे असल्याचे कबूल केले ! अर्थातच या चांगल्या वर्तणुकीबद्दल त्याला अर्ध्या शिक्षेची सूट मिळाली.

आमच्या क्लबमध्ये एका स्वतंत्र लहानशा खोलीत एक टेलिव्हिजन सेट होता. मी तिकडे सहसा जात नसे. पण एक दिवस क्लबच्या नृत्यगृहात एका मित्राने मला विचारले, “ शेजारच्या खोलीतला टेलिव्हिजन पाहिलात काय ? ” मी म्हणालो, “ मी राहतो तिथंही टेलिव्हिजन आहेच. त्यामुळं इथं त्यासाठी मी मुद्दाम वेळ खर्च करीत नाही. ” त्यावर तो छद्मीपणे हसून एवढेच म्हणाला, “ पण इथल्या टेलिव्हिजनमध्ये विशेष प्रेक्षणीय दृश्यं असतात. एकदा चक्कर टाकून तर या ! ”

मी शेजारच्या खोलीत गेलो. साधारण दीड फूट रुंद व अडीच फूट लांब अशा एका पडद्यावर टेलिव्हिजनचा कार्यक्रम चालला होता. चित्रपटगृहाप्रमाणेच या खोलीतही अंधार होता. पंधरा-वीस खुर्च्या होत्या. मी इतर खुर्च्यांतून अडखळत एका रिकाम्या खुर्चीवर बसलो. हळूहळू खोलीतील व्यक्ती आणि दृश्ये मला स्पष्ट होऊ लागली. त्यावेळी मला आढळले की, तिथे सर्वजण जोडीजोडीने बसली होती. मुले आणि मुली अगदी एकमेकांजवळ बसली होती. आणि काहींनी तर एकमेकांच्याभोवती हातही टाकलेले होते. टेलिव्हिजनवर काय चालले आहे इकडे कोणाचेच लक्ष नव्हते. माझ्या मित्राने मला या खोलीत चक्कर टाकण्यास का सांगितले याचे कारण आता मला समजू लागले. इतक्यात क्लबचे चिटणीस खोलीत आले. या वेळेपर्यंत टेलिव्हिजनवरचा एक कार्यक्रम संपला होता. चिटणिसांनी सर्वांना विचारले, 'दिवा लावू का ?' त्याबरोबर सर्व 'रोमिओ' आणि 'ज्युलिएट'' ओरडल्या, 'नको नको! आम्ही टेलिव्हिजन पाहात आहोत!'' चिटणीसही खेळकरपणे म्हणाले, 'अस्सं होय ? ठीक आहे!''

एका डच मुलीची आणि माझी या क्लबात ओळख झाली. हिंदी विद्यार्थांबद्दल तिचे मत बरेच प्रतिकूल होते, असे तिने आमची अधिक मैत्री झाल्यावर सांगितले. ती म्हणाली, "एका हिंदी तरुणाचा मला वाईट अनुभव आला, म्हणून असेल, भारतीय लोकांविषयी मला किंचित् भीती वाटत होती. आता माझं ते मत बदललं आहे. पण याच क्लबातल्या घोप नावाच्या एका बंगाली मुलानं मला कॉफी प्यायला म्हणून बाहेर नेलं. कॉफी घेऊन आम्ही एका बागेत गेलो. तिथं हिरवळीवर बसल्यावर तो म्हणाला, 'आम्ही हिंदुस्थानात एक खेळ खेळतो, तो मी तुला दाखवतो!' मी उत्सुकतेनं 'बरं' म्हटलं. मग तो म्हणाला, 'आता तू माझ्यासमोर अशी बस आणि इतरत्र कुठंही पाहू नकोस. फक्त माझ्या डोळ्यांकडं पाहा.' मला काय चाललं आहे याची काहीच कल्पना नसल्यानं मी त्याच्या डोळ्यांकडं पाहू लागले. तो अतिशय एकाग्रतेनं माझ्याकडं रोखून पाहात

होता. हळूहळू माझं डोकं दुखू लागलं आणि मला भोवळ येणार की काय असं वाटू लागलं. तेव्हा मी डोळे झाकण्याचा प्रयत्न करू लागले. पण माझे डोळे मला झाकता येईनात. अखेर अत्यंत मनोनिग्रह करून मी म्हणाले, 'पुरे आता! मला बरं वाटत नाही.' त्यावर तो दरडावून म्हणाला, 'काही बोलू नकोस! फक्त माझ्या डोळ्यांकडे पाहा.' त्या बरोबर माझ्या मनात भयंकर कल्पना आली. तो मुलगा माझ्यावर मेस्मेरिझमचा प्रयोग करण्याचा प्रयत्न करीत आहे हे माझ्या लक्षात आलं. मी सर्व मानसिक बळ एकवटून दुसरीकडं पाहिलं आणि म्हणाले, "छे: छे:! मी तुझ्याकडं पाहणार नाही. तू मला फसवू पाहतो आहेस!" मेस्मेरिझमनं मला आपल्या ताब्यात घेऊन वाटेल ते करायला लावण्याची ही त्याची क्रूर कल्पना पाहून मला संताप आला. माझा नूर त्यानं चटकन् ओळखला. मग एकदम त्यानं आपला पवित्रा बदलला. सहजपणे हसून तो म्हणाला, 'मी तुझी गंमत करीत होतो.' अर्थातच माझा त्याच्यावर विश्वास बसला नाही. पण मी त्या वेळी मुळीच भांडण केलं नाही. जणू काहीच विशेष झालं नाही अशी मी त्याच्याबरोबर त्या सायंकाळी वागले आणि नंतर मी त्याला पुन्हा कधीच भेटले नाही. पण त्या वेळेपासून, प्रत्येक भारतीय माणूस आपल्यावर या मोहिनी-अस्त्राचा प्रयोग करील की काय अशी शंका मला येते हे मात्र खरं!"

आमच्या क्लबमध्ये नायजेरिया, वेस्ट इंडिज, इत्यादी आफ्रिकन देशांतील काही विद्यार्थीही येत असत. एकदा अशाच एका विद्यार्थ्याने आपल्याबरोबर नृत्य करणाऱ्या मुलीला बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये नेले आणि तिथल्या बाकावर ती दोघे बराच वेळ बोलत होती. या मुलीचा आणि माझा बरेच दिवस परिचय होता, म्हणून नृत्याच्या वेळी ती जेव्हा माझी जोडीदारीण म्हणून आली, तेव्हा मी सहज थट्टेने तिला म्हणालो, "तू इतका वेळ गप्पा मारीत होतीस की मला वाटलं, तू आता परत येत नाहीस." त्यावर ती हसून म्हणाली, "तो मुलगा माझ्याशी काय बोलत

होता माहीत आहे का ? त्यानं मला लग्नासाठी मागणी घातली. ''

"असं ? मग तू ती स्वीकारलीस का ? तो काय शिकतो किंवा काम करतो ? ''

"मी नकार दिला. आणखी काही वर्षं मी लग्नाचा विचारच करणार नाही असं मी त्याला सांगितलं. आपण एका बँकेचे मॅनेजर आहोत असं तो म्हणत होता. खरं म्हणजे त्यानं लग्नाची मागणी घालावी एवढा त्याचा-माझा परिचय नाही. ''

हे आफ्रिकन विद्यार्थी मोठे धाडसी खरे. एकदोनदा एखाद्या मुलीची भेट झाल्यावर ते सरळ लग्नाची किंवा तशाच प्रकारची सूचना करीत. आमच्या क्लबमध्ये हे प्रकार पुढेपुढे इतके वाढले की, मुलींनी क्लबच्या व्यवस्थापकांच्याकडे त्याबद्दल तक्रारही केली. मग एका सायंकाळी चिटणीसांनी सर्व सभासदांची बैठक घेऊन सांगितले, 'ज्यांना लग्नाच्या मागण्या घालायच्या असतील, त्यांनी कृपा करून त्या क्लबच्या जागेबाहेर घालाव्यात. सभासदांच्या वैयक्तिक बाबतीत क्लबला कोणतेही मत प्रदर्शित करायचे नाही. पण लग्न जुळवण्यासाठी हा क्लब नाही एवढंच मला आपल्या निदर्शनाला आणायचं आहे!'' हे प्रकरण मग तेवढ्यावरच मिटले.

क्लबमध्ये नेहमी नवीन नवीन मुली येत. त्या बहुधा कुणाच्यातरी पाहुण्या म्हणून येत. अर्थात नवीन आणि त्यातल्या सर्वात सुंदर मुलीबरोबर नृत्य करण्यासाठी किंवा मैत्री करण्यासाठी बरेचजण उत्सुक असत. नृत्याचा एक प्रकार असा आहे की, ते चालू असताना बँडचा प्रमुख मधेच 'चेंज पार्टनर्स' असे म्हणतो, त्यावेळी मुलींनी स्थिर राहायचे असते आणि मुलांनी आपली जोडीदारीण सोडून कोणत्याही इतर मुलीबरोबर लगेच नृत्य पुढे सुरू करायचे असते. या बदलासाठी फार तर अर्धे मिनिट संगीत बंद राहते. पणं त्या अल्प वेळेतही मानवी मनाचे मोठे गमतीचे कंगोरे दिसतात. त्या क्षणार्धात विशेष सुंदर मुलीच्या कमरेभोवती एकदम तीनचारजणांचे हात पडतात आणि या तीनचारजणांपैकी प्रत्येकजण दुसऱ्याकडे अशा नजरेने

पाहतो की, मिस्टर, ' मी मघापासून हिच्याकडे नजर लावून होतो. आता सोडा तिला आणि दुसरी मुलगी पाहा ! ' पण नृत्यगृहातील सारेच वातावरण सुसंस्कृत आणि सौजन्यपूर्ण असल्याने प्रत्यक्षात हे शद्ब कोणी उच्चारीत नाही. उलट दुसरा इसम सौजन्य दाखवून आपल्याला तिच्याबरोबर नृत्य करू देईल अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. जिच्याभोवती असे तीनचार विळखे क्षणमात्र पडलेले असतात, ती रूपवती या सन्मानाने खुलते. आपल्या प्रभावाच्या गर्वाने मिश्रित असे समाधानाचे विजेते हास्य तिच्या चेहऱ्यावर दिसू लागते. पण याच वेळी, फारशा सुंदर न दिसणाऱ्या इतर मुली जोडीदाराशिवाय तिष्ठत उभ्या असतात, त्यांची अवस्था अतिशय केविलवाणी होते. आपल्या कमतरतेची अशी जाहिरात त्या क्षणभर विमनस्कपणे पाहतात आणि ती भावना चेहऱ्यावर उमटू नये म्हणून कृत्रिम हसण्याचा विफल प्रयत्न करतात. तेवढ्यात, सुंदर मुलीशी हातात हात घालण्याची संधी गमावलेले ' ऑल्सो रॅन ' वीर या अकेल्या मुलींच्याकडे येतात आणि नृत्याला सुरुवात करतात. या वेळी दोघांच्याही भावना प्रेक्षणीय असतात. नाइलाजाने या मुलीशी नृत्य करावे लागत आहे, ही भावना लपवून तो आनंदी राहण्याचा प्रयत्न करतो आणि त्याची अगतिकता लक्षात न आल्याचे दाखवून ती त्याचा स्वीकार करण्यासाठी हात पुढे करते. नृत्याच्या मधेच घडलेला हा एकच क्षण, पण त्याने मानवी मनाचे व्यापार असे उघडे पडतात. नेहमी तबकडीच्या आड असलेल्या मनगटी घड्याळातील यंत्रावरील तबकडी क्षणभर बाजूला व्हावी, आणि आतले यांत्रिक जीवन उघड व्हावे, तसे या क्षणी वाटते.

मी माझ्या एका मराठी-भाषिक मित्राला ' कॉमनवेल्थ क्लब ' मध्ये नेले होते. तो लंडनला नवीनच आला होता आणि त्याला इंग्रजांचे उच्चार नीट कळत नव्हते. पण येईल त्या प्रश्नाला ' यस् सर '' किंवा ' नो सर ' असे उत्तर तो दडपून देई. माझ्याबरोबर तो तीन तास क्लबमध्ये बसला आणि त्या वातावरणात अगदी रंगून गेला. क्लबची वेळ संपल्यावर

चिटणिसांनी त्याला विचारले, ‘ Did you enjoy the evening Sir ? ’ (‘ तुमचा वेळ चांगला गेला का ? ’) त्यावर आमच्या मराठी माणसाने जोरदारपणे सांगितले, ‘ नो सर. ’ (‘ मुळीच नाही ’) त्याबरोबर चिटणिसांचा चेहरा चांगलाच उतरला. मलाही ऐन वेळी काय बोलावे ते सुचेना. तेव्हा चिटणिसांनी इतर कामाची सबब सांगून काढता पाय घेतला. मी माझ्या मित्राला विचारले, ‘ अरे गृहस्था, त्यानं विचारलं काय आणि तू सांगितलंस काय ? ’ त्यावर तो म्हणाला, ‘ त्यात काय चूक आहे ? ’ मी इथं पूर्वी कधी आलो होतो काय असं त्यांनं मला विचारलं आणि मी ‘ नाही ’ म्हणून सांगितलं ! ’

एका पाकिस्तानी मित्रानेही एकदा असाच प्रकार केला होता. साधारण पन्नाशीची एक ब्रिटिश बाई त्याला म्हणाली, ‘ मी फ्रेंच भाषा शिकत आहे. पण या उतार वयात मी नवीन काही शिकण्याचा प्रयत्न करणं म्हणजे मूर्खपणाच नाही काय ? ’ यावर त्या पाकिस्तानी विद्यार्थ्याने काय म्हणावे ? त्याने शांतपणे सांगितले, ‘ यस् ! यू आर राइट ! ’ तिचा इतका विरस झाला, की ती अगदी रडकुंडीला आली. आपल्याला कुणी म्हातारी म्हणावे हा ब्रिटिश बाईला सर्वात मोठा अपमान वाटतो. आणि तिने स्वत:चा उल्लेख जरी तसा केला, तरी तिची अपेक्षा अशी असते की, ऐकणाऱ्याने म्हणावे, ‘ छे: ! तुम्ही तर अजून अगदी तरुण आहात ! ’ नातवंडे असलेल्या बाईलासुद्धा ‘ यू आर ए ब्युटिफुल गर्ल ’’ असे म्हणावे लागते. आणि आमच्या या पाकिस्तानी गृहस्थाने तर त्या सोज्वळ महिलेला म्हातारी आणि मूर्खही म्हटले होते. थोड्या वेळाने मी त्याला विचारले, ‘ तू त्या बाईला काय म्हणालास याची तुला कल्पना आहे काय ? ’ त्याने पूर्वीच्याच शांतपणे सांगितले, ‘ नाही बुवा. ती काय म्हणत होती हे मला मुळीच समजलं नाही. पण अशा वेळी मी आपला ‘ यस्, यस् ’ म्हणून मोकळा होतो झालं ! उगीच मतभेद व्यक्त करून कुणाला दुखवायचं कशाला ? ’’

आमच्या क्लबमध्ये एक डच मुलगी होती. ती एका भारतीयाच्या

घरी मुले सांभाळीत असे आणि त्या मोबदल्यात तिला थोडे पैसे आणि रहायला-जेवायला मोफत मिळत असे. त्या भारतीयाने एका ब्रिटिश तरुणीबरोबर लग्न केले होते. त्यामुळे ही डच मुलगी क्लबात भेटली, की आम्ही साहजिकच या भारतीय-ब्रिटिश कुटुंबाबद्दल बोलत असू. 'असे विवाह सुखी होतात काय ?' असे मी विचारल्यावर ती म्हणाली, 'अर्थातच सर्वांना लागू पडणारं विधान करणं जरा कठीण आहे. पण अशी अनेक जोडपी सुखी होतात. आणि असे विवाह फसल्याचीही उदाहरणं आढळतात. मला वाटतं, हा प्रश्न त्या दोन देशांच्या संस्कृतीपेक्षा त्या दोन व्यक्तींच्या मनोभूमिकेवर अधिक अवलंबून आहे.'

पाश्चात्य मुलींशी लग्ने करणाऱ्या भारतीयांचा प्रश्न विचार करण्यासारखा आहे, असे मला वाटते. अनेक भारतीय तरुण पाश्चात्य देशात गेल्यावर तेथेच एखाद्या पाश्चात्य मुलीशी लग्न करून स्थायिक होतात आणि मायदेशाला परतत नाहीत. खुद्द महाराष्ट्रातही कुठेतरी कोणीतरी भेटतो आणि म्हणतो, 'आमचा एक नातेवाईक जर्मनीला शिक्षणासाठी गेला, पण बारा वर्षं झाली तरी तो परत आला नाही. आता तो परत येईल असं वाटतही नाही. त्याला कसं परत आणता येईल'?

या करुण कहाण्या सांगण्यात लोकांप्रमाणेच आपल्यालाही प्रश्न पडतो की, आपल्या कुटुंबियांचा, स्नेह्यांचा, संस्कृतीचा त्याग करून परदेशातच राहावे असे आमच्या काही तरुणांना का वाटते? तेथील स्त्रियांची मोहिनी त्यांना का पडते? हे केवळ गोऱ्या कातडीचे आकर्षण आहे काय?

मला वाटते, या सर्व प्रश्नांचा विचार अधिक प्रामाणिकपणे आणि विकाररहित मनाने करण्याची वेळ आता आलेली आहे. अर्थात् हा काही या विषयावरचा प्रबंध नाही. पण महाराष्ट्रातील अनेक घरांत ही समस्या आज दिसत आहे, आणि परदेशातच राहणाऱ्या आणि राहू इच्छिणाऱ्या अनेक तरुणांचे विचार ऐकण्याची मला परदेशात संधी मिळाली. त्यामुळे त्यांचीही बाजू काय आहे, हे आम्ही समजून घेतले तर बरे होईल.

इंग्लंडमध्येच स्थायिक होणाऱ्यांचा एक प्रमुख मुद्दा असा असतो की, भारतात परत गेल्यावर त्यांना इंग्लंडमधील उच्च जीवनमान मिळत नाही. एखाद्याला भारतात आल्यावर वरिष्ठ नोकरी आणि चांगला पगार मिळेल, पण तसा तो सर्वांनाच मिळेल असे नाही. दुसरे असे की, इंग्लंडमधील स्वच्छता, सौंदर्य, सांस्कृतिक वातावरण यांचा अभाव, दोन-चार वर्षे इंग्लंडमध्ये वास्तव्य करून भारतात परत आल्यावर अधिकच जाणवतो. चांगल्या पगारामुळे त्या व्यक्तीला कदाचित् काही सुखसोयी मिळतील, पण भोवतालचा समाज गरीब, हलक्या संस्कृतीचा, क्षुद्र हेवेदावे करणारा आणि जीवन खुरटवून टाकणारा असल्याने आपला तेजोभंग होण्याचीच शक्यता अधिक. उच्च शिक्षण घेऊन परत भारतात आल्यावर अनेकांना अत्यंत कटु अनुभव आले आहेत. त्यांना शोभेशी नोकरी नाही आणि जीवनमानाविषयीच्या अपेक्षा तर वाढलेल्या-अशा कात्रीत सापडल्याने त्यांची अवस्था अतिशय करुण होते. परदेशी शिक्षण घेऊन परत आलेला माणूस अयशस्वी झालेला पाहून भोवतालच्या अनेकांना मोठा आसुरी आनंद होतो. कारण परदेशी जाऊन आलेला माणूस मूर्ख व आपण तेवढे शहाणे असे त्यांना वाटू लागते. ही हेटाळणी कोणत्याही स्वाभिमानी माणसाला असह्य वाटते.

यावर स्वदेशप्रेमाने प्रेरित झालेले लोक विचारतात की, ' परदेशी शिक्षण घेण्यासाठी जाणारे भारतीय जर तिकडेच राहू लागले, तर भारताचे जीवनमान सुधारायचे तरी कसे? ' यावर परदेशी राहणारे लोक म्हणतात की, ' भारताचे प्रश्न इतके अवाढव्य आहेत की, आपल्यासारखा एखाददुसरा माणूस परदेशातच राहिला, तरी ते प्रश्न काही अधिक उग्र होणार नाहीत. ' त्यांचे म्हणणे असे की, मायभूमी, देशभक्ती इत्यादी उदात्त कल्पना साहित्यात किंवा वक्तृत्वात मोठ्या दैदीप्यमान दिसल्या, तरी त्यासाठी आपण आपल्या जीविताचे मातेरे करणार नाही. कुटुंबियांना भारतातच सोडून आल्याबद्दल अशा अनेकांना मनापासून वाईट वाटते खरे, पण त्यांना असेही वाटते

की, आईवडिलांच्या पिढीचे जीवन आता उतरणीवर लागले आहे. जीवनाचा जो काही भलाबुरा लाभालाभ त्यांना मिळायचा, तो मिळून चुकला आहे. आता त्यांचा उरलेला काळ किंचित् सुखात जावा म्हणून आपण आपले सर्व जीवन मन:स्तापात आणि भौतिक दु:खात घालवायचे की काय ? या लोकांवर बळजबरीने देशभक्ती लादण्याचा प्रयत्न करताना, काही अगदी थोडे अपवाद वगळता प्रत्येक माणूस कमीअधिक प्रमाणात स्वार्थी असतो आणि सुखात असणारा माणूस संभाव्य दु:खी जीवनाकडे सहज वळणार नाही, याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. त्यांच्या जागी आपण असतो तर काय केले असते असे अनेकांनी मनाला विचारले, तर बाहेर ते जे बोलतात त्याच्याविरुद्ध त्यांच्या मनाचा कौल लागलेला त्यांना आढळेल.

पाश्चात्य तरुणींचे आकर्षण म्हणजे केवळ गोऱ्या कातडीची नवलाई हा उथळ विचारही सोडून दिला पाहिजे. ज्यांनी पाश्चात्य तरुणींशी विवाह केला आहे किंवा अगदी निकटची मैत्री केली आहे, (विवाह न करताही काही भारतीय पाश्चात्य मुलींबरोबर नवराबायकोप्रमाणे राहिले आहेत) अशा अनेकांनी खाजगीरीत्या स्नेह्यांना सांगितले आहे की, पाश्चात्य स्त्रिया ज्या पद्धतीने 'कम्पॅनियनशिप' देऊ शकतात, त्या पद्धतीचे सुबुद्ध साहचर्य देण्यास बहुतेक हिंदी स्त्रिया असमर्थ असतात. पाश्चात्य स्त्री म्हणजे एक वेगळे, स्वतंत्र, बाणेदार पण प्रेमळ व्यक्तिमत्व असते; पण भारतीय स्त्री ही नवऱ्याची एक छायाच असते. तिला स्वतंत्र व्यक्तिमत्व नसते. त्यामुळे केवळ नवऱ्याच्या व मुलांच्या भौतिक सुखसोयी पाहणे हेच आपले जीवनकार्य असे ती समजते. अर्थातच, पाश्चात्य स्त्रियांच्या तोडीच्या महिला आपल्या देशात नाहीतच असे नव्हे. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प असते. विशेषत: मध्यमवर्गीयातील जे तरुण परदेशी जातात त्यांना परदेशात ज्या रूपवती व बुद्धिमान मैत्रिणी किंवा बायका मिळतात, त्यांच्या तोडीच्या स्त्रिया भारतातील अगदी वरच्या वर्गातील लोकांनाच मिळणे शक्य असते. त्यामुळे साहजिकच आमच्या तरुणांना त्यांचे दुर्दम्य आकर्षण वाटते. म्हणजे

त्यांना वाटणारी ही ओढ केवळ गोऱ्या कातडीची नसून, ती सौन्दर्याबरोबरच संस्कृतीची, विचारांची आणि बुद्धिमत्तेचीही असते.

◇ ◇ ◇ ◇

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४८...
२६८९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# चार : लष्करच्या भाकऱ्या

रात्री अचानकपणे मला जाग आली. थंडीचा कडाका असह्य झाला होता. मी अंगावर पांघरुण आहे का हे चाचपून पाहिले. एक, दोन, तीन-चार रग अंगावर होते. त्याशिवाय अंगात गंजिफ्रॉक, त्यावर शर्ट, त्यावर स्वेटर आणि वर कोट होता. आणि तरीही फ्रीझरमध्ये झोपल्यासारखे वाटत होते. अंगाखालच्या गादीत कांदे-बटाटे भरले आहेत की काय, असा प्रश्न पडला. मी कुठे आहे याचा क्षणभर बोधच होईना. सभोवती सारा अंधार होता. हाताने आजूबाजूला चाचपडू लागलो, तेव्हा जमिनीत रोवलेली एक काठी आणि तीवर टांगलेला कंदील हाताला लागला. कंदिलाच्या किंचित् वर हाताला कापड लागले. कापड-तंबूचे कापड.

-आणि एकदम माझ्या लक्षात आले की, आपण ब्रिटिश सैन्यात आहोत. लंडनपासून सुमारे पंचेचाळीस मैलांवर असलेल्या 'फिंगरिंग हो' नावाच्या गावी ब्रिटिश सैन्याचे केंद्र होते, तिथे मी तात्पुरती नोकरी धरली होती. या उघड्या माळावर, मध्यभागी फार तर साडेतीन फूट उंच असलेले

तंबू ठोकलेले होते. त्या एकेका लहानशा तंबूत आम्ही तिघे-तिघे राहत होतो. आमच्या तंबूत माझ्याशिवाय एक आफ्रिकन आणि एक भारतीय असे दोघेजण होते. त्या भारतीय विद्यार्थ्यांच्या सूचनेवरूनच मी सैन्यातली नोकरी पत्करली होती.

ईस्टरची तीन आठवड्यांची सुट्टी नुकतीच सुरू झाली होती. या सुट्टीचा कसा उपयोग करून घ्यावा याचा मी विचार करीत असतानाच माझा एक मित्र येऊन म्हणाला, "सुट्टीत काही काम हवं आहे का?" मी म्हटले, "खरं म्हणशील, तर काम नको आहे. पण पैसा हवा आहे! पण काम केल्याशिवाय पैसा मिळत नाही. लंडनमध्ये राहायचं तर आठवड्याला दीड-दोनशे रुपये खर्च होतात. तेव्हा काम केल्यावाचून गत्यंतरच नाही." त्यावर माझ्या मित्राने सांगितले, "मी पंधरा दिवसांसाठी एक नोकरी मिळवली आहे. त्यांना आणखी किमान चार लोक हवे आहेत. पण नोकरी जरा कष्टाची आहे. म्हणजे काम कष्टाचं नाही. पण थंडी असली तरी इतर सैनिकांप्रमाणेच तंबूत राहावं लागेल. जेवणखाण जवळजवळ मोफत, आणि आठवड्याला सहा पौंड पंधरा शिलिंग वेतन. चालेल?"

मी विचार करू लागलो. कारण लंडनला राहण्याचा आठवड्याचा दीडशे रुपये खर्च वाचून पुन्हा वर शंभर रुपये मिळणार होते. आणि सैन्यातल्या जीवनाचा अनुभव तर घेऊ. अर्थात् हे जीवन कंटाळवाणे असावे हे साहजिकच होते. पण खरा परदेश पाहायचा असेल, तर तेथील जीवनाची विविधताही पाहिली पाहिजे, या विचाराने मी रुकार दिला.

मग आम्ही दोघेही 'नॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स्' च्या कचेरीत गेलो. तेथील अधिकाऱ्यांनी कागदपत्र पाहून सांगितले, "हो, फिंगरिंग हो कँपमध्ये 'हेल्पिंग हँड्स्'च्या चार जागा आहेत."

मी दहा शिलिंग भरले आणि नोकरीवर हजर होण्यासंबंधीचे त्या विद्यार्थी संघटनेचे कार्ड घेतले. हे कार्ड म्हणजे नोकरीची हमीच असते. कारण ज्यांना नोकर हवे असतात, ते लोक विद्यार्थी-संघटनेकडे हव्या

असलेल्या नोकरांची संख्या, कामाचे स्वरूप, वेतन व मुदत यांचे टाचण पाठवितात. मग विद्यार्थी-संघटना तेवढ्याच विद्यार्थ्यांना कार्डे देऊन नोकरीच्या जागेवर पाठविते. नोकरीसाठी वारंवार मुलाखती, खेटे घालणे आणि कालापव्यय, असा प्रकार या संघटनेच्या बाबतीत घडत नाही.

संघटनेने दिलेली कार्डे घेऊन आम्ही दोघे लंडनच्या परिसरातील एका सैनिक केंद्रात गेलो. तिथे कर्नल हार्वे यांनी आमची 'मुलाखत' घेतली. ही मुलाखत म्हणजे केवळ आम्हाला कोणते काम करावे लागेल याची कल्पना देण्यापुरतीच होती. कारण आमची निवड आधीच झालेली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता आम्ही आमच्या कपड्यांच्या बॅगा घेऊन त्या केंद्रावर गेलो. तेथे सैन्याच्या आठदहा ट्रक्स तयारच होत्या. त्यातील बहुतेकात सैनिक होते. आमच्यासारखे काम करणारे सातआठजणच होते. त्यात एक आयरिश होता आणि बाकीचे सर्वजण आफ्रिका, भारत, सिलोन असे राष्ट्रकुटुंबातील देशांचे विद्यार्थी होते.

वाटेत चहासाठी एका ठिकाणी थांबून आम्ही एक वाजण्याच्या सुमाराला फिंगरिंग हो छावणीत पोचलो. हा इंग्लंडमधील अगदी ग्रामीण भाग होता. गेल्यावरोबर आम्हाला जेवण देण्यात आले. त्यानंतर आम्हा सर्वांना एका कॅप्टनने व्याख्यानवजा सूचना दिल्या. कोणी कोणत्या तंबूत राहायचे याची त्याने कल्पना दिली. त्याच्या सूचनेप्रमाणे आम्ही क्वार्टरमास्टरकडे गेलो आणि चार रग, जेवणाची थाळी, कंदील, भांडे इत्यादी वस्तू घेऊन आपापल्या तंबूकडे गेलो. आम्हाला दोन पिशव्या दिलेल्या होत्या. एक पिशवी सुमारे सहा फूट लांब आणि तीन फूट रुंद होती. क्वार्टरमास्टरने आम्हाला सांगितले होते की, या पिशव्यात गवत भरायचे आणि त्याची गादी व उशी करून झोपायचे.

त्याप्रमाणे आम्ही पाठीवर पिशव्या टाकल्या आणि छावणीच्या एका कडेला असलेल्या एका डोंगराएवढ्या गवताच्या ढिगाऱ्याकडे गेलो. हे अंतर निदान पाऊण मैल तरी असेल. तेथे दोन सैनिक बंदुका घेऊन पहारा

करीत होते. आम्हाला वाटले, गवताची चोरी होईल म्हणून तर हा पहारा नाही ना? पण तसे नव्हते. छावणीभोवती सर्वच नाक्यांवर असा पहारा होता. त्या अवाढव्य पिशव्यात गवत चांगले भरणे हे जिकीरीचेच नव्हे, तर जवळजवळ अशक्यच काम होते. कारण काही झाले तरी गवत हे कापसासारखे नीट चापूनचोपून बसविता येत नव्हते. मात्र हे गवत आपल्याकडील गवतासारखे नव्हते, हे एक सुदैवच! ते मऊ होते. पण तरीही ते बोचत होते आणि त्याच्या गाठीगाठी होत असल्याने कांद्याबटाट्याच्या पोत्यासारखे ते धूड दिसत होते. पण त्याला आता काही उपाय नव्हता. गवताच्या ढिगाऱ्याकडे येताना आम्हाला पाऊण मैलाचे अंतर फार मोठे वाटले नाही, पण आमच्या अवजड गाद्या आणि उशा घेऊन तेच अंतर तोडताना मात्र 'नको ही लष्करची नोकरी' असे होऊन गेले.

तोपर्यंत चहाची वेळ झाली. आम्ही आमची भांडी घेऊन चहाच्या रांगेत उभे राहिलो. चहा व केक्-अंडी खाऊन झाल्यावर, काम करणाऱ्या आम्हा आठजणांना मुदपाकखान्यात नेण्यात आले. तेथे एका कॅप्टनने आमचे स्वागत करून आम्हाला आमच्या कामाची कल्पना दिली. तो म्हणाला, "सुरुवातीला तुम्ही बटाटे सोला."

आमच्यापैकी प्रत्येकाला घमेलेभर बटाटे आणि स्टेनलेसचे एक बारीक हत्यार देण्यात आले. मग आम्ही आपले त्या गरीब बिचाऱ्या बटाट्यांची कातडी सोलीत बसलो. हे बटाटे उकडलेले नसून कच्चेच होते आणि ते अगदी थंड पाण्यात भिजविलेले होते. त्यामुळे इंग्लंडच्या त्या थंडीत आमची बोटे अधिकच थंड वाटू लागली. पाश्चात्य सैन्यात एखाद्याच्या हातून प्रमाद घडला तर त्याला बटाटे सोलण्याची शिक्षा का देतात हे त्या वेळी माझ्या चांगले लक्षात आले. कारण हे काम अतिशय किचकट आणि कंटाळवाणे असते. अर्थात् आम्हाला दिलेली ही शिक्षा नव्हती. आम्हाला असे सांगण्यात आले होते की, मुदपाकखान्यातील बटाटे

सोलण्याचे यंत्र नादुरुस्त झालेले असल्यानेच थोडा वेळ आम्ही ते काम करायचे होते आणि ते खरे होते. साधारण अर्ध्या-पाऊण तासातच यंत्र दुरुस्त झाले आणि आम्ही मोठ्या आनंदाने आमच्यासमोरची घमेली त्या 'पिठाच्या गिरणी' वजा यंत्रात टाकली. त्यातून बाहेर पडलेल्या बटाट्यांच्या अंगावर जर काही सालडी राहिली, तर ते बटाटे पुन्हा यंत्रात टाकायचे-एवढेच आमचे काम राहिले. हे काम तासभर झाले असेल-नसेल तोच पाच वाजले आणि जेवणाची घंटा झाली. विराटाच्या मुदपाकखान्यातील आमचे काम थोड्या वेळापुरते तरी थांबले.

त्या छावणीत संध्याकाळचे जेवण पाच वाजताच होत असे. जेवण व चहा एकाच वेळी मिळे. जेवणाची घंटा झाली की, सर्वांनी आपापल्या थाळ्या, भांडी आणि काटे-चमचे घेऊन कॅन्टीनसमोर जायचे. तेथे चार-सहा टेबले होती. त्या टेबलांवर जेवणाचे पदार्थ ठेवलेले असत आणि सैन्याचे वाढपी प्रत्येकाला वाढीत. रांगेने उभे राहून आपले जेवण घ्यायचे आणि 'डायनिंग हॉल' म्हणून जो मोठा तंबू होता, त्यातील बाकड्यांवर बसून बोजड फळकुट्यांच्या टेबलावर खायचे. जेवणात दोनतीनच ठळक पदार्थ असत; पण ते भरपूर असत. चवीबद्दल म्हणाल तर काही विचारू नका. उकडलेल्या बटाट्यांचा लगदा, उकडलेली अंडी, तांदळाची खीर, टोस्ट असे हे पदार्थ असत. त्यात तिखट अजिबात नसे आणि मीठ मोजकेच असे. त्यामुळे आम्हाला लष्करातील जेवण म्हणजे, 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' या वचनाचे प्रत्यंतरच वाटत होते.

जेवण होईपर्यंत अंधार पडे. कारण सूर्य पाच-साडेपाच वाजताच मावळत असे. अंधार पडल्यानंतरचे जीवन म्हणजे अगदी जीव घुसमटून टाकणारे होते. कारण अंधारानंतर कोठे बाहेर फिरायला जायची सोय नसे. तंबूत धड उभेही राहता येत नसे, इतका तो अपुऱ्या उंचीचा होता. रात्री आठनंतर दिवे मालवलेच पाहिजेत असा कडक नियम होता आणि एका मिणमिणत्या कंदिलाच्या प्रकाशात तिघांना वाचण्याचाही उत्साह नसे. अंधार

पडल्यानंतर त्या उघडया माळावर थंडीचा जोर वाढत असे. तंबूत अंधार करून पहाटेपर्यंत झोपायचे-किंवा झोपण्याचा प्रयत्न करायचा, एवढेच आमच्या हाती होते. सैन्यातल्या त्या काळात हाच वेळ सर्वांत कंटाळवाणा जात असे.

सकाळी साडेसहा वाजता बिगुल होई. त्याबरोबर सर्व सैनिक उठत. कारण त्यांना ब्रेकफास्टनंतर परेड असे. आम्हाला परेडला हजर राहावे लागत नसे. पण बऱ्याच वेळा पहाटे जाग येई आणि रात्री आठपासून पडून राहिल्यामुळे कंटाळाही आलेला असे. म्हणून आम्ही कधीकधी उठून परेड-ग्राउंडवर जात असू. ऐन थंडीच्या कडाक्यात, दिसते न दिसते अशा अंधुक प्रकाशात चाललेली ती सैनिकांची कवायत मोठी कौतुकास्पद दिसे. धुक्यात, डोंगर-पठारावर, थंडीच्या माऱ्यातले ते सारे दृश्यच मोठे अद्‌भुत दिसे. सैन्याला हुकूम देणाऱ्या अधिकाऱ्यांचा बंदुकीच्या गोळीसारखा आवाज आणि त्या आवाजासरशी खडाडणारे बूट, बंदुकांवर हात आपटल्याचे आवाज, हे अजूनही अनेकदा कानात घुमतात.

सकाळी उठून सैनिक त्या दिव्याच्या उजेडातही दाढी करीत. पण आम्हाला तशी घाई करण्याचे कारण नसे. म्हणून आम्ही दहा-अकरा वाजता दाढी, आंघोळ...अरे बाप रे! त्या छावणीतल्या पहिल्या आंघोळीची आठवण....

आम्ही छावणीत आल्यावर दुसऱ्याच दिवशी माझी नि एका विद्यार्थ्याची नेमणूक स्टोअरमध्ये करण्यात आली. तिथे वस्तू काढून द्यायच्या एवढेच काम होते. सकाळी ब्रेकफास्ट झाल्यावर तास-दीड तास आम्ही काम केले. मग माझा एक आफ्रिकन मित्र मला म्हणाला, 'चल, आपण अंघोळ करून येऊ या.'

मी टॉवेल, साबण, कपडे घेऊन स्नानगृहाकडे गेलो. तोही कपडे घेऊन माझ्याबरोबर चालू लागला. लंडनमध्ये सार्वजनिक स्नानगृहे असतात. प्रत्येक स्नानगृहात आतून कडी लावण्याची सोय असते व त्यात टब्बची

किंवा शॉवरचीही सोय असते. सैन्यातील स्नानगृहे इतकी अद्ययावत् नसली, तरी जवळजवळ तशीच असतील असे मला वाटत होते. मी आणि माझा मित्र स्नानगृहात गेलो. तिथे जाताच त्याने मला कपडे काढायला सांगितले आणि तो स्वत: कपडे काढू लागला. मी शर्ट, स्वेटर नि पँट काढली आणि टॉवेल व साबण घेऊन त्याची वाट पाहू लागलो. त्या गृहस्थाने आपले सर्वच कपडे काढले आणि दिगंबरावस्थेत उभा राहून तो मला म्हणाला, 'अरे! तू आंघोळ करणार ना? मग कपडे काढ की!' आंघोळीसाठी कपडे काढणे म्हणजे पुन्हा नैसर्गिक अवस्थेत जाणे असे मला वाटले नव्हते. त्यामुळे मला त्या प्रकाराची अतिशय लाज वाटू लागली. ते पाहून तो हसून म्हणाला, 'चल, मीच तुला आत नेतो!'

-आणि आम्ही आत जाऊन पाहतो तो काय? एका प्रचंड हॉलमध्ये शंभर-दीडशे ब्रिटिश सैनिक संपूर्णपणे नग्न होऊन अगदी मनमोकळेपणाने स्नान करीत होते. खाली दगडी फरशी होती आणि डोक्यावर भोके असलेल्या नळ्यांतून पाण्याचे फवारे उडत होते. पाचसहा वर्षांची मुले नग्न होऊन छोटट्या ओढ्यात किंवा हौदात थट्टामस्करी करीत आनंदाने जलविहार करतात, तसे हे सामुदायिक नग्न-स्नान चाललेले होते. मधूनच कोणी फवाऱ्याबाहेर उभा राहून सिगरेट ओढीत होता आणि कोणी उच्चरवाने गात होता. असे स्नान करणे म्हणजे काही वेगळे आहे असा विचारही कोणाच्या मनाला शिवत नव्हता. अंगावर कपडे घालून जितक्या सहजपणे एकमेकांशी बोलतात, तितक्याच सहजपणे हे सैनिकी-स्नान चालले होते. हे कल्पनातीत दृश्य पाहून मला एवढा धक्का बसला, की नंतर ही सामुदायिक स्नानाची वेळ टाळूनच मी त्या बाजूला जाऊ लागलो!

सकाळी सात-साडेसातच्या सुमाराला छावणीत एक वृत्तपत्रविक्रेता येत असे. 'कोल्चेस्टर' या गावाहून तो स्वत:च्या मोटारीतून येत असे. सैन्यात सर्वात लोकप्रिय असलेले वृत्तपत्र म्हणजे 'डेली मिरर.' हे पत्र अगदी सोप्या भाषेत रसरशीत बातम्या देई. अनैतिक संबंधाच्या खटल्याला

या पत्रात तर पहिल्या पानावर ठळक जागा मिळे, पण एखादा देश स्वतंत्र झाला तर त्याची बिनशीर्षकाची बातमी दोन-तीन ओळीत येई. वादग्रस्त व्यक्ती-विशेषत: सिनेमातील नटया, तमाशात काम करणाऱ्या सुंदरी, इत्यादींची भडक चित्रे त्यात येत. याशिवाय पानभर व्यंगचित्रे, गुप्त बातम्या, प्रमुख व्यक्तींची लफडी असा सनसनाटी मजकूर असलेले हे दैनिक जवळजवळ प्रत्येक सैनिक विकत घेई.

रविवारी आम्हाला संपूर्ण दिवस सुट्टी असे. एका रविवारी मी या मोटारवाल्या वृत्तपत्रविक्रेत्याबरोबर कोल्चेस्टर गावी गेलो. या विक्रेत्याचे नाव बॉबर असे होते आणि तो कोल्चेस्टरमध्ये अलेक्झांड्रा रस्त्यावर राहत असे. या लष्करी महत्त्वाच्या गावातील दोन रस्त्यांची नावे भारतीय आहेत, हे पाहून मला अतिशयच आश्चर्य वाटले. एका रस्त्याचे नाव 'हैद्राबाद बॅरक्स' असे असून दुसऱ्या रस्त्याचे नाव 'गुजरात बॅरक्स' असे आहे. त्या वृत्तपत्र एजंटाच्या दुकान-कम्-घरात मी गेलो तेव्हा त्याच्या घरी एक लहानसा छापखानाच दिसला. त्याबद्दल मी त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, "आम्ही जी वृत्तपत्रं विकतो ती अद्ययावत् करण्याचा हा प्रयत्न आहे. लंडनहून माझ्याकडे येणाऱ्या वृत्तपत्रात सुमारे अर्धा कॉलम कोरा ठेवण्यात येतो. मग पहाटे मला वृत्तपत्राच्या कचेरीतून फोन येतो. त्यात मला ताज्या बातम्या कळवण्यात येतात. सायंदैनिकासाठी दुपारी रेसच्या निकालाचा फोन येतो. तेवढा मजकूर मी इथं कंपोज करून घेतो आणि त्या कोऱ्या अर्ध्या कॉलमात छापतो. त्यामुळं कोणत्याही महत्त्वाच्या बातमीला आमचा वाचक मुकत नाही."

कोल्चेस्टरला एक जुना किल्ला आहे आणि त्यात अनेक जुन्यापुराण्या वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. पण लंडनमध्ये मी इतकी वस्तुसंग्रहालये पाहिली होती की, या संग्रहालयात मला विशेष काही वाटले नाही. कोणत्या तरी समुद्रात एके काळी बुडालेल्या ब्रिटिश जहाजाचा शिडाचा दांडा किंवा एखादे तीनशे वर्षापूर्वीचे फावडे ठेवून त्याला 'सांस्कृतिक ठेवा' म्हणण्याची

अतिरेकी प्रवृत्तीच या संग्रहालयात अधिक दिसली. पण कोल्चेस्टरचा 'हाय-स्ट्रीट' किंवा हमरस्ता मनोरम वाटला. या रस्त्यावर जी सहजता आणि निर्व्याजपणा दिसला, तो लंडनसारख्या मोठ्या शहरातल्या हमरस्त्यावर दिसत नाही. लंडनच्या रस्त्यावरील लोक अगदी टापटिपीचे, परीटघडीचे कपडे घालून फोटोला निघाल्याप्रमाणे वाटतात, तर कोल्चेस्टरसारख्या लहान गावातील उपाहारगृहात बसून चहा घेता घेता रस्त्यावर उगीच दृष्टी ठेवून वेळ काढणे ही एक सुखद 'लक्झरी' आहे.

रविवारी कोल्चेस्टरला जाताना आम्हाला कधी बसने जावे लागले नाही. केव्हाही रस्त्यावर उभे राहून कोल्चेस्टरकडे जाणारी कुणाचीही मोटार थांबवावी आणि तीतून जावे. या भागात भारतीय लोक जवळजवळ नाहीतच. त्यामुळे आमच्यासारखा एखादा 'लिफ्ट' साठी खूण करू लागला, तर मोटारवाले लगेच थांबत आणि आम्हाला घेऊन जात. जाता जाता आमच्या देशाची, आमची थोडीफार चौकशी करीत. कोणीतरी पूर्वी कधीतरी भारतात आलेला असे आणि मग तो आठवणींच्या अडगळीतून एखादी स्मृती, तीवरील धुरळा झटकून आमच्यापुढे ठेवी. आमची 'फिंगरिंग हो' छावणी कोल्चेस्टरपासून पाच मैल होती आणि कोणाशी तरी गप्पा मारीत हा वेळ चटकन जात असे.

रविवार हा छावणीतील एकसुरी जीवनातील विरंगुळा होता, तसाच 'बार रेस्टॉरंट' हा आणखी एक विरंगुळा होता. एका मोठ्या तंबूत हा बार होता. हा बार 'नॅफी' या संस्थेने चालविलेला होता. नॅफी हे 'नेव्ही, आर्मी, एअरफोर्स इन्स्टिटयूट' चे संक्षिप्त रूप आहे. त्यात बीअर, सायडर यासारखी न चढणारी (non-intoxicating) पेये आणि अंडी, बटाटयाच्या चकत्या वगैरे खाद्यपदार्थही असत. सैन्यात मोफत खाद्यपदार्थ इतके मिळत असत, की या बारमध्ये खाद्यपदार्थांची फारशी विक्री होत नसे. पण मद्याची मात्र भरपूर विक्री होई. या बारमध्ये मेरी आणि ज्युली या दोन विक्रेत्या मुली होत्या. त्या सबंध छावणीत हे दोनच 'पुरुषेतर' मानव असल्याने,

सारे सैनिक त्यांची अतिशय थट्टामस्करी करीत आणि त्यांची खोडी काढीत. बारच्या फलकावर 'आजचे ताजे जिन्नस' या शीर्षकाखाली 'POTATO CHIPS' असे खडूने लिहिलेले असले तर तासाभरात त्या ठिकाणी 'MARY'S HIPS' अशी अक्षरे दिसायची 'BREAD AND BUTTER' ऐवजी 'BREAST AND BUTTER' असा फलक लावलेला असायचा. आणि 'FISH AND CHIPS'ऐवजी JULIE'S LIPS'असा बदल झालेला आढळायचा. 'FRIED EGGS'ऐवजी 'FRIED FROGS' 'CHIPPED POTATOES'ऐवजी HIPPES TOES'असे पाठभेदही दिसत. बीअर किंवा खाद्यपदार्थ घेताना, त्या दोघींशी भेटीगाठी ठरवायची सैनिकांत मोठी अहमहमिका लागलेली असे. त्यांच्याकडून पेये किंवा खाद्यपदार्थ घेताना ते त्यांच्या हाताला ओढायचे, गालांवर टिचक्या मारायचे किंवा दंड धरायचे. या नर्म प्रणयाला त्या हसून संमतीच देत. पण कोणी त्यांच्या ओठावरून हात फिरवून चुंबन घ्यायचा प्रयत्न करी, तेव्हा त्या किंचित् नापसंती-तीही खोटी-दाखवीत, एवढेच. काही वेळा मात्र बारमधील वातावरण फारच गोंधळाचे होई. कोणी मोठ्याने गाणी म्हणत, कोणी थाळ्या आपटीत, आणि मेरीच्या व ज्युलीच्या कमरेभोवती हात टाकून त्यांना नृत्य करण्याचा आग्रह करीत. अशा वेळी मिलिटरी पोलीस हस्तक्षेप करीत. दंगलखोर सैनिकांना धरून ते दमदाटी करीत आणि त्यांना तंबूबाहेर काढीत.

एका संध्याकाळी असाच गोंधळ झाला. तंबूत दोन लष्करी पोलीस होते पण दंगा करणाऱ्यांची संख्या फार मोठी होती. पोलिसांनी शिट्ट्या वाजवल्या आणि बाहेरून आणखी दहाबारा पोलीस धावले. कित्येक सैनिक जोरजोराने गाणी म्हणत होते आणि ओरडत होते. त्या दोन तरुणींची अगदी केविलवाणी अवस्था झाली होती. कारण एकदम सातआठजणांनी त्यांना वेढले होते. मी आणि माझा मित्र बीअरच्या बाटल्या हातात धरून उभे राहिलो. इतक्यात तंबूतील विजेचे दिवे अचानकपणे गेले. कोणीतरी ते वात्रटपणाने मुद्दाम घालविले असावेत. त्याबरोबर तो गोंधळ एकदमच

वाढला. टेबले पडली, बाटल्या फुटल्या आणि वेगवेगळ्या आवाजांनी वातावरण गच्च भरून राहिले. लष्करी पोलिसांनी हातातल्या बॅटऱ्या लावून त्या दोघींना सुरक्षित केले. आम्हाला हा साराच प्रकार नवा आणि अजब वाटल्याने काय होणार याची चिंता वाटू लागली. पण मग विशेष काही झाले नाही. थोड्याच वेळात गॅसच्या बत्त्या आणण्यात आल्या. चारसहा सैनिकांना तंबूबाहेर काढण्यात आले, पडलेली टेबले सरळ करण्यात आली आणि ग्रामोफोनच्या रेकॉर्डस्‌च्या आवाजात पुन्हा मद्यपान आणि गप्पाटप्पा चालू झाल्या. मात्र, त्यापूर्वीच्या त्या अंधाऱ्या क्षणभरात आमच्या मनात अनेक भलत्यासलत्या कल्पना चमकून गेल्या.

छावणीतील सैनिक आमच्याशी सौजन्याने वागत, पण अधिक मैत्री करीत नसत. ते आमच्याशी औपचारिकपणे वागत. त्यामुळे आमच्यापैकी कोणाचाच त्यांच्याशी जिव्हाळ्याचा संबंध आला नाही. लष्कराच्या मोटारी वारंवार कोल्चेस्टरला किंवा इतरत्र जात. त्यावेळी 'तुम्ही गावात येता का ?' असे आम्हाला ते विचारीत. कधी त्यांच्याबरोबर गेलो, तरी ठराविक चारसहा प्रश्नांच्यावर संभाषण प्रगती करीत नसे. 'तुमचा देश कोणता ? इंग्लंडमध्ये तुम्ही केव्हा आलात ? काय शिकता ? इंग्लंड आवडलं का ?' अशा आशयाचे हे 'फॉर्मवजा' प्रश्न असत.

छावणीत अधूनमधून सिनेमा दाखविला जाई. त्यासाठी दहा पेन्स दर असे. त्यावेळी सिनेमा पाहण्याकडे सैनिकांचे क्वचितच लक्ष असे. सिनेमाच्या निमित्ताने गाणी म्हणणे, आरडाओरडा करणे, दंगा करणे हेच सिनेमाच्या तंबूत मुख्य उद्योग असत. अधिकारीवर्ग या चित्रपटांना हजर राहत नसे. मला वाटते, बार आणि चित्रपट या सोयी सैनिकांच्या उत्साहाला वाट करून देण्यासाठी मुद्दामच योजण्यात आलेल्या असाव्यात. कारण या दोन्ही ठिकाणी सैनिकांनी कमीअधिक दंगा केला, तरी लष्करी पोलीस कधी कडक उपाययोजना करीत नसत. तात्पुरती शांतता स्थापन केली की, लष्करी पोलीस दूर होत. फार तर काही सैनिकांना तंबूबाहेर नेण्याहून

अधिक कडक उपाययोजना होत नसे. मात्र सिनेमा पाहताना आणि छावणीत इतरही अनेक वेळा सैनिकांच्या तोंडी अनेक अस्सल अश्लील शब्द यायचे. आपल्याकडे ग्रामीण भागात निदान ग्रामीण साहित्यात-'च्यायला' हा शब्द जसा वारंवार वापरला जातो, तसाच इंग्रजीतील 'चार-अक्षरी' शब्द सैनिकांच्या तोंडून पदोपदी ऐकू येई. लंडनच्या जादा सुसंस्कृत ब्रिटिशांची मधुर भाषा ऐकण्याची आम्हाला सवय झाली होती, त्यामुळे विरोधाने ही शिपाईगड्यांची भाषा कानाला अधिकच तिखट आणि रांगडी वाटे.

दर शनिवारी लंडनहून आमचा सर्वांचा पगार घेऊन लष्कराची मोटार येई. आम्हाला आठवड्याला सहा पौंड पंधरा शिलिंग पगार होता, पण त्यातून जेवणाचे आणि राहण्याचे नाममात्र साडेदहा शिलिंग कापले जात. त्याशिवाय 'नॅशनल [illegible]' चे तेरा शिलिंग कापले जात. इंग्लंडमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाला हे पैसे द्यावे लागतात. त्याबदली त्याला औषधोपचार मोफत मिळतो. सैन्यातल्या जेवणाची चव फारशी विलोभनीय नव्हती-किंबहुना सबंध ब्रिटनच्याच अन्नाबद्दल हे विधान करता येईल.-तरी पण खाणेपिणे स्वच्छ आणि भरपूर मिळे. शिळे अन्न ठेवायला सैन्यात बंदी होती. त्यामुळे दररोज उरलेले अन्न फेकून देण्यात येई. स्वयंपाकघर, भोजनगृह, स्नानगृह अतिशय स्वच्छ ठेवण्यात येत, इतकेच नव्हे तर छावणी स्वच्छ आहे की नाही ते पाहण्यासाठी काही इन्स्पेक्टर्स अधूनमधून तपासणीसाठी येत असत.

सैन्यातल्या त्या चौदा काळोख्या दिवसात कधी कधी मन काळवंडून जाई. वाटे, आपण कोण, कुठले, आणि आता इथे हजारो मैलांवर येऊन बटाटे सोलीत काळ कंठायचा, याला काय अर्थ आहे? आयुष्यात विविध अनुभव असावेत हे खरे, पण केवळ हमालासारखी अंगमेहेनतीची कामे म्हणजे काय बौद्धिक चालना देणारा अनुभव? पण खरोखर अनुभव म्हणजे तरी काय? केवळ सुखाने माणसाला जीवनाची यथार्थ कल्पना येणार नाही, असे म्हणतात. स्वतःला दुःख देऊन परमेश्वराचे स्वरूप दिसावे म्हणूनच

नाही का आपल्या धर्मात तपश्चर्येचा मार्ग सांगितला ? पण असे बुद्धिवादाने स्वत:ला पटविण्याचा प्रयत्न केला, तरी त्या नीरस जीवनात काही स्वारस्य वाटेना. कारण केवळ दु:खाचा अनुभव घेण्यासाठी सुखाचा जीव अडचणीत टाकण्यात काही अर्थ नाही, असेही माझ्या मनाने घेतले. मी सैन्यात येऊन तेरा दिवस झाले होते. आणखी एकच दिवस उरला होता. तेव्हा आमच्या कॅप्टनने मला आणि माझ्याबरोबरच्या लोकांना बोलावून घेऊन विचारले, ' आम्हाला आणखी दोन आठवडे तुमची गरज आहे. तुम्ही राहाल काय ? अर्थात् हा हुकूम नाही, विनंती आहे. तुम्हाला परत जायचं असलं तर तुम्ही जाऊ शकता. '

पणं आमच्यापैकी एकहीजण त्या लष्करी छावणीत अधिक काळ राहायला तयार झाला नाही. शेवटच्या दिवशी रात्री तर आम्ही परत लंडनच्या उबदार, रंगेल, मनमोकळ्या संस्कृतीत जाणार म्हणून अतिशय सुखावलो. वैचित्र्याचा आणि खडतर जीवनाचा अनुभव घ्यायचा असे कितीही ठरविले, तरी लंडनचे सुखासीन जीवन, वाटेल तेव्हा चित्रपट, नृत्यगृह, मद्य, बस, आगगाडी, रुचकर अन्न, मोकळी हवा, उबदार खोली, नवीं नवी मासिके, नव्या कागदांचा सुवास देणारे कोरे करकरीत ग्रंथ, लिप्स्टिकने रंगविलेल्या ओठांवरून मादकपणे जीभ फिरविणाऱ्या मस्त कामिनी, झिम्झिम् पडणाऱ्या पावसात मधेच उन्हाचे किरण पडल्यावर ' हाइड पार्क ' किंवा ' रीजंटस् पार्क ' मध्ये मैत्रिणीबरोबर मारलेला उत्साही फेरफटका, वर्गातल्या मुलांनी वर्ग संपल्यावर बीअर घेताना सांगितलेल्या चावट कथा, ' सो हो ' आणि ' पिकॅडिली सर्कस ' या भागात वेश्यांच्या वस्तीत उगीचच मारलेल्या आंबटषौकी चकरा, ब्रिटिश म्युझियममध्ये चाललेले एखाद्या तत्त्वज्ञाचे व्याख्यान, क्लबमध्ये आज कोणती नवी मुलगी येईल असे अपेक्षापूर्ण विचार....बस्स् ! ही अनुभवांची रंगसंगती सैन्यातल्या एकसुरी, गंभीर, कठोर जीवनाला यायची नाही.

अखेर मोठ्या कष्टाने चौदा दिवसांचा गाडा ढकलून आम्ही पंधराव्या

दिवशी १३ मे १९५६ रोजी लंडनला परत जाण्यासाठी सिद्ध झालो. आणि मग अचानकपणे मला वाटू लागले, हे जीवन वाटले होते तितके काही कंटाळवाणे नाही. सैनिकी पेशात यापेक्षा अधिक ऐष-आरामाची कशाला अपेक्षा करायची? अर्थात् मी त्या जीवनातून सुटण्याच्या मार्गावर होतो, म्हणून कदाचित् माझ्या मनात हे सहानुभूतीचे विचार आले असतील. कोणत्याही कष्टमय अवस्थेतून गेल्यावर नंतर त्याच अवस्थेबद्दल मनात एक कोमल कोपरा तयार होतो, तसे मला त्या सैनिकी जीवनाबद्दल वाटू लागले.

सकाळी अकरा वाजताच जेवण झाले. सैन्याच्या मोठ्या ट्रक्स आल्या. त्यातील बाकड्यांवर आम्ही आमच्या बॅगा सांभाळीत बसलो. खिशात पडलेल्या दहाबा[illegible]टाच्या नोटा, ही एकच सफलता सर्वांत जाणवणारी होती. ट्रक सुरू झाला, तेव्हा एकाने सिगारेटचे पाकीट काढले आणि मग प्रत्येकाने हळूच आपापल्या खिशातले पाकीट काढले. सैन्यातील जीवनाचा हा एक परिणाम होता. लंडनला असा प्रकार घडत नाही. वरकरणी का होईना, पण परिचित लोक आपली सिगरेट एकमेकांना देऊ करतात आणि दुसराही ती सौजन्याने नाकारून आपली सिगरेट देऊ करतो. सैनिकी जीवनात बहुधा दुसरा माणूस आपली सिगरेट मागणार नाही ना, अशी चिंता करीतच जो तो सिगरेटचे पाकीट खिशातून काढीत असतो.

पण थोड्याच वेळात चाळीस मैलांचे अंतर संपले. दोन संस्कृतीतले अंतरही तुटले. आमच्या घराजवळच्या रस्त्यावर ट्रक थांबली. मी खाली उडी मारून बॅग उतरून घेतली आणि घराकडे चालू लागलो. आणि मग एकदम माझ्या लक्षात आले की, आपले कपडे अगदीच गबाळे आहेत. लंडनच्या संस्कृतीला शोभणारे नाहीत. त्यामुळे अर्थातच घरी जाण्यापूर्वी कोपऱ्यावरच्या उपहारगृहात चहा घेण्याचा बेत मला रद्द करावा लागला. गेल्या चौदा दिवसांच्या रखडपट्टीत एकच समाधान होते, ते हे की या काळात आपण लष्कराच्या भाकऱ्या काही अगदीच मोफत भाजल्या नाहीत.

## पाच :
# अति-सुधारक अनौरस मंडळीचे वेगळे जग !

"तुम्ही अनौरस आहात काय ?" मला एकाने अगदी सहजपणे प्रश्न केला. मला धक्काच बसला ! ओळख करून दिल्याबरोबर असा पहिलाच प्रश्न कुणी कुणाला विचारील अशी मला स्वप्नातसुद्धा कल्पना आली नव्हती. तो तरुण काय म्हणतो आहे हे मला नीट कळलेच नाही. म्हणून मी म्हटले, 'माफ करा, पण आपण काय विचारलंत ?'

"Are you a bastard" ("अनैतिक संबंधातून तुमचा जन्म झाला आहे काय ?") त्याने पूर्वीच्या सहजतेने विचारले. वास्तविक, अशा प्रश्नाचा एकदम संताप यावा. पण विचारणाऱ्याने तो रागाने किंवा दुष्ट हेतूने विचारला नव्हता. 'आपण कोठे राहता ?' किंवा 'आज हवा छान पडली आहे, नाही ?' हे प्रश्न आपण ज्या आस्थेने विचारू, तशी निरलस आस्था त्या तरुणाच्या चेहेऱ्यावर होती. म्हणून मी म्हटले, "नाही,

मी अनौरस नाही. माफ करा, पण आपण मला असं का विचारता आहात ? "

" कृपा करून गैरसमज करून घेऊ नका. " तो पूर्वीच्याच सरळपणाने म्हणाला, " पण आमच्यापैकी बहुतेकजण बॅस्टर्ड म्हणजे अनौरस आहेत. तेव्हा मला वाटलं, तुम्हीही आमच्यापैकीच असाल. "

मी हसून उत्तर दिले, " तुमची निराशा झाली असेल. पण मी अगदी कायदेशीर आणि औरस पुत्र आहे. "

यावर तो म्हणाला, "That's all right: You are welcome." (" तुम्ही अनौरस नसला तरी हरकत नाही. आम्ही आपलं स्वागत करतो. ")

लंडनच्या वॉटर्लू भागात एका खाजगी पार्टीला मी गेलो होतो, तेव्हा हा संवाद झाला. रात्री नऊचा सुमार असेल. त्या खोलीत त्या वेळी सहा तरुण आणि पाच तरुणी होत्या. आणखी काही लोक पार्टीसाठी जमत होते. आम्ही कोणाची वाट न पाहता आल्यापासूनच मद्य घ्यायला सुरुवात केली-होती. इंग्लंडमध्ये ज्याला ' बीट्निक ' म्हणतात अशा अति सुधारकांची ही पार्टी होती. या आगळ्या पार्टीत माझा शिरकाव कसा झाला, हे सांगण्यापूर्वी थोडा मागचा इतिहास सांगितला पाहिजे.

आमच्या वृत्तपत्र-व्यवसायाच्या वर्गात जॉन पिल्ग्रिम (Pilgrim) नावाचा बाविशीच्या सुमाराचा एक तरुण होता. पातळ अंगकाठी, भुरे केस, निळे तेजस्वी डोळे आणि कलावंतासारखी वाढविलेली दाढी, यामुळे तो एकदम उठून दिसत असे. त्याची माझी सहजगत्या ओळख झाली आणि आमचा परिचय वाढला. एका संध्याकाळी तो मला म्हणाला, " तू मद्य घेतोस का ? " मी म्हटले, "कधी कधी घेतो. " यावर तो म्हणाला, " आपण वर्ग संपल्यावर शेजारच्या बारमध्ये जाऊ. बरोबर वर्गातल्या दोनतीन पोरीही घेऊ. " मी म्हटले, " अरे, पण त्या येतील कशा ? आपली तर अजून कुणाशी ओळखही नाही. " त्यावर तो हसून म्हणाला, " त्याची तू काळजी करू नकोस. आपल्याबरोबर शिक्षकांनाही घेऊ या म्हणजे मुली, नक्की येतील ! पाहा तर खरं ! '

भारतीय वातावरणात मी वाढलो होतो. आमच्याकडे प्रोफेसरासमोर विद्यार्थ्याने सिगरेट ओढायची चोरी. आणि हा तर म्हणत होता की, गुरुजींना आणि मुलींना घेऊन ' बार ' मध्ये मद्य घ्यायला जायचे. पण तो त्यांना कसा का आणीना! आपण आपले जे जे होईल ते ते पाहावे या विचाराने मी स्वस्थ राहिलो. संध्याकाळी जॉन माझ्याजवळ येऊन म्हणाला, " चल. डन्‌बार आणि दोन मुली खाली वाट पाहताहेत. " डन्‌बार हे आमचे शिक्षक. ' डेली टेलिग्राफ ' या प्रख्यात दैनिकात ते काम करीत होते. मला जॉनच्या धाडसाचे कौतुक वाटले.

जवळच्याच बारमध्ये आम्ही गेलो. हा बार मुद्दामच जरा ' क्रूड ' किंवा गावंढळ ठेवला होता. तेथील खुर्च्या जुन्या पद्धतीच्या, खेड्यात वापरतात तशा बसक्या आणि ओबडधोबड होत्या आणि ग्लास ठेवण्यासाठी टेबले नव्हती, तर बीअरची पिंपेच पालथी घालून ठेवलेली होती. आम्ही एकंदर सहाजण होतो. डन्‌बार, मी, जॉन, फिझ्रेल्ड नावाचा आमच्या वर्गातील ऑस्ट्रेलियन मुलगा आणि दोन मुली. त्यांच्यापैकी एक चिनी. आणि दुसरी इंग्रज होती. चिनी मुलीचे नाव एड्‌वीना अकित् असे होते आणि इंग्रज मुलीचे नाव जॉइस मॅक्लिन व्हाईट असे होते. फिझ्रेल्डचे नाव जॉन असे असले, तरी आमच्यात आधीच एक ' जॉन ' असल्याने आम्ही त्याला ' फिझ् ' या नावाने हाक मारीत असू. उमर खय्यामच्या मूळ ' रुबायां ' चे फारसीतून इंग्रजीत भाषांतर करणाऱ्या जेम्स स्कॉट फिझ्रेल्डशी त्याचे काहीतरी दूरचे नाते होते. -आणि मद्याचे ग्लासच्या ग्लास रिते करून तो हे नाते सिद्ध करीत होता. एड्‌वीना ही चिनी असली तरी तिचे आईबाप त्रिनिदादला राहत असत आणि ती आपली बहिण ॲना हिच्यासह लंडनला शिक्षणासाठी राहत होती. मॅक्लिन व्हाईटचे वय फार तर पंचविशीपर्यंत असेल. पण तेवढ्या वयात तिचा विवाह सोहळा झाला होता आणि वर्षभराच्या वैवाहिक जीवनानंतर तिने घटस्फोटही घेतला होता. एड्‌वीना ही बारीक डोळ्यांची, चंपळ, पाच सव्वापाच फूट उंचीची,

बहुधा स्लॅक्स (स्त्रियांनी घालायच्या पँट्स) घालणारी, किंचित् थिल्लर, अतिशय उत्साही अशी विशीबाविशीची गोड, सुस्वरूप तरूणी होती; तर मॅक्‌लीन व्हाइट ही उंच, बळकट अंगाची; पण प्रेमळ, किंचित व्यवहारी दिसणारी होती.

थोडा वेळ आमच्या गप्पा वर्गातील अभ्यासाविपयी आणि तात्कालिक प्रसंगाविषयी झाल्या. पण थोड्याच वेळात मनमोकळेपणा आला आणि अधिक सलगीच्या गप्पा सुरू झाल्या. कुणीतरी विचारले, " लंडनला आलेल्या परकीयांना इथली कोणती गोष्ट सर्वांत अधिक आवडते ? "

एड्वीना म्हणाली, " मला लंडनच्या मुताऱ्या फार आवडतात. लंडनसारखी ही उत्तम सोय जगात इतरत्र कुठं नसेल. कोपऱ्या कोपऱ्यावर आढळणाऱ्या या स्वच्छ टापटिपीच्या मुताऱ्या पाहिल्या, म्हणजे मला प्रत्येक मुतारीत जावंसं वाटतं. "

जॉन म्हणाला, " मला वाटतं, मागच्या जन्मी तू कुठंही पाय वर करणारी कुत्री (बिच्) असली पाहिजेस ! "

त्यावर तिच्यासह आम्ही सारेचजण मनमोकळेपणाने हसलो. विशेपत: इंग्रजीत 'बिच्' याचा एक अर्थ कुत्री असा आहे, आणि दुसरा अर्थ वेश्या किंवा चारित्र्यहीन स्त्री असा असल्याने या शब्दाने जॉनच्या वाक्याला वेगळाच रंग आणला.

त्यानंतर आम्ही अनेक वेळा असेच बारमध्ये गेलो. एकदा आम्ही पाचजण गेलो असताना पिल्ग्रिमचा कुणीतरी टॉमी नावाचा उंच, देखणा मित्र आला. त्या दिवशी आमच्याबरोबर शिक्षकांपैकी कोणीच नव्हते. आम्ही व्हिस्कीचे दोन राउंड घेतले आणि कशावरून तरी लग्नाचा विपय निघाला. टॉमी म्हणाला, " कसलं लग्न आणि कसलं काय ! माझा सगळ्यावरचाच विश्वास उडाला आहे. ! "

" तू सिनिक् झाला आहेस. " जॉन म्हणाला.

" असेन. " टॉमीने सांगितले, " पण मला सिनिक् करणाऱ्या मुलीला

दोष द्यायला मात्र तू विसरू नकोस. चार वर्षे झाली असतील. माझा एका मुलीबरोबर विवाह ठरला. आम्ही अनेक वेळा फिरायला, सिनेमाला गेलो. मग मला सैन्यात नोकरी मिळाली. माझा बाँड दोन वर्षांपुरताच होता. ती दोन वर्षं संपताच आम्ही लग्न करायचं ठरवलं. आणाभाका, शपथा, प्रेमाचं प्रदर्शन-सारं काही झालं. मध्य-पूर्वेस माझी नेमणूक झाली. दोन वर्षं मला इंग्लंडला यायला मिळालं नाही. नंतर दोन वर्षांनी मी मोठ्या उत्सुकतेनं माझ्या प्रेयसीला भेटायला गेलो तेव्हा मला धक्काच बसला! तिला दिवस गेले होते. -आठवा महिना लागलेला होता. असा विश्वासघात डोळ्यांसमोर पाहिल्यावर कसली आली आहे श्रद्धा अन् कसलं काय!''

त्याला द्यायला समर्पक उत्तर आम्हाला सुचेना. पण जॉइस म्हणाली, ''एखादी मुलगी अशी निघाली म्हणून काही साऱ्याच मुली वाईट असतील असं नव्हे.''

नसतील, पण माझं लग्नावरचं मनच उडालं आहे. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, स्त्रियांवरचं माझं मन उडालं आहे.''

ते त्याने त्याच रात्री सिद्ध केले. कारण जॉइसला घरी पोचवितो म्हणून त्याने तिला पहिल्याच भेटीत टॅक्सीत घातले आणि दोघेही लंडनच्या ऑक्स्फर्ड स्ट्रीटवरून दिसेनाशी झाली! घटस्फोट घेतल्यानंतर तिचाही लग्नावरचा विश्वास उडून गेला असावा-पण याचा अर्थ पुरुषांवरचा विश्वास उडाला असा नसावा!

एकदा जॉननें मला विचारले, ''या शनिवारी तू कुठं जाणार आहेस का?''

''कुठं खास नाही बुवा.''

''मग माझ्या खोलीवर ये.''

''काय कार्यक्रम आहे?''

''ये तर खरा. कार्यक्रम काय तो दिसेलच!''

मी शनिवारी रात्री आठला त्याचा पत्ता शोधीत गेलो. लंडनच्या

किंचित बकाल अशा भागात तो राहत होता. मोठ्या प्रयासाने त्याचे घर मी शोधून काढले. जॉनने मला आपल्या ' घरात ' नेले, तेव्हा मला आश्चर्यच वाटले. कारण विद्यार्थ्यांची खोली म्हटल्यावर जी कल्पना आपल्या मनापुढे येते, तशी त्याची जागा नव्हतीच. त्या एकंदर चार खोल्या होत्या. पहिल्याच खोलीत एक माकड बांधलेले होते! अर्थात ते चांगले माणसाळलेले होते, असे जॉनने मला सांगितले. विद्यार्थ्यांच्या खोलीत मी माकडाची अपेक्षा केली नव्हती, हे खरे. आणि दुसऱ्या कोपऱ्यात एका मुंगसाचा पिंजरा होता! ही खोली की प्राणीसंग्रहालय आहे, असा विचार माझ्या मनात येतो न येतो, तोच जॉनने माझी एका तरुणीशी ओळख करून दिली. तो म्हणाला, " ही माझी मैत्रिण मेरिल. ही माझ्याबरोबरच राहते. "

आता मात्र माझे आश्चर्य चांगलेच वाढले. कारण ती दोघे अविवाहित होती आणि तरीही ती नवराबायकोप्रमाणे राहत होती, हे उघड होते. मेरिलचे वय फार तर एकोणीस असेल. तिच्या शरीराची वाढही चांगली झाली होती. ती मोठी खेळकर, गोड आणि लाघवी मुलगी होती. तिने हसून माझे स्वागत केले आणि म्हणाली, ' बसा हं. मी जरा स्वयंपाक करते आहे, म्हणून माझे कपडे असे वेगळे आहेत. तुम्हाला कॉफी ठेवू का प्रथम ? "

' नको. आम्ही ड्रिंक घेणार आहोत. " असे म्हणून जॉनने कपाटातून शेरीची बाटली काढली. मग त्याने तीन ग्लास काढले आणि त्याच फ्लॅटमधल्या एका दारावर टिचक्या मारून तो म्हणाला, ' जॉर्ज, माझा मित्र आला आहे. एखादा ग्लास घेतोस का ? "

' ओ यस्. ड्रिंक इज वेल्कम एनी टाइम ! " असा आतून आवाज आला. त्यापाठोपाठ चाळिशीच्या सुमाराचा एक दाढीमिशीवाला गृहस्थ हसत बाहेर आला. त्याचे कपडे अगदी चुरगळलेले, मळकट होते. पण त्याच्या स्वभावातला सरळपणा, सहजता इतकी ठसठशीत होती की त्याच्या या बेफिकीरीचे कौतुकच वाटावे.

" जॉर्ज हा चित्रकार आहे." जॉनने त्याच्याशी माझी ओळख करून दिली.

" चित्रकार नाही, पण चित्रं काढण्याची मला हौस आहे, एवढंच." जॉर्ज विनयाने म्हणाला.

" हिल्डा कुठं आहे? तिलाही बोलाव हवं तर." जॉनने त्याला सांगितले.

" हिल्डा! हिल्डा- " जॉर्जने दाराकडे पाहून हाका मारल्या.

निळ्या फ्रॉकमधील एक तिशीच्या सुमाराची केस मोकळे सोडलेली प्रमदा दारातून आली. आम्हाला पाहून ती म्हणाली, " अस्सं काय? तरी म्हटलं, जॉर्ज लगेच बाहेर कसा आला?"

त्या खोलीत तीनच खुर्च्या होत्या. थोड्या अंतरावर कॉट होती. हिल्डा कॉटवर बसायला निघाली, तेव्हा जॉर्जने तिला जवळ ओढले आणि चक्क आपल्या मांडीवर बसवून घेतले. तशाच अवस्थेत आपल्या हातातील ग्लास तिच्या तोंडाला लावीत तो म्हणाला, " हिल्डा, आपल्याकडे आज जेवायला हे पाहुणे आले आहेत. मी यांचं नाव विसरलो, पण हे भारतातून आले आहेत."

" यांचं नाव रॅमिश मॅन्ट्री." जॉन पिल्ग्रिमने अधिकृत माहिती पुरविली. मग जॉर्जच्या मांडीवर बसल्याबसल्याच हिल्डाने माझ्याशी हस्तांदोलन केले. मी मनात म्हटले, 'ही दोघं तरी विवाहित आहेत की नाही कुणास ठाऊक!' पण ते त्या वेळी विचारण्याचा मला धीर झाला नाही. पुढे एकदा जॉनने मला सांगितले की, हिल्डा ही जन्माने ऑस्ट्रियन, पण गेल्या महायुद्धात तिच्या घरातील बहुतेकजण मारले गेले किंवा बेपत्ता झाले.ती आणि तिची आई कशीबशी इंग्लंडला आली. नंतर आई वारली आणि हिल्डा गेली अनेक वर्षे जॉर्जबरोबरच राहत आहे. त्यांनी 'लग्नाचा अजून विचार केला नाही' असेही त्याने मला सांगितले. त्यांच्या वागण्यावरून अर्थातच त्यांना लग्नाचा विचार करण्याची जरूरही नव्हती, हे पूर्वीच माझ्या

लक्षात आले होते.

त्या घरातील जेवण म्हणजे तरी काय, टेबल खुर्च्या, टेबल-क्लॉथ असे सारे व्यवस्थित मांडून होते का? मुळीच नाही. कारण कोणतीही गोष्ट सर्वांसारखी आणि रूढ पद्धतीने करणे म्हणजे आपल्या तेजस्वी स्वतंत्र बुद्धीचा अपमान आहे, असा त्या चौघांचा समज होता. म्हणून, ग्रामोफोन कर्कशपणे ओरडतो आहे, जॉर्ज त्याला सूर धरून गातो आहे, हिल्डा कधी त्याच्या मांडीवर तर कधी कॉटवर बसून हातातल्या बशीतले मासाचे आणि पावाचे तुकडे खाते आहे, जॉनची मैत्रीण मेरिल ही मुंगसाच्या पिंजऱ्यावर बसून जेवते आहे, जॉन हातात थाळी घेऊन घरात इकडे तिकडे फिरत खातो आहे, मधूनच माकडाला खेळवतो आहे, आणि जेवणाच्या या नव्या प्रकाराने संकोचून मी खर्चीवर बसून एका हातातील प्लेटीचा तोल सांभाळीत दुसऱ्या हाताने दातांच्या साहाय्याने कोंबडीच्या पायाच्या मांसाचे लचके तोडीत आहे, अशा थाटात आमचे जेवण चालले होते. ते संपायला जवळजवळ अकरा वाजले.

मग जॉनला आणि जॉर्जला गाणी म्हणायची हुक्की आली. त्यांनी कोणतेतरी एक मोडके तंतुवाद्य काढले आणि जोरजोराने गायला सुरूवात केली. कोरसच्या वेळी मेरिल आणि हिल्डा दोघीही आपले आवाज उंचावून ओरडत होत्या. दहापंधरा मिनिटे असे गाणे चालले असेल, तोच फ्लॅटच्या कुठल्यातरी दारावर मोठमोठ्याने धडका बसू लागल्या. कोणीतरी वृद्ध इसम घोगऱ्या आवाजाने ओरडला, 'वुइल यू स्टॉप इट् प्लीज?' ('आता कृपा करून थांबवा की!') मला वाटले, आता शेजाऱ्याशी भांडण्याचा प्रसंग येणार! पण त्या चौघांपैकी कोणीही थांबले नाही. त्यांचा संगीत आरडाओरडा चाललाच होता. मी जॉनची बाही खेचून त्याचे लक्ष त्या शेजारच्या इसमाच्या दरडावणीकडे वळविले. तेव्हा जॉन म्हणाला, 'त्याची काळजी करू नकोस तू. रोज रात्री आम्ही गाणी म्हणतो आणि रोज रात्री तो दार ठोठावतो. त्यानं तीनचार वेळा दार ठोठावलं, की आम्ही बंद

करतो।''

नेहमीप्रमाणे शेजाऱ्याने तीनचार वेळा ताकीद दिल्यावर हा गायनी समाज थांबला. त्यावेळी बारा वाजत आले होते. लंडनच्या भुयारी रेल्वे लवकर बंद होतात, म्हणून मी सर्वांचा निरोप घेऊन लगबगीने स्टेशनकडे निघालो.

साधारण दोन महिन्यांनंतरची गोष्ट. बारमध्ये बीअर घेताना जॉन मला म्हणाला, 'हिल्डाची एक मैत्रीण अर्ल्स कॉटमध्ये राहते. सध्या ती बाहेरगावी गेलेली आहे आणि तिच्या फ्लॅटची किल्ली हिल्डाकडे आहे. आम्ही त्या फ्लॅटवर शनिवारी खाजगी पार्टी करणार आहोत. तुला घर सापडायचं नाही. तेव्हा तू माझ्याच घरी संध्याकाळी ये.''

ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन शनिवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मी जॉनकडे गेलो, तेव्हा फिझ् आधीच तिथे आला होता. रसेल आणि हिल्डा ही पार्टीची यजमान असल्याने ती दोघे अर्ल्स कोर्टकडे गेली होती. जॉन त्यावेळी केक्स आणि इतर सामान पिशव्यात भरीत होता. फिझ् त्याला मदत करीत होता. मी आल्यावर जॉनने कॉफी ठेवली. पूर्वी माझ्या लक्षात न आलेले एक वैशिष्ट्य त्यावेळी माझ्या लक्षात आले. जॉनच्या खोलीत वृत्तपत्रातील काही निरर्थक जाहिरातींची कात्रणे भिंतीवर आणि दारावर चिकटवलेली होती. कुठे एखादेच वाक्य चिकटवले होते, तर कुठे एखादे रेखाचित्र होते. त्या सर्वात मिळून काही सुसंगती नव्हती आणि सौंदर्यही नव्हते. त्यामुळे जॉनसारख्या आणि रसेलसारख्या कलावंतानी अशी वाक्ये घरात चिकटवून भिंती खराब का कराव्यात, हे मला समजेना. त्याबद्दल मी जॉनला विचारले. तेव्हा तो म्हणाला, ''एखादी जाहिरात वाचून पाहा तुला काही विशेष वाटतं का!' मी वाचू लागलो, - 'Fill her up and feel the difference.- ''ही तर एका पेट्रोल कंपनीची जाहिरात आहे. तीत विशेष काय आहे?'' त्यावर जॉनने हसून सांगितले, ''मी इथं जाहिरातीतली अनेक वाक्ये कापून ठिकठिकाणी

चिकटवली आहेत. पण त्या प्रत्येक वाक्याला दोनदोन अर्थ आहेत. एक साधा आणि एक चावट अर्थ." मी एकएक वाक्य वाचू लागलो आणि मला त्यातील दुसरा अर्थ उमगू लागला. "There are many ways of doing it,' 'Do not waste your electricity, put it to proper use,' 'It works both ways,' अशी छापील वाक्ये अगदी मोक्याच्या जागी लावून ठेवलेली होती.

"पण या जाहिरातींचा उपयोग काय?" मी विचारले.

"त्याचे दोन उपयोग आहेत." जॉन सांगू लागला, "पहिला उपयोग म्हणजे, निव्वळ गंमत. चुटका सांगण्याचा जो उपयोग तोच अशा वाक्यांचा. दुसरा उपयोग असा की, मला भेटायला एखादी मैत्रीण येते, तेव्हा तिच्याशी वात्रटपणा करण्याला मला या जाहिरातींचा उपयोग होतो. कारण बहुधा ती आपण होऊनच मला विचारते की, 'ही वाक्य इथं का चिकटवलेली आहेत?' मग ती तिला प्रत्येक वाक्यातला वात्रटपणा समजावून सांगतो. त्यामुळं तिची भीड चेपते आणि माझी प्रगती सुलभ होते."

"पण तुझ्या मेरिलला हे आवडत का?" मी विचारले.

"शी इज् ए स्पोर्ट." असे म्हणून त्याने डोळे मिचकावले. तिनेही त्याच्याकडे खेळकरपणे पाहिले.

इतक्यात दरवाज्याची घंटी वाजली आणि पाठोपाठ एड्वीना आणि तिची धाकटी बहीण ॲना या दोघी आत आल्या. ॲना बरीच तरूण, साधारण अठरा वर्षांची असावी. ती मोठी गुबगुबीत, बाहुलीसारखी दिसायची. चिनी पद्धतीचा नकटेपणा, बारीक डोळे, चेहेरा सुजल्यासारखा गुबगुबीत, चेहेऱ्यावरचा भोळा, नवखेपणाचा भाव आणि लाजरेपणाने आणि संकोचाने वागण्याची पद्धत, यामुळे त्या अतिपुरोगामी लोकात ती एकदम वेगळी वाटली. अर्थातच तिचा हा लाजरेपणा किती वरवरचा होता, हे काही तासातच माझ्या नजरेला आले हा भाग वेगळा.

जॉनने मद्याच्या तीन बाटल्या आणल्या होत्या. वास्तविक अशा पार्टीला येणाऱ्याने किंवा येणाऱ्या जोडप्याने मद्याची एकएक बाटली आणायची असते, असे मला नंतर कळले. पण जाताना मला त्याची कल्पना नसल्याने मी हात हालवीतच गेलो होतो. जॉनने बाटल्या घेतलेल्या पाहताच मी म्हटले, "जाताना मीही व्हिस्कीची एक बाटली घेईन." त्यावर तो म्हणाला, "छे: छे:! मी तीन घेतल्या आहेत आणि रसेलनं आणखी चारपाच नेल्या आहेत."

इंग्लंडमध्ये कपडे धुण्यासाठी साधारण एक फूट रूंदीची आणि दोन फूट लांबीची एक लाकडी फळी असते. तीत मध्यभागी पत्र्याच्या पट्ट्या लावलेल्या असतात. जॉनने तसले एक आयुध पार्टीला जाताना घेतलेले पाहून मी विचारले, "हे कशाला?" त्याने सांगितले, "हे एक उत्तम वाद्य आहे. त्याच्यावर छान गाणी म्हणता येतात. पाहा तर खरं." त्याने बाटल्या, ते 'वाद्य' केक्स इत्यादी सर्व वस्तूंची बांधाबांध केली आणि आम्ही सर्वजण बसने अर्ल्स कोर्टकडे गेलो. का कुणास ठाऊक, पण मेरिल त्या दिवशी आमच्याबरोबर आली नाही. तिला आम्ही चलण्याचा आग्रह केला, तेव्हा 'मला बरं वाटत नाही,' एवढेच ती म्हणाली. आम्ही अर्ल्स कोर्टला पोहोचलो, तेव्हा हिल्डा आणि रसेल यांनी आमचे स्वागत केले. त्यावेळी साधारण साडेसात वाजले होते.

आत प्रशस्त दिवाणखाना होता. एका भिंतीत जुन्या इंग्रजी पद्धतीची कोळशाची शेगडी (Fire-place) होती. मंद प्रकाश होता आणि तरल संगीताच्या रेकॉर्डस् लावलेल्या होत्या. दोन कोच, सात-आठ गुबगुबीत खुर्च्या ठेवलेल्या होत्या. एका कोपऱ्यात निरनिराळ्या मद्यांच्या दहा-बारा बाटल्या, सोडा, सँडविचेस्, केक वगैरे पदार्थ टेबलावर ठेवलेले होते. आम्ही आत गेलो तेव्हा तीन-चार तरूणी आणि दोन-तीन तरूण मद्य घेत गप्पा मारीत बसलेले होते. जॉनने त्यांना पाहून 'हॅलो एव्हरीबडी' म्हटले आणि आमची सर्वांची ओळख करून दिली. रसेलने तेवढ्यात

वेळ न गमावता आमच्यापुढे ग्लास आणि बाटल्या आणून ठेवल्या.

आमच्या आधी त्या दिवाणखान्यात आलेल्या मुलीत शीला (Shiela) नावाची एक उंच, धिप्पाड, मादक तरुणी होती. आणखी दोन तरुणींपैकी एक बारीक, हिरवट डोळ्यांची आयरिश होती. आणि तिसरी कोणत्यातरी युरोपियन देशातील असावी. त्यांच्याजवळचे तरुण अस्ताव्यस्त पोषाख केलेले, कोचावर किंवा खुर्च्यांवर आडवेतिडवे बसलेले होते. आमची ओळख झाल्याबरोबर त्यांच्यापैकीच एकाने मला विचारले, 'Are you a bastard?'

म्हणजे त्यांच्यापैकी बहुतेकजण अनौरस संततीचे होते. त्यांच्या समाजाविषयीच्या बेफिकीरीचा अर्थ मला हळूहळू उमगू लागला होता. आपले आईबाप कोण आहेत हे माहीत नाही आणि त्यांच्या मौजेपायी आपला जन्म झाला, ही कल्पना त्यांच्या या स्वच्छंदी वागण्याच्या मुळात असावी. अर्थातच हे काही त्या वागण्याचे एकमेव कारण नव्हे. ऐन तारूण्यातील मस्ती, काहीतरी वेगळेच करण्याची मनीषा आणि मद्य व स्त्रिया यांची नैसर्गिक ओढ पूर्ण करण्याची उत्कंठा, हीही या 'ब्रोहेमियन' प्रवृत्तीची कारणे असावीत. पण अर्थातच तात्त्विक विचार करण्याचे ते स्थळ नव्हते. मी समोरचा चषक उचलला आणि उमर खय्यामचे स्मरण केले. नाही तरी, शोपेनहोअरसारख्या तत्त्वज्ञापेक्षा उमरखय्यामच त्या रात्री अधिक हवा होता!

हळूहळू पार्टीला आणखी लोक येऊ लागले. प्रत्येक जोडप्याने येताना मद्याच्या दोन बाटल्या आणल्या होत्या. पार्टीच्या सुरूवातीला आम्ही सातआठजणच होतो, पण साडेआठ-नऊच्या सुमारास चौदा-पंधराजण झालो. पहिल्या अवस्थेत सिगारेट ओढणे, मद्य घेणे आणि गप्पा मारणे हा मंद कार्यक्रम होता. पण मग रसेलने एका बसक्या कोचावर हिल्डाला मांडीवर घेतले आणि ती दोघेही गाणे म्हणू लागली, तेव्हा जरा रंग भरू लागला. मग जॉन पिल्ग्रिमने शीलाला जवळ ओढले आणि एड्वीना तर

नुकतीच ओळख झालेल्या एका स्कॉच तरुणाच्या मांडीवर स्थानापन्न झाली. एक पोलिश मुलगी आणि इंग्रज मुलगा गाण्याच्या तालावर नाचू लागला, तेव्हा बऱ्याच जणांनी हातात पेले घेऊनच नृत्य करण्यास सुरूवात केली. जॉनने कपडे धुण्याचे आयुध घेऊन व ते जोरजोराने वाजवून उच्च स्वर लावला. रसेलने हिल्डाला कुरवाळायचे सोडून एड्वीनाला विळखा घातला आणि कुणी गिटार वाजवू लागला तर कुणी पियानो वाजवू लागला. त्या साऱ्या संगीतात आणि वाद्यात एकसूत्रता नव्हती आणि सुसंगतीही नव्हती. पण वाद्यांच्या आणि आवाजांच्या त्या विचित्र मिश्रणात एक प्रकारचा उन्माद होता, हे मात्र खरे. माझ्याशिवाय प्रत्येकजण गाणे म्हणत होता. मी आपला नुसता शांत प्रेक्षक होतो. पण पार्टीला आलेल्या पाहुण्याने असा दुरावा ठेवावा हे रसेलला मुळीच पटले नाही. तो माझ्याजवळ येऊन मोठ्याने म्हणाला,

"म्हणा-तुम्हीही गाणं म्हणा."

"पण मला तुमची गाणी येत नाहीत." मीही मोठ्याने सांगितले.

त्यावर माझ्या कानाजवळ तोंड आणून तो म्हणाला, 'काही हरकत नाही. नुसतंच ओरडा.' मी ती आज्ञा मानून साधारण गायल्याप्रमाणे ओरडू लागलो. तेव्हा रसेलला आनंद झाला. जॉनकडे वळून तो म्हणाला, 'He is a real man now.' टेबलावरचा एक नवा ग्लास उचलून त्याने माझ्या ओठाला लावला.

त्यानंतर गाणे, बेफाम होऊन नाचणे आणि नर्म प्रणय करीत आरडाओरड करणे हा सामुदायिक कार्यक्रम रात्री एक वाजेपर्यंत तरी चालला होता. मी गायला-म्हणजे ओरडायला -सुरूवात करण्यापूर्वी मला जो परकेपणा वाटत होता, तो हळूहळू नाहीसा झाला. जंगली लोकांच्या भयचकित करणाऱ्या संगीताप्रमाणे गाण्याची लय वाढत होती. नाचणारे द्रुत गतीने नाचत होते. मध्येच कुणी 'उ हू ऽऽऽ' असे उच्चरवाने ओरडत होते. कुणी गाण्यातच फुरसत काढून सँडविचचा बकाणा मारीत होते, तर

कुणी रसिक आजूबाजूच्या लोकांची तमा न बाळगता आपल्या कवेतील मुलीचे दीर्घ चुंबन घेत होता. लंडनचा कुणी अर्नोल्ड नावाचा पत्रकार सपत्नीक आला होता. लग्नावर विश्वास असणारा तो त्या रात्रीचा एकुलता एक पाहुणा असावा. नाचता नाचता मधेच जॉन पिल्ग्रिम चुकून खुर्चीवर बसला आणि त्याने अर्नोल्डल्या बायकोला सरळ ओढून मांडीवर घेतले. अर्नोल्डकडे पाहून जॉन म्हणाला, "You are not jelous, Arnold? Don't worry! I am not running away with your wife!" ("तुला मत्सर वाटत नाही ना, अर्नोल्ड? भिऊ नकोस. मी काही तुझ्या बायकोला पळवून नेत नाही!") त्यावर अर्नोल्डने आपण मत्सरी नसल्याचे सांगितले आणि त्याची बायको जॉनचा गालगुच्चा घेऊन पुन्हा उठून नृत्य करणाऱ्या लोकात मिसळली. ते नृत्य द्रुत गतीचे होते आणि मला काही ते रम्बा पद्धतीचे नृत्य चांगलेसे येत नव्हते. पण कुणीतरी मुलीने माझाही हात धरून मला फरफटत मधे नेले आणि मी मुद्दाम प्रयत्न करण्यापूर्वीच त्या नृत्याच्या लयीत मिसळलो. असे बेभान होऊन नृत्य करणे ही एक अलौकिक मौज आहे, हे मात्र खरे. देहभान विसरून भजने म्हणणाऱ्या भक्ताला किंवा संगीताच्या बेहोषीत बुडून जाऊ शकणाऱ्या संगीतवेड्या लोकांनाच त्यातील एकतानतेची कल्पना येईल.

रात्री एक-दीडनंतर पार्टीतील लोक हळूहळू दमून बसू लागले. मात्र कोण कुणाला रेलून बसत होती किंवा कोण कुणाला मिठीत घेत होता, याला धरबंध नव्हता. दीडच्या सुमाराला कोणीकोणी घरी जाऊ लागले. त्यांनी निरोपादाखल उच्चारलेले शद्ब जड, दूर कुठूनतरी निघालेले वाटत. शेवटी आम्ही फक्त सहाजण उरलो. मी, जॉन, एड्वीना, ॲना, फ़िझ् आणि जॉनचा एक रिचर्ड नावाचा आर्किटेक्ट मित्र, एवढीच राहिलो. हिल्डा आणि रसेल आपल्या खोलीत जाऊन झोपली होती. दिवाणखान्यात दहाबारा मोकळ्या बाटल्या, आठदहा पूर्ण किंवा अर्धवट भरलेल्या बाटल्या, इतस्ततः पडलेली वीस पंचवीस काचपात्रे, जागोजाग पसरलेली ॲशट्रेन्स, सिगरेटची

थोटके, काडयांच्या मोकळ्या पेट्या, सिगारेट्सची अर्धवट भरलेली किंवा रिकामी पाकिटे, वाकड्यातिकड्या खुर्च्या आणि अव्यवस्थित कोच, असा सारा अवतार होता. नुकतीच लढाई संपून सामसूम झाल्यावर रणांगण जसे दिसेल, अशी काहीशी अवस्था त्या खोलीला आली होती.

आता हवेतील थंडी वाढू लागली होती. लंडनच्या आगगाड्यांची वेळ टळून गेल्यामुळे पहाटे साडेचार-पाचशिवाय आम्हाला कोठे बाहेर पडणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही खुर्च्या आणि फोन शेगडीजवळ ओढला आणि त्यावर अस्ताव्यस्तपणे पडलो. एड्वीना कोचावर झोपली होती आणि आर्किटेक्ट रिचर्ड तिच्या अंगावर रेलून बसला होता. जॉनने ॲनाला जवळ घेतले होते. आम्ही सिगरेटचे झुरके ओढीत दोनदोन खुर्च्यांवर अर्ध-आडवे झालो होतो.

"आता आपण घाणेरड्या गोष्टी (डर्टी स्टोरीज) सांगू या." एड्वीनाने सूचना केली.

"यू हॅव ए डर्टी माईंड!" ('तुझं मनच घाणेरडं आहे!') फिझ् म्हणाला.

"होय" एड्वीनाने शांतपणे सांगितले, "यू नीड ए डर्टी माइंड टु ॲप्रीशिएट ए डर्टी स्टोरी." ('घाणेरड्या गोष्टींचा आस्वाद घ्यायचा तर मनही घाणेरडं असलं पाहिजे.')

"ठीक आहे! तूच सुरुवात कर." जॉन म्हणाला.

मग एड्वीनाने एक इरसाल गोष्ट सांगितली. ती येथे देणे अशक्य आहे. पण पुरुषसुद्धा एकमेकांना जी गोष्ट सांगण्यास लाजतील अशी एक कथा ती तरुण, सुंदर, नाजुक मुलगी कशी सांगते याचे मला आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. मग इतरांनीही काही काही गोष्टी सांगितल्या. मध्येच जॉनने एड्वीनाला अचानकपणे विचारले, "काय ग, चिनी स्त्रियांबद्दलचा एक प्रवाद आहे, तो खरा आहे का?" तिने सांगितले, "तो प्रवाद काय आहे हे मला माहीत आहे. पण तो खोटा आहे. आणि

तो खोटा आहे हे मला माहीत आहे, हे मला इथं तरी सिद्ध करायला सांगू नकोस!"

हा वेळपर्यंत ॲनाची भीड चेपली होती. ती बहुतेक बाबतीत आता आपल्या वडील बहिणीचे अनुकरण करीत होती. कोणी चुंबन घेऊ लागले, तर ती प्रथम एखादे वर्तमानपत्र आडोशाला धरीत असे. पण हळूहळू तोही आडपडदा तिने काढून टाकला. नाच, जाग्रण, मद्य, सिगरेट आणि गाण्यांचा गोंधळ यांनी आता सर्वांचेच डोळे जड झाले होते. रात्रभर एक क्षणही झोप नव्हती. आता उजाडू लागले होते आणि आगगाड्या सुरू होण्याची वेळ होऊन गेली होती. उरलेल्या बाटल्यातली एकएक बाटली आम्ही काखोटीस मारली आणि जवळच्या भुयारी रेल्वेच्या स्टेशनच्या दिशेने चालू लागलो. त्यावेळी आम्ह[illegible]ंचाच अवतार पाहण्यासारखा झाला होता. सुरकुतलेले अस्ताव्यस्त कपडे, जागरणाच्या खुणा, झोपेच्या डोळ्यांनी टाकलेली पावले, आणि पार्टीतील बेभानपणाची अजून राहिलेली धुंदी, यामुळे आमचे हे पथक लंडनच्या शिस्तदार रस्त्यात मोठे चमत्कारीक वाटत असावे. आमची ही परेड पाहण्यासाठी सुदैवाने रस्त्यावर फारच थोडे लोक हजर होते.

स्टेशनवर आल्यावर रिचर्ड म्हणाला, 'आता माझ्या खोलीवर जाऊन कॉफी घेऊ.' मग आपापल्या घरी जाण्याऐवजी आमची वरात रिचर्डच्या खोलीवर गेली. तिथे आम्ही पलंग, खुर्ची, गालिचा, जे दिसेल त्यावर अंग झोकून दिले. कारण आम्ही सारेच अगदी थकलो होतो. थोड्या वेळात रिचर्डने कॉफी केली. ती घेतल्यावर सर्वांनाच जरा हुषारी आली. रिचर्ड आणि एड्वीना यांनी तर ही हुषारी सिद्ध करण्याची एवढी घाई केली की, आता त्या खोलीत इतरांना बसावे की नाही याचा आम्ही विचारच करू लागलो. पण जॉन सरळ म्हणाला, "Let's wait and see how they are necking." ('त्यांचा प्रणय कसा काय चालला आहे हे तर पाहू!') हा प्रणय आम्हाला काही नवा नव्हता. माझ्या डोळ्यांत

तर झोप चांगलीच उतरली होती. मी खुर्चीवरच झोपण्याचा प्रयत्न करू लागलो. फिझ् आणि ॲना यांनी रिचर्ड व एड्वीना यांच्या उदाहरणावरून स्फूर्ती घेतली. जॉनला मध्येच काही टायपिंग करण्याची हुक्की आली आणि त्याने रम्‌चा घुटका घेत टायपिंग सुरू केले.

थोड्या वेळाने तो म्हणाला, " चला, आता तुम्ही माझ्या खोलीवर आलं पाहिजे. " एड्वीनाने रिचर्डच्या छातीवर मान ठेवीत म्हटले, " We two would rather stop here.' (' आम्ही दोघं इथंच राहतो. ") अर्थातच मग मी, जॉन, फिझ् आणि ॲना पेंगुळलेल्या डोळ्यांनी वॉटर्लूकडे जॉनच्या खोलीवर गेलो. तेथे गेल्याबरोबर मी पलंगावर अंग टाकले आणि जॉनच्या कॉफीची वाट न पाहता सरळ झोपी गेलो.

तासभर झोपल्यावर मला हुषारी वाटू लागली. आरशात पाहिले, तो केस विस्कटले होते, दाढी वाढली होती, कपडे चुरगळून गेले होते आणि पार्टीच्या दुसऱ्या दिवसाची विशिष्ट आंबट अवस्था आली होती. त्यावेळी जॉन, फिझ् आणि ॲना काहीतरी खात होते. मलाही त्यांनी बोलावले. अंडी, पाव, लोणी, चहा, जॅम असे काही ओरबाडून खात आम्ही जेवलो. हे जेवण अर्थातच पूर्वीसारखे उभ्या उभ्या किंवा आडवेतिडवे होऊनच झाले. जॉनच्या मैत्रिणीनेच ते तयार केले होते. आदल्या दिवशीच्या पार्टीला ती का आली नाही हा विचार त्यावेळी माझ्या मनात पुन्हा आला. पण मी तो त्यावेळी बोलून दाखवला नाही.

दुपारी अडीचच्या सुमाराला मी जॉनच्या खोलीवरून माझ्या घरी आलो. म्हणजे आदल्या दिवशी संध्याकाळपासून दुपारपर्यंत मी या अतिसुधारक (बीट्‌निक) तरुण-तरुणींच्या संगतीत होतो. त्यानंतरही शालेय वर्ष संपेपर्यंत आमच्या अनेक वेळा भेटी झाल्या, मनमोकळ्या गप्पा झाल्या. पार्टीच्या रात्रीनंतर दोनतीन दिवसांनी मी, एड्वीना आणि जॉईस कॉफी घेण्यासाठी एका उपहारगृहात गेलो. मी एड्वीनाला विचारले, " त्या रात्री मेरिल पार्टीला का आली नाही ? "

जॉइस मध्येच म्हणाली, "तुला माहीत नाही का? तिला दिवस गेले आहेत. सहावा महिना असावा."

मला आणखी एक धक्का बसला. अशा वेळी या एकत्र राहणाऱ्या मित्रमैत्रिणींचे पुढे काय होते? ती लग्न करून टाकतात का? तसे त्यांनी केलेच, तर लग्नावर विश्वास नसतानाही विवाहाच्या खोड्यात पडल्याचा त्यांना पश्चात्ताप होतो का? ऐन तारुण्यात प्रेमापायी कोणतेही साहस करण्यास तयार असणाऱ्या या रोमिओ-ज्युलिएटचे प्रेम नंतर किती काळ टिकते? --असे अनेक प्रश्न माझ्यापुढे उभे राहिले. पण या प्रश्नांची उत्तरे मला नीटशी कधीच मिळाली नाहीत. कारण, लवकरच आमचा अभ्यासक्रम संपला आणि आम्ही सर्व पांगलो. ते कायमचेच.

पण या माझ्या मित्र-मैत्रिणींची वैचारिक बैठक मला पूर्णपणे समजली नाही हे मात्र खरे. आता हेच पाहा ना, इतक्या निकटच्या संबंधानंतर निरोप घेताना एकमेकांचे पत्ते घ्यावेत आणि पत्रे लिहावीत हे अगदी साहजिक नव्हे का? पण असे काहीही झाले नाही. माझा भारतातील पत्ता कुणीही विचारला नाही की, आपला पत्ता मला देण्याची उत्सुकता दाखविली नाही. जॉनचा अपवाद वगळता त्या चारपाच मित्रमैत्रिणींपैकी कोणाचाही पत्ता मला लंडनच्या वर्ष-सव्वा वर्षाच्या मुक्कामात कधीही कळला नाही. एड्वीनाने एकदा नाईलाजाने पत्ता दिला. आणि मी त्या पत्त्यावर चौकशी करता ती ते घर सोडून पूर्वीच्या दुसऱ्या अज्ञात ठिकाणी गेल्याचे कळले! जॉइस मॅक्लिन व्हाईटनेही फिझ्‌ला दिलेला पत्ता असाच खोटा निघाला.त्यापैकी कोणीच कोणाचा पत्ता घेतला नाही की, कधी पत्र लिहिले नाही. इंग्लंडला जाताना बोटीवरच्या औपचारिक ओळखीनंतरही आम्ही अनेकांनी एकमेकांचा ठावठिकाणा टिपून घेतला होता. आणि वर्षभर जिवाभावाच्या मैत्रीनंतर हे तरुण आणि तरुणी जणू काही झालेच नाही अशा थाटात अगदी निर्विकारपणे कोठेतरी गुप्त झाले होते. जिव्हाळा, आपुलकी, सखोल भावना या साऱ्यांची मुळे रूढीत असतात आणि ही अतिनव तरुण मंडळी

तर रूढीची कट्टर विरोधक! म्हणून तर त्यांनी या जिव्हाळ्याला काट मारली नसेल? पत्रे पाठविणे, जिव्हाळा दाखविणे, भावविवश होणे, या साऱ्या गोष्टी त्यांच्या जाज्ज्वल्य बुद्धिवादास मान्य नसाव्यात.

त्यांचे हे तत्त्वज्ञान मला पटले नाही. तरी त्यांची बेफिकीरी, वाटेल ते झाले तरी जीवनातील आनंद लुटण्याची जिद्द, आणि समोर मित्रमैत्रीण असेल त्या वेळी त्याच्याविषयी किंवा तिच्याविषयी त्यांना वाटणारी निव्वळ आपुलकी, मनमोकळेपणा, यांचे मला जबरदस्त आकर्षण वाटले, हे मात्र खरे. भारतात वर्षानुवर्षे मैत्री करणारे स्नेही किंवा खुद्द नवराबायकोही एकामेकांशी ज्या विषयांवर सर्वसाधारणपणे बोलत नाहीत, त्या विषयांवर ही मंडळी काहीही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने अल्पपरिचयातही बोलत. त्यांच्या संगतीत मनावर कसलेही दडपण राहत नसे. कोणत्याही औपचारिकपणाचा बुरखा घेण्याची आवश्यकता वाटत नसे. म्हणूनच, अशा जिवाभावाच्या मंडळीचेही पुढे काय झाले हे मला कळणार नाही, कोण कुठे गेला, कुणी लग्न केले की नाही, कुणी नोकरी केली की काय झाले, हे मला कधीच कळणार नाही, या गोष्टीचे मोठे वाईट वाटते. मी पुन्हा लंडनला गेलो, तर यापैकी कुणी दिसणार नाही, याची मराठी जिव्हाळ्यात वाढलेल्या माझ्यासारख्या माणसाला खंत वाटावी हे साहजिक आहे. पण काय करणार? या अतिसुधारकांची विचारसरणी आपल्याला पटो न पटो, पण असेही काही लोक असतात आणि आपापल्या जगात ते सुखी असतात, अशीही एक जीवनपद्धती असते आणि रुढ पायंड्यांची पर्वा न करता ती बेदरकारपणे, जोमदारपणे जगत असते, एवढं मात्र माझ्या मनावर बिंबले आहे.

◇ ◇ ◇ ◇

# सहा : फळांच्या कारखान्यात

रात्री अकराचा सुमार. लंडनच्या एजवेअर रस्त्यावर अगदी तुरळक रहदारी होती. हा रस्ताही लंडनच्या इतर मोठ्या रस्त्यांच्या मानाने अंधारीच होता. फावरशॅम या गावी जाणारी आगगाडी रात्री अडीचच्या सुमारास स्टेशनवरून निघणार होती. पण त्यावेळी तेथे जाण्यास लोकल गाडी किंवा टॅक्सी मिळणार नाही, म्हणून मी रात्री अकरा वाजताच घरातून निघालो होता. माझ्या हातात एक मोठी अवजड बॅग होती. कारण फावरशॅम गावी एका फळांच्या कारखान्यात महिनाभर काम करण्यासाठी मी जात होतो. अर्थातच महिन्यासाठी लागणारे कपडे, अंथरूणपांघरूण, पुस्तके, जेवणाच्या डिशेस्, भांडे, इत्यादी चीजवस्तू एकाच मोठ्या बॅगेत भरून मी चाललो होतो. घरातून खाली येऊन बराच वेळ वाट पाहिली, तरी टॅक्सी मिळेना. तेव्हा एजवेअर रोड या लोकल स्टेशनवरून व्हिक्टोरिया स्टेशनवर जावे, या विचाराने मी जड बॅग मोठ्या मिनतवारीने पेलत अंधारातून रस्त्याच्या कडेने जात होतो. बॅग अवजड असल्यामुळे मला एका दमात

फार तर चारपाच मिनिटे चालता येत होते. म्हणून मी वाटेने जाता जाता कोठे घराच्या पायरीवर तर कोठे फूटपाथवर बॅग ठेवीत व क्षणभर विश्रांती घेत चाललो होतो. अशाच एका पायरीवर ठेवलेली बॅग घेऊन मी दहावीस पावले चाललो असेन नसेन, तोच एका इमारतीच्या आड मुद्दाम उभे राहिलेले दोन शिरस्त्राणधारी पोलीस एकदम माझ्यापुढे उभे राहिले.

"एक्स्क्यूज् मी सर." त्यांच्यापैकी एका पोलिसाने मला थांबवून नम्र पण करारी शब्दात विचारले, "व्हॉट आर यू कॅरिंग इन् धिस् बॅग ?" (या बॅगेत काय आहे ?)

मी एकदम दचकलोच! वास्तविक माझ्या बॅगेत आक्षेपार्ह असे काही नव्हते. पण त्या परदेशात, अंधाऱ्या रात्री, अवाढव्य पोलिसांनी मला रोखल्यावर क्षणभर मला काय बोलावे हे सुचेना, हे मात्र खरे. त्याच वेळी माझ्या लक्षात आले, की एक जड बॅग घेऊन मी, संशयास्पद रीतीने अंधारातून जात आहे, यावर त्या दोघांनी बराच वेळ पाळत ठेवली असावी. वास्तविक मी अधूनमधून बॅग खाली ठेंवीत होतो ते केवळ ती जड होती म्हणून. पण त्या पोलिसांना साहजिकच असे वाटले, की या बॅगेत काही चोरीचा माल किंवा प्रेतबीत तर नसेल ? तसे नसेल तर हा इसम असा बिचकत बिचकत आणि अधूनमधून बॅग खाली ठेवून इकडे तिकडे काळजीपूर्वक पाहत का जातो आहे ?

"मी...मी गावाला चाललो आहे, आणि महिनाभर तिथं राहायचं असल्यानं माझे कपडे आणि सामान या बॅगेत आहे." मी सांगितले.

"ठीक तर! बॅग उघडून दाखवता का ?" दुसऱ्या पोलिसाने विचारले.

"हो हो! दाखवतो की!" असे म्हणून मी खिशात किल्ल्या चाचपू लागलो. पण दुर्दैव असे की, कोटाच्या, पॅन्टच्या सर्व खिशात शोधून पाहिले, तरी बॅगची किल्ली सापडेना.

आता त्या पोलिसांचा संशय अधिकच बळावला. त्यांच्यापैकी एकाने मला विचारले, "तुमचा घरचा पत्ता आणि नाव-गाव काय ?"

"माझं नाव आर.आर.मंत्री. पत्ता-दहा स्टॅटफ्रर्ट हाऊस, मैदा व्हेल, लंडन, डब्ल्यू नाईन." मी न अडखळता सांगितले.

"या पत्त्यावर आलेलं तुमचं एखादं पत्रं दाखवता का ?" पोलिसाने मला विचारले.

"पत्र ?" मी खिशात पुन्हा धुंडू लागलो. एक पत्र हाताला लागल्याबरोबर मला अतिशय आनंद झाला. ते त्यांच्या हाती देत मी म्हटले, "हे घ्या."

त्याने बॅटरीच्या उजेडात पत्रावरचा पत्ता वाचला. तो म्हणाला, "हा पत्ता निराळा आहे. यावर 'सहा, सॅडर्स ग्रव्ह, लंडन, डब्ल्यू अकरा" असा पत्ता आहे."

म्हणजे याही ठिकाणी माझे दुर्दैव आड आले होते. तो माझा जुना पत्ता होता आणि स्टॅटफर्ड होऊसच्या नव्या पत्त्यावर आलेले एकही पत्र माझ्या जवळ नव्हते. आता काय करावे, असा विचार मी करू लागलो. आमच्या देशातील पद्धतीप्रमाणे आता पोलीस मला चौकीवर नेणार, तेथे बॅगचे कुलूप फोडून आतली चीजवस्तू तपासली जाणार, कदाचित् जामीनही द्यावा लागणार, आणि या सर्वांचा परिणाम म्हणून फावरशॅमची मिळालेली नोकरी जाणार, असे चढत्या भांजणीचे विचार माझ्या मनात येऊ लागले. तोच त्यातील एक पोलीस म्हणाला, "डू यू हॅव एनिथिंग टु एस्टॅब्लिश युवर आयडेन्टिटी, सर ?" (तुमची ओळख पटवण्यासाठी तुमच्याकडे काही कागदपत्र आहे का ?)

सुदैवाने माझ्याकडे 'नॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स'चे (विद्यार्थी संघटना) ओळखपत्र होते. ते कारखान्यातील नोकरीसाठी दाखवायचे होते म्हणून मी बरोबर घेतले होते. ते दाखविल्यावर त्या दोन पोलिसांनी आपसात थोडा वेळ विचारविनिमय केला आणि कार्डावर दिलेला माझा पत्ता उतरून घेऊन त्यांनी मला जाऊ दिले.

व्हिक्टोरिया स्टेशनवर मी पोचलो, तेव्हा रात्रीचे बारा वाजत आले

होते. त्या स्टेशनवरून सुटणाऱ्या गाड्यांचे बोर्ड पाहत मी उभा होतो, तोच स्टेशनच्या आवारात पंधरावीस पोलीस शिरलेले मी पाहिले. पण तिकडे दुर्लक्ष करून मी फावरशॅमच्या गाडीची वेळ पाहू लागलो. मात्र त्या पोलिसांनी माझ्याकडे दुर्लक्ष केलेले दिसले नाही. त्यांच्यापैकी एकजण माझ्यासमोर येऊन मला विचारता झाला,

" माफ करा, पण आपण कोणत्या गाडीनं जाणार आहात ? "

" मी...फावरशॅमला जाणार आहे. का ? "

" अधिकृत पॅसेंजरांनाच रात्रीच्या वेळी स्टेशनच्या आवारात विश्रांती घेता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे, फावरशॅमला जाणारी गाडी इथून सुटत नाही. "

"आँ ? खरं की काय ? " मी खिशातून माहितीपत्रक काढले. 'नॅशनल युनियन ऑफ स्टुडंटस'ने ते पाठवले होते. फावरशॅमला कसे पोचायचे याचा तपशील त्या छापील माहितीपत्रकात दिलेला होता. त्यात स्पष्टपणे लिहिले होते की, 'व्हिॲडक्ट स्टेशनवरून रात्री अडीचला निघणारी गाडी सकाळी साडेसहाला फावरशॅमला पोचते.' म्हणजे मी धांदरटपणे 'व्हिॲडक्ट' ऐवजी 'व्हिक्टोरिया' असे नाव वाचले होते. त्याचे हे फळ होते !

माझ्या बॅगेचे लटांबर घेऊन मी व्हिक्टोरिया स्टेशनच्या बाहेर पडलो. आता व्हिॲडक्ट स्टेशनला कसे पोचायचे हा एक प्रश्नच होता. कारण रात्रीचे बारा वाजून गेल्यामुळे रस्ते ओस पडले होते आणि टॅक्सीसुद्धा क्वचितच दिसत होती. व्हिक्टोरिया स्टेशनच्या उबदार आवारात मला थांबता येणार नाही असे पोलिसांनी स्पष्ट केल्यामुळे, बाहेर भयाण रस्त्यावर थंडीत कुडकुडत उभे राहण्यावाचून मला गत्यंतर नव्हते. माझ्या अंगात त्यावेळी लांब गरम ओव्हरकोट होता. थंडीपासून हातांचा बचाव करावा म्हणून मी त्या ओव्हरकोटाच्या खिशात हात घातले, तोच उजव्या हाताला बॅगेच्या किल्ल्या लागल्या! काही वेळापूर्वी एजवेअर रस्त्यावर पोलिसांनी मला

हटकले, तेव्हा ज्या किल्ल्या सापडत नव्हत्या, त्या अशा तऱ्हेने अचानकपणे मिळाल्या. पण तो आंनद साजरा करण्याच्या मन:स्थितीत मी नव्हतो. लंडनच्या लोकल गाड्या त्यावेळी बंद झाल्या होत्या आणि चालत जाणे तर शक्यच नव्हते. कारण ते स्टेशन निदान पाचसहा मैल लांब होते.

लांबून एक टॅक्सी येताना दिसली. पण तिला मी थांबविल्यावर ड्रायव्हरने सांगितले, 'सॉरी! आय् ॲम गोइंग होम!' (माफ करा, मी घरी जात आहे). दुसऱ्या एका टॅक्सीची तीच गत झाली. अखेर रात्री जवळजवळ पाऊण वाजता एक टॅक्सीवाला यायला तयार झाला. त्या अवेळी त्याच्या मोटारीत बसलो खरा, पण एरवी आनंदी, विलासी वाटणारे लंडन शहर, रात्री एक वाजता अपरिचित भागातून आणि अज्ञात माणसाच्या टॅक्सीतून जाताना किती भयाण, रहस्यमय वाटते, याची मला त्यावेळी कल्पना आली. साधारण दीड वाजता मी व्हिॲडक्ट स्टेशनवर आलो, तेव्हा मी सुटकेचा नि:श्वास टाकला.

त्या अपरात्री स्टेशनच्या आवारात एकदोन पोर्टर आणि एकदोन उतारू होते. स्वत:वर 'अधिकृत उतारू' असा शिक्का बसावा म्हणून मी लगेच तिकीट-ऑफिसकडे गेलो आणि फावरशॅमचे तिकीट मागितले.

"सिंगल की रिटर्न?" तिकीट-मास्तरने विचारले.

"मला परत यायला खूप दिवस आहेत. सिंगलच द्या." मी म्हणालो. परतीचे तिकीट काढून पैसे घालवू नयेत हा सूज्ञ विचार अर्थातच मला त्यावेळी सुचला होता.

पण तिकीट-मास्तर म्हणाला, "तुम्हाला पाहिजे तर सिंगल देतो. पण माझं ऐका तुम्ही. परतीचं तिकीट काढा. कारण सिंगल तिकिटापेक्षा परतीचं तिकिट स्वस्त आहे!"

प्रथम माझा या शब्दांवर विश्वासच बसेना! कारण एका वेळच्या प्रवासापेक्षा परतीच्या प्रवासाचे तिकीट स्वस्त असणे जगात कोठे तरी शक्य आहे काय? असा मला प्रश्न पडला. उद्या जर कोणी म्हणेल की,

पुणे ते मुंबईचे तिकीट पाच रुपये आहे, पण पुणे ते मुंबईचे परतीचे तिकीट मात्र चार रुपयेच आहे, तर ते खरे वाटणार नाही. पण हा अद्भूत प्रकार इंग्लंडमध्ये मात्र आहे खरा, असे मला आढळून आले. कारण व्हिअॅडक्ट स्टेशनच्या तिकीटमास्तरने सांगितले, ' हा कामगारांच्यासाठी सवलतीचा खास प्रकार आहे. त्याला ' अर्ली मॉर्निंग रिटर्न ' म्हणतात. पहाटेपूर्वीच ही तिकिटं देण्यात येतात. लंडनहून आसपासच्या गावी कामासाठी जाणाऱ्यांना किंवा जवळच्या गावाहून लंडनला जाण्यासाठी येणाऱ्यांना सोयीचं पडावं म्हणून ही योजना आहे. ' अर्थातच इतर कोणी या योजनेचा गैरफायदा घेण्याची फारशी शक्यता नसते. कारण, दोनचार शिलिंग वाचवण्यासाठी कोणी पहाटे चार वाजता उठून स्टेशनवर येणार नाही.

फावरशॅमच्या परतीचे तिकीट मी काढले आणि तासभर त्या अवाढव्य पण भयानक स्टेशनात वाट पाहत बसलो. रात्री अडीचला प्रवास सुरू झाला. संबंध गाडीत फार तर पंधरावीस प्रवासी असतील. एकट्याने एका डब्यातून प्रवास करण्याचा धोका पत्करू नये, म्हणून मी एकदोन प्रवासी असलेल्या एका डब्यात बसलो. पण झोप येईल तर शपथ! सहप्रवासी होते ते पेंगुळलेले, निरुत्साही. गाडीच्या बाहेर सारा अंधार! त्यामुळे खिडकीतून बाहेरचे पाहण्याची सोय नव्हती. गाडी सकाळी सहाच्या सुमारास फावरशॅमला पोहोचणार होती, म्हणून झोपण्याचीही भीती वाटत होती. कारण झोपेत असताना ते स्टेशन गेले तर पुन्हा पंचाईत व्हायची! अशा द्विधा आणि अस्वस्थ मनःस्थितीत साडेतीन तास ढकलल्यावर अखेर ते गाव आले आणि अगदी अंधुक प्रकाशात, थंडीच्या कडाक्यात आणि पावसाच्या झिमझिमीत मी बॅगेसहवर्तमान खाली उतरलो स्टेशनवरून कारखान्याकडे नेण्यासाठी कारखान्याची मोटार येईल, असे आमच्या माहितीपत्रकात लिहिले होते. म्हणून मी स्टेशनच्या बाहेर येऊन मोटारीची वाट पाहत उभा राहिलो.

साडेसहा झाले, पावणेसात झाले, सातसुद्धा वाजून गेले,-पण

मोटारीचा पत्ता नव्हता! मी तर थंडीने अगदी गारठून जात होतो आणि अद्याप स्टेशनवरचे किंवा जवळचे एकही हॉटेल उघडलेले नसल्याने चहा किंवा इतर गरम पेय मिळणेही मुष्कील होते. इंग्लंडमध्ये ठरल्या वेळी मोटार किंवा भेटायला येणारी व्यक्ती आली नाही, असे सर्वसाधारणपणे कधी होत नाही. म्हणून मी खिशातले माहितीपत्रक काढून पुन्हा काळजीपूर्वक वाचले.

आणि मग मला असे आढळून आले की, मी फावरशॅमला सबंध एक दिवस उशिरा आलो होतो!

शनिवारी पहाटे अडीच वाजता लंडनहून निघून रविवारी सकाळी सहा वाजता फावरशॅमला यावे, असे त्या माहितीपत्रकात नि:संदिग्धपणे म्हटले होते. पण मी मुळातच ते नीट वाचले नव्हते. सोमवारपासून आमचे काम सुरू होणार असल्याने माझी कल्पना झाली की, रविवारी निघून सोमवारी सकाळी मी त्या गावी यावे अशी अपेक्षा असावी. आपल्याला आलेले पत्र किंवा माहितीपत्रक संपूर्णपणे नीट वाचावे, हा मोठा धडा मी त्यावेळी शिकलो. कारण ते पत्रक जर मी लक्षपूर्वक वाचले असते, तर त्यावेळी मला झालेला त्रास वाचला असता.

ती अगदी सकाळची वेळ होती आणि फावरशॅम हे फार लहान गाव होते. त्यामुळे मला टॅक्सी किंवा बस मिळाली नाही. जवळपास चौकशी केली तेव्हा 'स्मीडले' हा कारखाना स्टेशनपासून सुमारे दोन मैल लांब असल्याचे कळले. लंडनसारख्या मोठ्या शहरीसुद्धा हमाल मिळण्याची मारामार पडते, तर छोट्या गावात तो मिळणे अशक्यच होते. आता ही अवजड बॅग घेऊन पावसात आणि थंडीत दोन मैल चालत कसे जायचे या विचाराने मी हताश झालो. पण जाणे भागच होते. हळूहळू थांबत थांबत जावे अशा विचाराने मी निघालो.

हा दोन मैलांचा रस्ता मला अत्यंत कष्टाचा आणि कंटाळवाणा वाटला. उघडे उपाहारगृह एकही दिसले नाही. कोणाच्या घराच्या आडोशाला

उभे राहणे संकोचाचे वाटायचे आणि पावसाची रिपरिप तर चाललेलीच होती. माझे हात ओझ्याने अगदी करकचून गेले. शेवटी कारखान्याचे विस्तीर्ण आवार मला दिसले, तेव्हा अगदी फार मोठे ध्येय गाठल्याचा मला आनंद झाला. आत गेल्याबरोबर आधी 'नॅशनल युनियन ऑफ स्टुडंटस्' चे ओळखपत्र एका अधिकाऱ्याला दाखविले. त्याने माझे स्वागत करून म्हटले, "तुम्ही अगदी गारठून गेलेले दिसता. तुमचं सामान बराकीत ठेवा आणि डायनिंग रुममध्ये जाऊन ब्रेकफास्ट घ्या."

जवळजवळ अडीच तास गारठून गेल्यावर मला अंडी, टोस्ट आणि चहाची ती न्याहारी मोठी उत्तेजक वाटली. त्या ठिकाणी मला माझ्यासारखेच कारखान्यात कामाला आलेले अनेक देशांचे अनेक विद्यार्थी भेटले. त्यांनी माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचलेले असल्याने ते सर्वजण आदल्या दिवशीच आले होते. सुमारे पाऊणशे विद्यार्थी सुट्टीत महिना-दीड महिना कारखान्यात काम करण्यासाठी इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांतून आले होते. त्यात भारत, पाकिस्तान, वेस्ट इंडीज्, नायजेरिया, सिलोन, स्कॉटलंड, इत्यादी देशांचे विद्यार्थी होते. कॉमनवेल्थमध्ये असलेल्या देशांचेच हे विद्यार्थी होते. आम्हा सर्वांना राहण्यासाठी म्हणून सैन्याच्या बराकीसारख्या लांबलचक चार बैठ्या तात्पुरत्या इमारती बांधलेल्या होत्या. त्यात हॉस्पिटलसारख्या खाटा टाकलेल्या होत्या. त्या खाटांखाली सामान ठेवायचे, दिवसभर कारखान्यात काम करायचे, कारखान्याच्या डायनिंग हॉलमध्ये जेवायचे आणि रात्री दमूनभागून खाटांवर अंग टाकायचे, असा आमचा ठोकळ कार्यक्रम होता.

आमच्या कामाचे स्वरूप बौद्धिक नव्हते, अंगमेहनतीचे होते. त्यात मेहनतीपेक्षा लक्ष ठेवण्याचाच भाग जास्त होता. ब्रेकफास्ट झाल्यावर सकाळी दहा वाजता कारखान्याच्या एका अधिकाऱ्याने सर्व विद्यार्थी-कामगारांना एकत्र बोलावून कामाची सर्वसाधारण कल्पना दिली. त्याने स्पष्टपणे सांगितले,-'तुम्ही जोपर्यंत कामावर असाल तोपर्यंत प्रत्येक क्षण लक्षपूर्वक काम केलं पाहिजे. प्रत्येकाला आम्ही काम देऊ शकूच असं नाही. एखाद्याचं

काम पसंत नसेल, तर त्याला ताबडतोब कामावरून दूर करू. पावसामुळं फळांची आयात झाली नाही, तर सबंध कारखाना किंवा काही भाग बंद ठेवावे लागतील. आपलं काम सोडून किंवा संपवून तुम्हाला इतर भागात फिरता येणार नाही. तुम्ही सर्व तात्पुरते आणि रोजावर काम करीत आहात. त्यामुळं तुम्हाला कामगारविषयक कायद्याचा फायदा घेता येणार नाही.

'तुम्हाला कामगारविषयक कायद्याचा फायदा घेता येणार नाही.'

अशा कडक शब्दात कामाचे स्वरूप सांगितले गेल्याने आम्ही खूपच वचकून वागत होतो. 'स्मीडले' हा कॅनिंगचा फार मोठा कारखाना आहे. स्ट्रॉबेरी, गूजबेरी, वाटाणे, ब्लॅकबेरी, पीच, प्लम्, अननस, अशी अनेक प्रकारची फळे इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांतून फावरशॅमला येतात. स्मीडलेच्या कारखान्यात ती प्रथम नीट केली जातात. त्यातील काड्या, पाने, देठ वगैरे बाजूला केले जातात. मग फळांचे लहान मोठी असे वर्गीकरण होते. त्यानंतर ही फळे स्वच्छ पाण्याने धुतली जातात व मग डब्यात भरून ती हवाबंद केली जातात. अनेक प्रकारची फळे निरनिराळ्या रसात घालूनही हवाबंद केली जातात.

आम्हाला आमच्या कामाबद्दल दर तासाला तीन शिलिंग (सुमारे अडीच रुपये) मिळत असत. स्त्रियांना तासाला अडीच शिलिंग मिळत. मात्र कारखान्यात काम करण्यासाठी आम्हा विद्यार्थ्यांप्रमाणे कोणी विद्यार्थिनी बाहेरून आल्या नव्हत्या. स्थानिक किंवा आसपासच्या स्त्रियाच कारखान्यात काम करीत होत्या. मात्र स्त्रिया म्हणून त्यांच्याकडे कधी पाहण्याचा किंवा बोलण्याचा मला प्रसंग आला नाही. आम्ही कोणी तशा मूडमध्ये नव्हतो. आणि खरे म्हणजे तशी फुरसतही नव्हती. कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रिया आमच्याकडे थोड्या अधिक्षेपाने पाहत असाव्यात, असेही आम्हा विद्यार्थ्यांना केव्हा केव्हा वाटे. पण जो तो आपला आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी आलेला होता. मग प्रणयासारख्या नाजुक भावनांना तेथे फारसा वाव नसावा, हेही साहजिक होते.

काम करण्यासाठी आम्ही इतक्या लांब आलो, पण सर्वांनाच काम मिळेल याची खात्री नाही, असे आम्हाला सुरुवातीलाच एका अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे आम्ही हवालदिल झालो. अर्थातच जे काम सांगितले जाईल ते स्वीकारण्याची विद्यार्थ्यांत चढाओढच लागली. पहिल्याच दिवशी त्या अधिकाऱ्याने विचारले, "आम्हाला बारा पेंटर्स पाहिजेत. पेंटिंग करायला कोण तयार आहे ?"

पंधरावीस विद्यार्थ्यांबरोबरच मीही हात वर केला. वास्तविक हे 'पेंटिंग' म्हणजे काय काम आहे याची मला किंवा इतर विद्यार्थ्यांना काहीच कल्पना नव्हती. मला फक्त तासाला मिळणारे तीन शिलिंग दिसत होते. त्या अधिकाऱ्याने चट्कन् दिसतील त्या बारा जणांना निवडले आणि आपल्याबरोबर चलण्यास सांगितले. कचेरीत गेल्यावर आमच्यापैकी प्रत्येकाचे वर्ककार्ड तयार करण्यात आले. दररोज कारखान्यात कामावर येताना, घड्याळास जोडलेल्या एका यंत्राच्या फटीत ते कार्ड घातल्यावर त्यावर ती वेळ असलेला शिक्का पडतो. मग ते कार्ड जवळच्या पेटीत घालायचे. काम संपल्यावर काम संपल्याची वेळ कार्डावर घालण्यासाठी कचेरीत जायचे, असे त्या अधिकाऱ्याने समजावून सांगितले. आम्ही कामाच्या सुरुवातीची वेळ कार्डावर टाकून घेतली आणि कामगारांचा गणवेश घेण्यास गेलो. 'स्मीडले' हा निळ्या रंगातील अक्षरे विणलेला पांढरा लांब कोट प्रत्येकास देण्यात आला. मग आम्हाला साधारण नऊ इंच उंचीचा तयार ऑइलपेंटचा डबा आणि ब्रश देण्यात आला. जुनी यंत्रे, पार्टीशनच्या फळ्या, लाकडी पेट्या,इत्यादी वस्तू त्या रंगाने रंगविण्यास अधिकाऱ्याने सांगितले,

आम्ही रंगकाम करू लागलो. माझ्या शेजारी एक आयरिश विद्यार्थी एका यंत्राचे मोठे चाक रंगवीत होता. त्याला मी म्हटले, 'If ever I write an autobiography, I can confidently say that in England I made a living by painting!' ('मी जर कधीकाळी आत्मचरित्र

लिहिलेच, तर मला निश्चीतपणे असे म्हणता येईल की, इंग्लंडमध्ये मी 'पेंटिंग' वर जगत होतो!')

अर्धा तास रंगकाम झाल्यावर माझ्या लक्षात आले की यंत्रापेक्षा माझ्या लांब डगल्यावरच अधिक रंगकाम झाले आहे! कवीप्रमाणेच चित्रकारही जन्मावा लागतो, हेच खरे, तरी पण आम्ही रंगविलेली ती यंत्रे रंगीत नाहीत असे म्हणण्याची कोणाची छाती नव्हती. कारण त्यावरून बराच काळ रंग ओघळत होता. पण मला वाटते, कारखान्याचे रंगाचे बजेट मर्यादितच असावे. कारण दुसऱ्याच दिवशी आमची दुसऱ्या खात्यात बदली करण्यात आली.

हे नवे काम मोठे किचकट, कंटाळवाणे आणि त्रासदायक होते. साधारण दीड फूट रुंदीचा आणि पन्नाससाठ फूट लांबीचा रबराचा पट्टा होता. तो हळूहळू पण एकसारखा फिरत असे. त्या पट्ट्यावरून नुकतीच थंड पाण्याने धुतलेली फळे सोडण्यात येत. साधारण करवंदाच्या आकाराची ही फळे होती. त्यात क्वचित् देठ असे, किंवा एखादे अगदी कच्चे फळही असे. असे देठ, चिरडलेली किंवा कच्ची फळे त्या फिरत्या पट्ट्यावरून पटकन् काढून खाली टाकून द्यायची असे हे काम होते. या कामात अनेक कामगार विद्यार्थ्यांना जवळजवळ उभे राहावे लागे. त्यामुळे अधूनमधून गप्पा मारता येत असत. पण त्याही अगदी माफक प्रमाणात आणि दबलेल्या आवाजात. कारण कारखान्याचे इन्स्पेक्टर्स एकसारखे फिरत असत. त्यांनी आम्हाला बोलायला कधी बंदी केली नाही हे खरे, पण त्यांचे दडपण मनावर पडत असे. कोणी मंदपणे हात चालवू लागला किंवा कोणाच्या पुढून देठ व फुटलेली फळे तशीच जाऊ लागली, तर हे इन्स्पेक्टर्स त्याला लगेच सौम्यपणे पण स्पष्ट शब्दात सूचना करीत. हे काम संपूर्णपणे उभ्यानेच करावे लागे. फळे अगदी थंड पाण्यात धुऊन घेत असत आणि हवेत बराच गारठा होता. त्यामुळे तासाभरातच हात अगदी थंड होऊन सुन्न होतात की काय असे वाटे. साधारण चार चार तासांनंतर तर आपली

बोटे हा आपल्या शरीराचाच भाग आहे की नाही अशी शंका मनात येऊ लागे! पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या सभेत आम्हा कामगारांचा एक नेता निवडला गेला होता. विद्यार्थ्यांच्या तक्रारी व्यवस्थापकांच्यापुढे मांडणे, विद्यार्थ्यांची पत्रे पोस्टात नेणे, चालकांचा दृष्टिकोन आम्हाला सांगणे, अशी त्याची कामे असत. आणि त्याबदली त्याला अर्धा दिवस पगारी रजा असे. मात्र 'मला काम फार पडते किंवा काम त्रासाचे आहे,' अशी तक्रार त्याच्याजवळ करण्यात काय हशील नव्हते. कारण 'घरी जाण्यास तुम्ही मुखत्यार आहात' असे सांगून तो मोकळा झाला असता.

कारखान्याच्या कामात एक वाजता सकाळच्या जेवणाची सुट्टी होई आणि पाच वाजता संध्याकाळच्या जेवणाची सुट्टी होई. या दोन्ही सुट्ट्या प्रत्येकी अर्ध्या तासाच्या आणि बिनपगारी असत. सकाळी आठ वाजता कारखाना सुरू होई आणि रात्री साडेअकरा वाजेपर्यंत चाले. कधी कधी फळे जास्त आली तर चोवीस तास कारखाना चालू राही. सकाळी दहा वाजता आणि दुपारी तीन वाजता फक्त पाचच मिनिटे चहाची सुट्टी असे. पण डायनिंग रूमकडे जाण्यायेण्यात कामगारांचा वेळ जाऊ नये म्हणून त्यांच्या कामाच्या ठिकाणीच या दोन्ही वेळा चहा आणून देण्यात येई.

तेवढ्यापुरती त्या त्या भागातील यंत्रे बंद ठेवण्यात येत असत. कारखान्यातर्फे आम्हाला मिळणारे जेवण स्वच्छ, उत्तम प्रतीचे आणि पौष्टिक असे. त्यात अंडी, दूध, मांस, भाज्या भरपूर असत. अर्थातच इंग्लंडच्या पद्धतीप्रमाणे त्यात तिखटमीठ नसे. पण त्या वेळेपर्यंत मला इंग्लंडमध्ये येऊन वर्षभर झाले होते आणि ते जेवण माझ्या अंगवळणी पडले होते. संध्याकाळी साडेसहा-सात वाजता काम संपले, की मग सर्वजण अंघोळीसाठी जात. मी 'फिंगरिंग हो' येथील सैनिकी छावणीत असताना जशी सामुदायिक स्नानाची व्यवस्था होती, तशीच या कारखान्यातही होती. येथेही मोठ्या स्नानगृहात एका वेळी पन्नास पाऊणशे विद्यार्थी नग्न होऊन अंघोळ करीत. स्त्री-कामगारांच्यासाठीही अशीच व्यवस्था होती.– अर्थातच ती

आमच्यापैकी कुणालाही पाहायला मिळाली नाही, हे सांगणे नकोच!

फळे निवडण्याचे काम फार त्रासदायक, म्हणून मी दुसऱ्या खात्यात वदली करून घेतली. हे काम पुन्हा 'पेंटिंग'चे आले. अर्थात् हे पेंटिंग म्हणजे काही कौशल्याचे नव्हते, तर लाकडी पेटच्यांवर 'स्मीडले' हा शिक्का मारणे एवढेच हे काम बसून करावयाचे आणि तसे पाहिले तर हलके होते. पण अतिशय कंटाळवाणेही होते. माझ्यासारखेच काम करणारा एक बंगाली, एक आफ्रिकन आणि एक स्कॉच असे आणखी तीन विद्यार्थी होते. हे काम कारखान्यावाहेर एका शेडमध्ये होते आणि तिकडे तपासनीसांची फारशी करडी नजर नव्हती. त्यामुळे आम्हाला जरा मनमोकळेपणाने गप्पा मारता येत असत.

आमचे रंगकाम चालले असताना एक आफ्रिकन विद्यार्थी म्हणाला, 'या गोऱ्या मुली मिळवण्याची एक युक्ती असते. मी काय करतो की, मी बँक-मॅनेजर आहे असं त्यांना सांगतो. या गोऱ्या पोरी म्हणजे पैशासाठी जीव टाकतील! बँक-मॅनेजर म्हटल्याबरोबर त्यांना माझ्याबद्दल आदर वाटतो. मीसुद्धा सुरुवातीला अगदी नमून वागतो. प्रियाराधनाच्या पहिल्या अवस्थेत मी मुलींचं वाटेल ते ऐकतो आणि त्यांच्या मी अगदी मुठीत आहे असं दाखवतो. पण एकदा का त्या माझ्या तावडीत आल्या, की मी त्यांना गुलामासारखं वागवतो. मग या गोऱ्या पोरी आपलं वाटेल ते ऐकतात.'

त्याच्या या बोलण्यात सत्यकथनापेक्षा बढाईच अधिक होती हे उघड होते. गोऱ्या मुलींना आकर्षित करण्याचा असा काहीही सोपा फॉर्म्युला नाही. प्रत्येक मुलीची आवड-निवड आणि सांस्कृतिक पातळी वेगळी असते. एखाद्याने आपण बँक-मॅनेजर आहोत असे सांगितल्याबरोबर त्याच्या गळ्यात हात टाकण्याइतक्या युरोपियन मुली निश्चितच वेडगळ नाहीत. त्या आफ्रिकन विद्यार्थ्याचे बोलणे एरवी मी विसरून गेलो असतो, पण एका आश्चर्यकारक रीतीने त्याची ही 'थिअरी' दुसऱ्या एका आफ्रिकन मुलाने एका इटालियन

मुलीवर चालवून पाहिलेली माझ्या पाहण्यात आली. ब्रिटिश कौन्सिलमध्ये या मुलीची व माझी ओळख झाली. पुढे आमची अधिक मैत्री झाल्यावर तिने सांगितले की, एका आफ्रिकन मुलाने आपण बँक-मॅनेजर आहोत, खूप श्रीमंत आहोत वगैरे थापा मारून तिची मैत्री केली. सुरुवातीला तो तिच्याशी अगदी गुलामासारखा वागत असे. पण पुढे पुढे तो तिला आपली मालकीची वस्तूच समजू लागला. अर्थातच तिने मग त्याच्याशी असलेले मैत्रीचे संबंध ताबडतोब सोडून टाकले. तो बँक-मॅनेजर नसून एक सर्वसाधारण परिस्थितीतील विद्यार्थी आहे हे अगदी सुरुवातीलाच आपल्या लक्षात आले होते, असेही त्या इटालियन मुलीने सांगितले. त्यावरून, फळांच्या कारखान्यात त्या आफ्रिकन विद्यार्थ्याने मला सांगितलेल्या 'ट्रिक' वर बऱ्याच आफ्रिकन विद्यार्थ्यांचा विश्वास असावा असे मला वाटले आणि अशा फालतू ट्रिकला पाश्चात्य मुली बळी पडत नाहीत हेही आपोआपच सिद्ध झाले.

लाकडी पेटऱ्यांवर नावे घालण्याचे काम आम्ही दोन दिवस केले असेल. आठ तासांपेक्षा अधिक काम केले, तर पहिले दोन तास सव्वापट आणि पुढे दीडपट वेतन मिळत असे. अनेक विद्यार्थी दहा, बारा किंवा चौदा तासही काम करीत. सर्वांत जास्त पैसा देणारे काम म्हणजे 'फ्रीज'मधील काम. बर्फाच्या एका प्रचंड खोलीत हवाबंद डबे ठेवायचे, बर्फाचे मोठाले चौकोन ठेवायचे, हे ते काम असे. ते करताना पायात बूट, अंगात गरम ओव्हरकोट आणि हातात हातमोजे घालणे आवश्यक असे. पण या खोलीत इतकी थंडी होती की, आत शिरल्यावर उत्तर ध्रुवावर आल्याचा भास होई आणि थंडीच्या भीतीने मी हे काम कधीच केले नाही.

पेटऱ्यांवर शिक्के मारण्याचे काम इतके कंटाळवाणे होते की, आठ तास भरणेही आम्हाला नकोसे वाटायचे, मग ओव्हरटाइम करणे तर दूरच राहिले. त्यापेक्षा अंगमेहनतीचे काम असले तरी परवडले असे मला वाटू

लागले आणि तिसऱ्याच दिवशी मला जरा वेगळे काम मिळाले. हे काम म्हणजे डब्यात फळे भरण्याचे होते. एका मोठ्या तव्यासारख्या यंत्रावर मोकळे डबे गोल फिरत येत आणि रबरी पट्ट्यावर जात. या गोल यंत्राभोवती चार स्त्रिया आणि आम्ही दोघे विद्यार्थी होतो. हे डबे फार तर अर्धा मिनिट यंत्रावर असत. तेवढ्यात हे डबे फळांनी भरण्याचे आमचे काम होते. सुरुवातीला तर आम्हा नवशिक्यांना अर्ध्या मिनिटात सबंध डबा व्यवस्थित भरणे जमत नसे. मग आमच्या सहकारी मुली डबे गच्च कसे भरायचे ते घाईघाईतच दाखवीत. दोनतीन तास ते काम केल्यावर आम्हालाही ते जमू लागले. आले वाटाणे, गुजबेरी, राजबेरी, अशी अनेक फळे निरनिराळ्या यंत्रांवर आम्ही भरीत असू. कारखान्यात काम करणाऱ्यांना काम करता करता फळे तोंडात टाकणे शक्य होते आणि बहुतेकजण या सोयीचा फायदा-काळवेळ पाहून, पण हमखासपणे घेत असत. फावरशॅमच्या त्या कारखान्यात मी जेवढी फळे खाल्ली तेवढी त्यापूर्वी कधी खाल्ली नव्हती आणि पुन्हा तशा नोकरीचा योग न आल्यास यापुढे कधी खाईन असेही वाटत नाही.

कधी कधी ओल्या वाटाण्याचे प्रचंड ढीग इकडचे तिकडे करण्याचे काम आम्हाला करावे लागे. या भागात पाणीच पाणी झालेले असे, म्हणून आम्हाला गुडघ्यापर्यंत उंच गमबूट वापरायला दिले होते. हे कामही मोठे अवजड आणि कंटाळवाणे होते. पण माझ्या मनात एक दिवशी विचार आला, की रोज आठ तास काम करून येथे दीड महिना राहण्यापेक्षा रोज बारा तास काम करून पाऊण महिन्यातच भरपूर पैसे मिळवून लवकर का परतू नये? कारण त्या काळवंडलेल्या, धक्काधक्कीच्या वातावरणात फार दिवस राहावे हे माझ्या मनाला रुचेना. पण भारतात परत येण्यासाठी मला जवळजवळ दीड हजार रुपयांची जोडणी करणे भागच होते, म्हणून कारखान्यातील कामही अटळ होते. भरपूर ओव्हरटाइम करून रोज पन्नाससाठ रुपये मिळविण्याचा मी निर्णय घेतला, आणि दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचच्या शिफ्टला मी येणार असल्याचे कारखान्याच्या अधिकाऱ्यांना

कळविले.

१८ ऑगस्ट १९५६ या दिवशी मी कारखान्यात जास्तीत जास्त काम केले. पहाटे साडेपाचला मी कारखान्यात कामाला गेलो, तो रात्री साडेअकरा वाजता काम संपविले, दोन जेवणाचा एक तास सोडला तर त्या दिवशी मी सतत सतरा तास अंगमेहनतीचे, कंटाळवाणे आणि किचकट काम केले. लंडनमध्ये विद्यार्थी-संघटनेच्या कचेरीत मी जेव्हा कारखान्यातील कामासाठी नाव नोंदविले तेव्हा तेथील अधिकाऱ्याने माझ्या किरकोळ अंगकाठीकडे पाहून म्हटले होते, 'तुम्ही कॅनिंग फॅक्टरीसाठी नाव देताय् ? पाहा बुवा! हे काम फार जड आणि त्रासाचं असतं. मी जर तुमच्या जागी असतो, तर दुसरं हलकं काम पाहिलं असतं.' पण मी हेच काम हवे असा आग्रह धरला होता आणि त्याप्रमाणे मला काम मिळाले होते. त्याचा भरपूर उपयोग करून जास्तीत जास्त ओव्हर-टाईम मिळविण्याचा मी प्रयत्न करीत होतो. असे दोन तीन दिवस गेले असतील नसतील, तोच दुसरेच एक संकट उद्‌भवले.

हे संकट अतिवृष्टीचे होते. वास्तविक ऑगस्ट म्हणजे इंग्लंडमधील ऐन उन्हाळ्याचे दिवस. पण त्या वर्षीचा उन्हाळा अगदीच वाईट निघाला. त्या वर्षी ऑगस्टमध्येही एकसारखा पाऊस पडत राहिला. असा सारखा पाऊस पडू लागला की, फळांच्या कारखान्यापुढे अनेक अडचणी निर्माण होतात. पहिली अडचण म्हणजे, अतिवृष्टीच्या वेळी शेतातून फळे काढणे अतिशय कठीण-जवळजवळ अशक्यच-होते. आणि या प्रतिकूल परिस्थितीतही फळे काढली, तरी ती शेतावरून कारखान्यात येईपर्यंत पावसाळी हवेत कुजून जाण्याची शक्यता असते. असे नुकसान सोसण्यापेक्षा अतिवृष्टीचे दिवस संपेपर्यंत कारखाना बंद ठेवणे किंवा निदान कारखान्याची काही खाती बंद ठेवणे अधिक सोयीचे असते. त्यामुळे आमच्या कारखान्याच्या एका अधिकाऱ्याने एका सकाळी आम्हा सर्वांना सांगितले, -'उद्यापासून तुम्हाला काम मिळणार नाही! कारखाना पुन्हा केव्हा चालू

होईल हे सांगता येणार नाही. ज्यांना राहायचं असेल त्यांनी राहावं, बाकीच्यांनी परत जायला आमची हरकत नाही. जे जाणार असतील त्यांनी आपले आतापर्यंतच्या कामाचे पैसे कचेरीतून घेऊन जावे.'

बस्स्! सारा रोखठोक कारभार! त्यात कसली भावना नाही, जिव्हाळा नाही, काही नाही! आभाराचे चार शब्दही नाहीत. 'पाहिजे तर राहा, नाहीतर, चालायला लागा,' असा रोकडा सवाल! या निर्णयाने विद्यार्थ्यात चांगलीच खळबळ माजली. या कामाला जे अगदीच कंटाळले होते त्यांनी फळांच्या कारखान्यातील या पडत्या फळाची आज्ञा घेऊन तावडतोब परत जायचे ठरविले. बहुतेकांनी, इतरत्र काम मिळविण्यात कालापव्यय करण्यापेक्षा लागतील तितके दिवस फावरशॅमलाच राहायचा निर्णय घेतला. माझ्यासारख्या काहीजणांनी एकदोन दिवस वाट पाहून परत जायचे ठरवले. फावरशॅमपासून दहाबारा मैलांवरच, धार्मिक क्षेत्रातील सुप्रसिद्ध 'कॅन्टरबरी' हे गाव आहे. कारखाना सुरू होईपर्यंत निदान हे क्षेत्र पाहिल्याचे पुण्य तरी पदरात घ्यावे या हिशेबाने मी आणि दोन विद्यार्थी दुसऱ्या दिवशी कॅन्टरबरीला गेलो. बी. ए. च्या ऑनर्सच्या तासाला चॉसरच्या 'टेल्स ऑफ कॅन्टरबरी' वाचलेल्या आठवल्या. कॅन्टरबरीचे भव्य चर्च मनावर छाप पाडते. पण आम्ही ज्या मन:स्थितीत त्या गावी गेलो होतो, ती सौंदर्याचे रसग्रहण करण्यास फारशी अनुकूल नव्हती, हे मात्र खरे. कारण कारखाना पुन्हा सुरू झाला नाही तर शंभर-पाऊणशे पौंड आणायचे कुठून, हा प्रश्न आम्हा तिघांच्याही पुढे पडला होता.

अतिशय काम केल्यानंतर एकदम रिकामे बसण्याची वेळ आल्यामुळे मला फावरशॅम गाव फारच सुने भासू लागले. आमच्या बरोबरच्या विद्यार्थ्यांच्या संगतीतही फारशी गंमत नव्हती. जो तो आपल्याच आर्थिक अडचणीच्या विचारात चूर असे. फावरशॅमच्या कोणत्याही नागरिकाची व आमची कधी ओळख झाली नाही. कारखान्यात काम करणाऱ्या कोणाही ब्रिटिश माणसाने कधी आमच्या वैयक्तिक जीवनाची चौकशी केली नाही.

सारे वातावरण व्यवहारी, कठोर होते. मग एकदोन दिवस झाल्यावर मलाही तेथे राहण्याचा कंटाळा आला. मला वाटले की, लंडनसारख्या नितांतसुंदर शहरी राहायचे सोडून येथे उगीच कामाची वाट पाहत बसण्यात काय अर्थ आहे? काय वाटेल ते झाले तरी फावरशॅमच्या नीरस जीवनाचा निरोप घ्यायचा असे मी ठरविले, आणि तडकाफडकी सामानसुमान घेऊन स्टेशनवर गेलो. फळांच्या कारखान्यात मी फक्त आठनऊ दिवसच काम केले होते. त्यामुळे मला जवळ जवळ हजार रुपयांची अतिशय आवश्यकता होती. लंडनला काम मिळेल की नाही याची खात्री नव्हती. आणि तेथे काम मिळाले तरी लंडनची राहणी खर्चाची असल्याने त्या पैशातून फारच थोडी शिल्लक पडे.

फावरशॅमहून निघताना, आता पुढे काय होईल याची मला मोठी चिंता वाटत होती. पण मी लंडनला आल्यावर मला फारच चांगले काम मिळाले. त्यानंतर दीड महिना मी लंडनला होतो. माझ्या आयुष्यात तो अतिशय सुखाचा काळ होता. इंग्लंडच्या आजूबाजूच्या एका नीरस कारखान्यात खितपत पडण्याऐवजी मला एक वेगळेच जीवन मिळाले. फावरशॅमचे काम अचानक संपल्याबद्दल आता मी परमेश्वराचे आभार मानू लागलो. पण तरीही त्या आडदांड कामाच्या आठवणी काही मनातून जाईनात. दु:खद प्रसंगी सुखाची आठवण काढून माणूस समाधान मानून घेण्याचा प्रयत्न करतो, तसेच सुखाच्या काळातही गतकालीन कष्टांच्या आठवणीने तो आपल्या सुखात भर घालण्याचा नकळत प्रयत्न करीत असावा, असे मला त्या आठवणींवरून वाटू लागले!

◇ ◇ ◇ ◇

# सात : स्मृतींचे त्रिदळ

काही घटना अशा असतात की, त्यावर संपूर्ण लेख किंवा कथा लिहिता येत नाही. पण त्या अगदीच सोडून देणेही जीवावर येते. कारण त्या घटनांनी आपल्या मनावर कुठेतरी खोल छाप ठेवलेली असते. एखाद्या निवांत वेळी अशा काही घटना आठवतात, आणि मग त्यावरून आपण सर्वसामान्य निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करू लागतो. पण थोड्याच वेळात आपल्या असेही लक्षात येते की, अशा अनेक विविध प्रकारच्या घटनांना सांधणारा एकच धागा काही सापडत नाही, म्हणून त्यावरून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्नही सफल होणार नाही. आणि तरीही त्या घटना, ते प्रसंग, काहीसे रंजक, काहीसे आनंददायी किंवा दुःखद असतात. त्यांची आठवण बुजवू म्हटले तरी बुजत नाही. माझ्या परदेशातील वास्तव्यात असे जे थोडे प्रसंग माझ्या अनुभवाला आले, त्यांपैकी काही सांगावेसे वाटतात.

'ऑल नेशन्स क्लब' मध्ये मी कधीकधी नृत्यासाठी जात असे.

तिथे अनेक देशांच्या स्त्रिया येत. त्यात एकदा मला एक इंग्रज बाई भेटली. पाश्चात्य देशात कितीही वयाची स्त्री असली-सत्तर पाऊणशे वर्षाचीसुद्धा-तरी तिला 'गर्ल' किंवा 'छोकरी' म्हणण्याचा प्रघात आहे. पण या स्त्रीचे वय होते सुमारे पंचेचाळिशीचे. तिचा मुलगाच मुळी वीसबावीस वर्षांचा होता. त्यामुळे आपल्याकडे तरी तिला आपण मुलगी म्हणणार नाही. तिचे खरे नाव देणे प्रशस्त नव्हे, म्हणून तिला मिसेस् स्मिथ म्हणू. ती विधवा होती आणि लंडनच्या 'कौंटी कौन्सिल' मध्ये काम करीत होती.

तिची-माझी तशी औपचारिक ओळख म्हणाल, तर कधी झालीच नाही. एका नृत्याच्या वेळी मी तिला नृत्य करण्याबद्दल भीतभीत विचारले आणि ती पटकन् होय म्हणाली, एवढेच. नृत्याला सुरूवात झाल्यावर नेहमीच्या ठराविक प्रश्नोत्तरात ती इंग्लंडची-खुद्द लंडनचीच आहे, असे मला कळले. आपण विधवा असल्याचा उल्लेख तिने त्यावेळी केला नाही. तशी आवश्यकताही नव्हती. त्यानंतर दोनचार नृत्ये निरनिराळ्या मुलींच्या बरोबर झाली, आणि 'स्लो वॉल्झ'च्या वेळी मी तिला पुन्हा विचारले. या नृत्याच्या प्रकारात नाचणारी दोघे शरीराने अधिक जवळ येऊ शकतात-जवळजवळ मिठी मारली तरी चालते, असेच म्हणानात! मी स्मिथबाईला जवळ घेतले, तेव्हा साहजिकच तिचे उरोज माझ्या छातीवर दबले गेले. असे प्रसंग तिकडे नृत्यात अनेकदा येतात. त्यामुळे यावेळी तशी काही माझ्या अंगातून वीज चमकली नाही हे खरे, पण इतर कोणत्याही प्रसंगी झाला नव्हता, असा एक चमत्कारिक भास मला झाला. तो म्हणजे, तिच्या उरोजांच्या स्पर्शात मला फरक वाटला, मी तिच्याकडे पाहिले, आणि तिचीही दृष्टी सूक्ष्मपणे भेदरलेली, विचित्र अशी झाली. तेवढ्यात ते नृत्य संपले आणि आम्ही वेगळे झालो.

त्यानंतर मला त्या प्रसंगाची कधीकधी थोडीथोडी आठवण व्हायची. पण त्या वेगळ्या स्पर्शाचे कारण मला सुचेना. थोड्याच दिवसात मी तो प्रसंग विसरूनही गेलो असतो. पण पंधरावीस दिवसांनी मी जेव्हा पुन्हा

त्या क्लबमध्ये गेलो, तेव्हा स्मिथ मला दिसली. आता ती अधिक मनमोकळेपणाने माझ्याशी बोलत होती. नृत्याच्या वेळी पूर्वीच्या प्रसंगाची आठवण होऊन मी तिला मुद्दामच आवश्यकतेपेक्षा अधिक जवळ घेतली-आणि माझी खात्री झाली की, तिच्या दोन उरोजात काहीतरी फरक होता. या भेटीत तिने आपण विधवा असून नोकरी करीत असल्याचे सांगितले आणि आपल्याला कविता लिहिण्याचा छंद आहे, अशीही माहिती दिली. मी विचारले, " नृत्यानंतर मी तुम्हाला घरी पोचवू का ? " यावर ती म्हणाली, " नको. यापूर्वीच मी एका मुलाबरोबर घरी जाण्याचं अभिवचन दिलं आहे. पण तुमची इच्छा असेल तर आपण येत्या आठवड्यात कुठंतरी बाहेर भेटू. " मी म्हणालो, " ठीक आहे. तुम्ही भारतीय पद्धतीचं जेवण घ्यायलाच या ना ! " मग आम्ही जेवणाची वेळ आणि भेटायची जागा ठरवली, आणि त्या दिवसापुरता निरोप घेतला.

ठरल्याप्रमाणे गुरुवारी संध्याकाळी सहा वाजता ती ट्यूब स्टेशनच्या तिकीट ऑफिसजवळ आली. आम्ही जवळच्याच एका उपहारगृहात प्रथम चहा घ्यायला गेलो. मी सहज विचारले, "तुमच्या मित्राबरोबर तुम्ही त्या रात्री नीट गेलात ना घरी ? " भीतीने अंग शहारल्यासारखे करून ती म्हणाली, " तो अगदी भयंकरच अनुभव होता ! एका आफ्रिकन विद्यार्थ्यानं मला आग्रह केला, म्हणून मी त्याला माझ्याबरोबर घरी पोचवायला येऊ द्यायचं मान्य केलं, पण एखाद्या मुलीला घरी पोचवण्याबद्दलची तयाची कल्पना वेगळीच असावी. आम्ही स्टेशनवर उतरल्यावर रस्त्यानं चालू लागलो, तेव्हा त्यानं माझा हात आपल्या हातात घेतला. त्याचं काही मला वाटलं नाही. पण मग त्यानं आपल्या ओव्हरकोटाच्या खिशातून एक व्हिस्कीची बाटली काढली. त्या अंधाऱ्या रस्त्यावर चालता चालताच त्यानं ती तोंडांला लावली आणि माझ्यापुढं बाटली करून तो म्हणाला, 'घे ! तूही एक घुटका घे !' मी साफ नकार दिला. तेव्हा तो हसून म्हणाला, 'उगीच सभ्यतेचा आव आणू नकोस !

तुम्ही बायका काय असता हे आम्हाला चांगलं माहीत आहे! एक बाट… दिली की, तुम्ही खोलीवर मजा करायला येता. चल! हीच बाटली घे आणि माझ्या खोलीवर जाऊ या. उद्या सकाळी मी तुला घरी पोचवतो. " त्याचं हे बोलणं ऐकून मला एकीकडे रडू कोसळलं आणि त्याच वेळी संतापही आला. मी त्याचा हात झिडकारून टाकला आणि त्याला माझ्याबरोबर येऊ नको म्हणून सांगितलं. पण तरीही तो माझा पाठलाग करू लागला. तेव्हा मी टॅक्सी केली आणि घरी आले. त्या वेळेपासून मी ठरवलं आहे, की कुणी अनोळखी माणसानं रात्री घरी पोचवायला येण्याचा आग्रह धरला तर प्रथमच त्याला साफ नकार द्यायचा!'

"म्हणजे मला ही अप्रत्यक्ष सूचनाच आहे वाटतं?" मी थट्टेने म्हणालो.

"नाही. तुमच्याबद्दल मी म्हणत नाही.पण एकंदरीत सुरुवातीलाच फार विश्वास टाकणं बरं नव्हे."

आम्ही चहा घेतला आणि एजवेअर रोडवरच्या एका भारतीय हॉटेलमध्ये जेवायला गेलो. श्रीमती स्मिथनं आपल्या काही कविता आणल्या होत्या, त्या मी वाचल्या. त्यातली एक कविता युद्धाबद्दलची होती. ती वाचताना मी सहज म्हटलं, "गेल्या महायुद्धाच्या वेळी तुम्ही कुठं होता?"

ती एकदम दचकली! एखाद्या भयंकर स्वप्नाची आठवण होऊन अंग शिडशिडावे तसे करून ती म्हणाली, "I have terrible memories of the War." ('महायुद्धाबद्दलच्या माझ्या स्मृती अत्यंत भीतिप्रद आहेत.')

आपल्या प्रश्नाचा तिच्या मनाला त्रास व्हावा, याचे मला वाईट वाटले. मी दिलगिरीच्या सुरात म्हटले, "माफ करा. मला याची कल्पना नव्हती."

ती खिन्नपणे हसून म्हणाली, "त्यात तुमचा तरी काय दोष? मलाही वाटत होतं, कधीतरी हे तुम्हाला सांगायलाच हवं! तुमच्या ते लक्षात आलं असावं. निदान, ते सांगितल्याशिवाय मला बरं वाटायचं नाही."

ती काय म्हणते आहे, याचा मला नीट बोध होत नव्हता. गेल्या महायुद्धाबद्दल ती असे काय सांगणार होती, की जे मला कळायलाच हवे होते आणि जे सांगितल्यावाचून तिच्या मनाला समाधान लाभणार नव्हते? पण माझ्या प्रश्नाची वाट न पाहताच ती म्हणाली, "१९४३ सालची गोष्ट. संध्याकाळचा सुमार होता. मी ऑफिसमधून घरी परतत होते. मी रस्त्यावरून जात असतानाच अचानक विमान-हल्ल्याची सूचना देणारे भोंगे वाजू लागले. रस्त्यावर एकदम पळापळ सुरू झाली. जो तो शेल्टरकडे आश्रयासाठी धावू लागला. मीही दिसेल त्या दिशेने धावू लागले. पण तोपर्यंत जर्मनीच्या विमानांनी बाँब-हल्ल्याला सुरुवातही केली होती. बाँब फुटल्याचे आवाज, धावणाऱ्या लोकांचा आरडाओरडा, विमानवेधी तोफांचे आवाज, कोसळणाऱ्या इमारतींची धडपड-असा कल्लोळ चालला होता. मी इमारतीत आश्रय घेण्यापूर्वीच माझ्यापासून पन्नासपाऊणशे फुटांवर एक बाँब फुटला, आणि अगदी निमिषार्धात त्यातील पोलादाचा की कसला तीक्ष्ण तुकडा माझ्या अंगात घुसला-माझ्या...डाव्या छातीत घुसला. मी तिथल्या तिथंच बेशुद्ध होऊन पडले. कोणत्या तरी रुग्णालयात मला शुद्धी आली. डॉक्टरांनी माझ्या त्या गोंधळलेल्या अवस्थेतच मला कठोरपणे सांगितलं, 'तुमच्या डाव्या स्तनात विषारी धातूचा तुकडा गेला आहे. सबंध स्तन कापून काढावा लागेल. नाहीतर हे विष अंगभर पसरेल. आणखी दोन तासांनी आम्ही तुमच्या जीविताची खात्री देऊ शकणार नाही.' त्यावेळी मला आयुष्यात कधी बसला नव्हता एवढा धक्का बसला. आपल्या सौंदर्यावरचा हा घाला कोणत्याही स्त्रीला असह्य होईल. डॉक्टरांचे ते शब्द ऐकताच मला ग्लानी आली. पण मी बेशुद्ध असतानाच माझ्या पतीच्या संमतीने डॉक्टरांनी ऑपरेशन केलं. माझ्या जीवनातील सर्वस्व हरपल्यासारखं झालं. त्यानंतर मी कोणाच्याही पुढे पूर्वीच्या सहजतेनं, मोकळेपणानं उभी राहू शकत नाही. कृत्रिम उपायांनी मी बाह्यत: इतर स्त्रियांसारखीच दिसते, पण केव्हा केव्हा पुरुषांच्या लक्षात माझा हा दुर्दैवी दोष येतो, तेव्हा ते

माझा तिरस्कार करतात आणि मला टाळतात."

तिने मोठ्या कष्टाने अश्रू आवरले. इंग्रज लोक सर्वसाधारणपणे तुसडे आणि आत्मनिष्ठ असतात, हे खरे. पण मिसेस् स्मिथने मला त्या लोकांच्या मनाचा एक वेगळाच पैलू दाखविला होता. मी माझ्या दृष्टीने हुषारीने तिच्या छातीतील दोष अजमावण्याचा प्रयत्न नृत्याच्या वेळी केला होता. तो तिला नकळत होता, ही माझी समजूत खोटी होती. तिची ती दुर्दैवी कहाणी ऐकून मला दु:ख झालेच, पण आपली निर्दय हिकमत तिच्या लक्षात आली या जाणिवेने मला ओशाळल्यासारखेही झालेच.

इंग्लंडमध्ये 'राउंड टेबल' या नावाची एक संघटना आहे. रोटरी आणि लायन्स क्लब यांच्यासारखीच ही संस्था आहे. या संस्थेने ब्रिटिश कौन्सिलच्या मार्फत काही परकीय विद्यार्थ्यांना एका सभेसाठी बोलाविले होते. सभेनंतर जेवणाचाही कार्यक्रम होता. या सभेसाठी आणि खान्यासाठी इतर दहा विद्यार्थ्यांच्याबरोबरच ब्रिटिश कौन्सिलने माझीही निवड केली होती. त्या सभेत काही मोठी मौज नव्हती. पण जेवताना योगायोगाने जी व्यक्ती माझ्याजवळ आली होती, ती मात्र मला संस्मरणीय वाटली.

या व्यक्तीचे नाव होते जॉन जार्व्हिस. त्याचे वय साधारण चाळिशीचे असेल. तो पूर्णपणे अंध होता. -जन्मांध होता. आणि तरीही तो मोठा उत्साही, आनंदी असे. त्याचे वाचन-त्याला वाचून दाखविलेले किंवा ब्रेल लिपीच्या साहाय्याने त्याने वाचलेले-दांडगे होते. विशेष म्हणजे, जगातील निदान पंधरा सोळा देशांना त्याने भेटी दिल्या होत्या. -इजिप्त, फ्रान्स, इटली, स्पेन, पोर्तुगाल, अमेरिका इत्यादी. इंग्लंडमध्ये अंधांच्याविषयी काम करणारी एक फार मोठी संघटना आहे, तीत तो चिटणिसाचे काम करीत होता. या कामाच्या निमित्ताने त्याने अनेक देशांना भेटी दिल्या होत्या. आणि त्या त्या देशातील अंधांच्या संघटनांच्या कामकाजाची पाहणी केली होती.

माझ्या मनात आले, परदेश-प्रवास म्हटले की, आपल्यापुढे कितीतरी

रंगीबेरंगी चित्रे उभी राहतात. स्वित्झर्लंडचे स्वर्गतुल्य सृष्टीसौंदर्य, इटलीतील प्राचीन शिल्प, स्पेनमधील बेभान नृत्य आणि बैलांचा व माणसांचा मृत्यूला आव्हान देणारा सामना, विस्तीर्ण जलाशय, मादक नाइट-क्लब, डोळे दिपवणारी रोषणाई, बर्फाने झाकलेले भव्य पर्वत, अप्सराच की काय अशा भासणाऱ्या लावण्यवती स्त्रिया, डोळ्यांचे पारणे फेडणारी चित्रकला, उंच उंच उडणारी कारंजी, गगनचुंबी इमारती....पण जॉन जार्व्हिससारख्या जन्मांधाला परदेश प्रवास म्हणजे किती संकुचित, वेगळा अनुभव असेल! अपरिचितांचे हस्तांदोलन, गप्पाटप्पा, संगीत आणि मेजवान्या अशा मर्यादित अनुभवांवर अशा लोकांना परदेश-पर्यटनाची भूक भागवावी लागत असेल. आम्ही परदेशात गेलो तर मित्र-मैत्रिणींना पाहू शकतो, त्यांचे रूप आठवू शकतो, त्यांचे फोटो बाळगतो, पुन्हा मायदेशी गेल्यावरही मैत्री टिकली तर नवे नवे फोटो मागवू शकतो. पण अंधांनी नव्या ओळखी केल्या तरी स्पर्श, गंध, आवाज यांनीच त्या मनात साठवायच्या आणि आठवायच्या....

मला जार्व्हिसविषयी अतिशय औत्सुक्य वाटू लागले. तो हिंदुस्थानविषयी खूपच बोलत होता. थोड्या परिचयानंतर त्याने मला सांगितले, "मिस्टर मंत्री, तुम्ही एकदा माझ्या घरी या. मी तुम्हाला भारतीय संगीताच्या रेकॉर्डस् ऐकवीन."

मी आभार मानून त्या निमंत्रणाचा स्वीकार केला. आमचे त्या रात्रीचे 'राउंड टेबल' चे जेवण झाले. त्यानंतर आम्ही उभ्याउभ्याच कॉफी घेतली. मी जार्व्हिसला सिगरेट दिली. आम्ही सिगरेट ओढीत थोडा वेळ गप्पा मारल्या. त्याची सिगरेट संपत आली. मला सहजच अशी उत्सुकता निर्माण झाली की, हा आता सिगरेटचे थोटुक कसे विझवणार आणि टाकणार! कारण त्यावेळी जवळपास राख झाडण्याचे भांडे नव्हते. बहुधा तो माझ्या हाती थोटुक देऊन टाकायला सांगेल म्हणून मी वाट पाहू लागलो. तो त्याने शांतपणे थोटुक हातात घेतले, वाकून आपल्या उजव्या पायाची टाच किंचित वर उचलली आणि तिच्याखाली अलगदपणे थोटुक ठेवून ते विझवले.

सातआठ दिवसांनी मी फोन करून जार्व्हिसच्या घरी गेलो. लंडनच्या पॅडिंग्टन विभागात वेस्टबोर्न टेरेसमध्ये तो राहत होता. एका डोळस वृद्धेने दरवाजा उघडला आणि जार्व्हिसला मी आल्याचे सांगितले. त्याने उठून दरवाज्याच्या अनुरोधाने पावले टाकली आणि माझ्याशी हस्तांदोलन केले. एका खुर्चीच्या जवळ नेऊन त्याने मला तिच्यावर बसविले आणि तो म्हणाला, ''तुम्ही मुद्दाम आठवण ठेवून आलात, याचा मला अतिशय आनंद झाला. एखाद्या व्यक्तीच्या सहवासासाठी आम्ही-म्हणजे अंध-किती भुकेलेले असतो, याची तुम्हाला कल्पना यायची नाही. जाऊ द्या. माझ्याबद्दलच बोलू लागलो, तर तुम्हाला कंटाळा येईल.''

मग त्याने ध्वनिमुद्रिकांची एक पेटी माझ्याकडे सरकवली. तो म्हणाला, ''यात पौर्वात्य देशांच्या संगीताच्या बऱ्याच रेकॉर्डस् आहेत. तुम्हाला हव्या तर भारतीय संगीताच्या रेकॉर्डस् ऐका. मला तुमचं ते शास्त्रीय संगीत समजत नाही, पण तुमच्या गायकगायिकांचे आवाज मोठे मधुर आहेत.''

मी एक चित्रपट-संगीताची रेकॉर्ड काढली आणि लावली. इंग्लंडमध्ये एका अंध इसमाच्या घरी कोळशाच्या शेकोटीजवळ अंग गरम करीत ते भारतीय संगीत ऐकताना मला मोठी गंमत वाटली. तिकडे सहसा आपल्याकडील संगीत ऐकायला मिळत नाही. म्हणून तर मला जार्व्हिसच्या या संग्रहाचे विशेष कौतुक वाटले. बोलता बोलता जार्व्हिस म्हणाला, ''हिमालयाच्या एव्हरेस्ट शिखरावर पहिल्याने मानव गेला, तेव्हा इतर सर्वांच्याप्रमाणे आम्हा अंधांनाही अतिशय आनंद झाला. आमच्या संस्थेतील अंधांच्यासाठी आम्ही हिमालयाचं एक मॉडेल केलं होतं. त्यावर हात फिरवून ते हिलेरी आणि तेनसिंग यांचा मार्ग समजावून घेत. या मॉडेलच्या स्केलवरून ते हिमालयाच्या उंचीचा अंदाज घेत असत.''

मला आश्चर्य वाटले आणि आनंदही वाटला. हिमालय आमच्या देशात असूनही मी गौरीशंकरावरील मोहिमेचा असा कधी अभ्यास केला

नव्हता. पण अंधांची ती ज्ञानलालसा आणि आपल्या दुर्दैवी दोषांवर मात करण्याची जबरदस्त इच्छा पाहून मला त्यांचे कौतुक वाटले. आपल्याला दृष्टी असूनही आपण तिचा किती कमी उपयोग करतो, असाही विचार माझ्या मनात आल्यावाचून राहिला नाही.

अंधात स्त्री-पुरुषांचे संबंध कसे असतात, त्यांचे कशावरून एकमेकांवर प्रेम बसते, वयाचा अंदाज ते कसा घेतात, प्रेमपत्रे पाठवायची तर ती त्यांना दुसऱ्याच्या मदतीवाचून पाठवता येणार नाहीत, मग हा प्रश्न ते कसा सोडवतात, याविषयी मला उत्सुकता होती. मी याबद्दल थोड्या वेळाच्या अंतराने दोनदा जार्व्हिसला विचारले. पण त्याने अगदी पळवाट काढणारे तुटक उत्तर दिले. तो म्हणाला, "तुम्हा डोळस लोकात प्रेमाला किंवा स्त्री-पुरुष-संबंधाला जेवढं महत्त्व आहे, तेवढं आमच्यात नसतं. अंध स्त्री आणि अंध पुरुष यांना एकत्र येण्याची संधीही तुमच्याप्रमाणं वारंवार येत नाही." -बस्स्! याउपर या विषयावर तो शब्दही बोलायला तयार नव्हता. मात्र, हा विषय खेरीज करून इतर विषयांवर त्याने मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. पण हे विषय म्हणजे इंग्लंडमधील हवा, युरोपमधील शहरे, अंधांच्या संस्थेचे कार्य, असे थोडेफार वस्तुनिष्ठ विषय होते.

जार्व्हिसने मला केवळ भारतीयच नव्हे, तर जपानी, कोरियन, इंडोनेशियन, अशी अनेक गीते आणि वाद्यसंगीत ही ऐकवली. त्याच्याकडे माझे दोन-अडीच तास फार चांगले गेले. पण एकच गोष्ट मला खटकली ती ही की, मी इतका वेळ त्याच्याकडे बसूनही त्याने मला मद्य तर राहू देच, पण चहासुद्धा दिला नाही. इंग्लंडमधील माझ्या सबंध वास्तव्यात असे हे एकुलते एक उदाहरण. अर्थातच, चहाचा हा प्रश्न मुद्दाम येथे सांगण्यासारखा महत्त्वाचा नाही, हे खरे. पण माझ्याशी इतक्या मनमोकळेपणाने बोलणाऱ्या त्या उमद्या इंग्रजाने मला मुद्दाम घरी बोलावूनही चहापाण्याबद्दल का विचारले नाही हे मला कधीच न सुटलेले एक अगदी

लहानसे कोडे आहे, इतकेच.

जार्व्हिसची व माझी भेट झाल्यानंतर महिन्याभरातच नाताळ आला. त्याला नाताळचे भेटकार्ड पाठवावे इतका त्याचा व माझा परिचय आहे का असा विचार मी करीत असतानाच मला त्याचे भेटकार्ड आले. मीही चट्कन बाजारात जाऊन एक सुंदर रंगीबेरंगी कार्ड आणून त्याला पाठवले. दोनतीन दिवसात त्याचे आभारचे पत्र आले. त्याने म्हटले होते, -"तुमच्या कार्डावरील सुंदर रंग मी पाहू शकलो नाही. पण माझ्या मित्रानं मला त्या कार्डाचं आणि रंगाचं वर्णन केलं. मला तुमचं कार्ड फार आवडलं. त्याबद्दल मी तुमचा मन:पूर्वक आभारी आहे."

मला वाटले, या अंधाची केवढी ही आस्था आणि कृतज्ञता! खरेच, ज्याने रंग कधी पाहिले नाहीत, त्याला नुसते वर्णन ऐकून कधी रंगांची कल्पना येईल का? जन्मापासून बहिरा असणाऱ्या माणसाला संगीताचे वर्णन वाचून किंवा खुणांनी कधी संगीताची कल्पना येईल का? लाजेने चूर झालेल्या रमणीच्या गालांचा गुलाबी रंग पाहायलाच पाहिजे, शब्दांनी त्याची यथार्थ कल्पना कशी येणार?

दुसरे असे की, अंध किंवा असेच इतर दुर्दैवी लोक यांच्याशी संबंध ठेवताना आपण त्यांच्या मर्यादा नकळत विसरून जातो! आता हेच पाहा ना! जार्व्हिस हा अंध आहे हे मला माहीत होते, पण त्याच्यासाठी नाताळाचे भेटकार्ड घेताना त्यातील रंग तो कधीच पाहू शकणार नाही, याची जाणीव काही मला झाली नाही. जार्व्हिससारख्या दुर्दैवी पण कर्तबगार लोकांची आठवण झाली की एकीकडे दैवाच्या लहरीचे दु:ख होते, तर दुसरीकडे मानवी प्रयत्नांबद्दल आदर वाटल्यावाचून राहत नाही.

मी इंग्लंडला गेल्यानंतर पहिल्या महिन्याभरातीलच गोष्ट. आमच्या वर्गातील काही मुलींचा आणि माझा परिचय झाला होता, पण त्यावेळी तो अगदीच औपचारिक होता. इतर क्षेत्रातही या ना त्या निमित्ताने काही ब्रिटिश स्त्रियांची आणि माझी ओळख झाली होती, पण हवा-पाणी आणि

खाणे-पिणे यापलिकडे काही आमच्या परिचयाचे गाडे जाईना. त्यापेक्षा अधिक निकटच्या मैत्रीत पाश्चात्य मुली कशा वागतात, याबद्दलची उत्सुकता इकडून जाणाऱ्या जवळजवळ प्रत्येकालाच असते. मलाही ती होती, हे कबूल केले पाहिजे. त्या वेळीमाझ्या एका मित्राने मला सांगितले, की 'लंडनमध्ये मैत्रिणी पुरविणाऱ्या काही संस्था आहेत आणि स्थानिक दैनिकात या संस्थांच्या जाहिरातीही असतात.' तेव्हा या संस्था आणि या मुली कशा असतात, हे पाहावे तर खरे, म्हणून केलेल्या प्रयत्नांची ही कहाणी आहे. येथे एक गोष्ट स्पष्ट केली तर पुढील गैरसमज टळतील. या मैत्रिणी म्हणजे हिंडायला-फिरायला मैत्रिणी किंवा companions एवढीच माझी आणि त्या संस्थांचीही कल्पना होती. सरळसरळ वेश्याव्यवसाय इतर शहरांप्रमाणेच लंडनलाही चालतो आणि त्याविषयी उत्सुकता वाटण्याचेही काही कारण नव्हते.

एका सायंदैनिकातील पत्ता वाचून प्रथम मी एका 'फ्रेंडशिप क्लब' कडे पत्र टाकले आणि त्याची माहिती मागविली. चारपाच दिवसांनी आलेल्या टपालात मला कळविण्यात आले की, दहा शिलिंगांची सहा महिन्यांसाठी सभासदत्वाची फी मी पाठवावी आणि त्याशिवाय अडीच शिलिंग प्रवेश फी म्हणून पाठवावेत. मग मला सभासद करून घेता येईल आणि 'क्लब' मधील मुलींचे एका वेळी एक असे पत्ते सदरील संस्था सहा महिन्यापर्यंत पुरवील.

मैत्रीची ही रोखीची पद्धत मला कशीशीच वाटली. अशा चलनी नाण्यांच्या मोबदल्यात निकटचा स्नेह अशक्य होता हे खरे, पण पुन्हा मला वाटले, हा फारतर दहाबारा रुपयांचा प्रश्न आहे. परदेशात वारंवार येण्याची संधी आपल्याला तरी कुठे मिळणार आहे? ही काय गंमत आहे, हे तर पाहू अशा विचाराने मी 'क्लब' ची फी पाठविली. त्यानंतर आठ दिवसात मला एक छापील दहाबारा-पानी पुस्तिका आली. मला आलेल्या पहिल्या पत्रात म्हटले होते की, सभासदांना सुंदर मुलींचे फोटो पाठविण्यात

येतील. आता आलेली पुस्तिका काही नटयांच्या छायाचित्रांनी भरलेली होती! मूळ पत्र वाचणाऱ्याला असा भास व्हावा, की ज्या मुली आपल्याबरोबर फिरायला येणार आहेत, त्यांचेच फोटो मिळणार आहेत! पण मेरिलीन मन्रो आणि अशा जगत्सुंदरींचे फोटो पाहून, आपण साडेबारा शिलिंगांना मुकलो असा पहिलाच विचार माझ्या मनात आला, तेव्हा मी या 'क्लब'ला पत्र पाठवून विचारले, की 'पुस्तिका मिळाली, पण पत्त्यांचे काय?' अर्थात् मेरिलीन मन्रोचा पत्ता मला संस्थेने दिला असता, तरी त्याचा काही उपयोग नव्हता म्हणा. माझ्या पत्रानंतर दहाबारा दिवसांच्या शांततेच्या मागोमाग क्लबने केंट परगण्यातील एका मुलीचे नाव व पत्ता दिला. मी त्या पत्त्यावर पत्र पाठवून त्या मुलीला एवढेच लिहिले की, अमुक एका क्लबने मला आपला पत्ता दिला आहे. चार-पाच ओळीत माझी माहिती ही दिली होती. पण उत्तर नाही. पंधरा दिवस वाट पाहून मी क्लबला पुन्हा पत्र लिहिले. क्लबचा पहिलाच नियम असा होता की, सर्व कामकाज दैनिकाच्या बॉक्स नंबरवर आणि पत्रव्यवहारानेच चालेल. माझ्या खलित्यानंतर क्लबच्या सेक्रेटरीने दिलगिरी व्यक्त करून आणखी एक पत्ता दिला. ही मुलगीही लंडनपासून तीसचाळीस मैल दूर होती.एव्हाना या क्लबची आशा मी सोडलीच होती, पण खडा टाकून पाहावा म्हणून पत्र टाकले. पुन्हा या आघाडीवरही सामसूम! मग किंचित् रागानेच क्लबलाही लिहिले. क्लबने त्या सभासद-मुलीला लिहिले असावे. कारण आठ दिवसांनी मला तिचे पत्र आले. त्यात असा मजकूर होता, -'तुमच्या पत्राबद्दल मी आभारी आहे. पण मी सध्या क्लबच्याच दुसऱ्या एका सभासदाबरोबर फिरायला जात आहे. तेव्हा आपण कृपया इतर मुलींकडे विचारणा करावी.'

हा 'फ्रेंडशिप क्लब' म्हणजे एक बनवाबनवीचा प्रकार आहे, हे यावरुन उघडच झाले. या क्लबच्या काही लोकांनी दहा-बारा मुलींना सांगून ठेवले असावे की, अशी पत्रे आली की, त्यांनी काहीतरी सबब काढून टोलवाटोलवी करीत राहायचे. शिवाय ही पत्रे लिहिणाऱ्या खरोखरीच

मुलीच होत्या की, त्यांच्या नावावर पुरुषच पत्रे लिहित होते हे तरी कोणी सांगावे? सगळा 'पत्री सरकार' चा कारभार! पुन्हा मैत्रिणी शोधायला निघालेला इसम या प्रकाराचा सहसा गवगवाही करणार नाही. तेरीभी चूप मेरीभी चूप. तेव्हा मीही साहजिकपणेच या क्लबचा नाद सोडून दिला.

त्यानंतर मला आणखी एका संघटनेची जाहिरात दिसली. तीत म्हटले होते की, 'Companions for dance, etc. introduced personally.' म्हणजे या ठिकाणी मुलींची प्रत्यक्ष ओळख करून दिली जाणार होती-केवळ पत्राने नव्हे. या जाहिरातीखाली पत्ता दिला होता. तोही वृत्तपत्राच्या पोस्टबॉक्सचा नसून पुढील पत्त्यावर भेटण्याची सूचना देण्यात आली होती. : Mark Langtray, 12 Old Compton Street, Soho, London. Time · 12 to 6. लंडनचा सोहो भाग म्हणजे अशा गोष्टींबद्दल कुप्रसिद्धच आहे. त्यामुळे प्रत्यक्ष या जागेत जावे की नाही, असा मला प्रश्नच पडला. म्हणून मी प्रथम या पत्त्यावर फोन केला. तेव्हा लँगट्रे या गृहस्थाने सांगितले की, 'आपण समक्षच इकडे या. आम्ही टेलिफोनवर चर्चा करीत नसतो.' त्यावरून या जागेवर कोणीतरी खरी व्यक्ती आहे, अशी माझी खात्री झाली. मग एका संध्याकाळी मी लँगट्रेच्या ऑफिसात गेलो. त्याच्या सेक्रेटरी मुलीने माझे स्वागत केले. तिच्या खोलीत अर्धनग्न स्त्रियांची मादक चित्रे भिंतीवर लावलेली होती. त्याशिवाय वृत्तपत्रातील काही कात्रणेही लावलेली होती. What is a call-girl?' असा एक लेख होता. 'Being a call-girl is fun' असे आणखी एक कात्रण होते. एकंदरीत 'Blind date' म्हणजे काय याची माहिती देणारेही एक कात्रण होते.

'कॉल गर्ल' म्हणजे (पैसा घेऊन) नेमून दिल्यावेळी येऊन आपल्याला सहवासाचे सुख देणारी तरुणी. 'ब्लाइंड डेट'चाही अर्थ जवळजवळ हाच आहे. फरक इतकाच की, कॉल गर्लची ओळख करून दिली जाण्याची शक्यता असते, पण 'ब्लाइंड डेट' म्हणजे अज्ञात व्यक्तीची भेट. या प्रकारात मध्यस्थ भेट ठरवतो आणि दोन्ही व्यक्तींना वर्णने तो

एकमेकांना कळवतो आणि खुणेसाठी बरोबर वस्तु नेण्याचीही सूचना देतो. त्या सेक्रेटरी तरुणीने-चेरी तिचे नाव असे मला सांगण्यात आले. खरे नाव काय होते कोण-जाणे अंतर्गत टेलिफोनवरून मी आल्याचे मार्क लँगट्रेला सांगितले. त्याने मला आत बोलाविले. माझे स्वागत करुन तो म्हणाला, 'तुम्ही इतक्या लांबून या देशात आला आहात, तर इकडच्या मुलींविषयी उत्सुकता असणे अगदी साहजिक आहे. मी पूर्वी राजकीय काम करीत असे. नंतर मला वाटलं की, थोडच्या वेळापुरती का होईना, पण योग्य अशी पार्टनर पुरवणं हेही एक उपयुक्त असं सामाजिक कार्यच आहे.' तो हे सगळे गंभीरपणे, आस्थेवाईकपणे सांगत होता. तरीही त्या अपरिचित ठिकाणी मला किंचित् हसू आल्यावाचून राहिले नाही.

मला वाटले, राजकारण आणि मुली पुरविण्याचा व्यवसाय यात बरेच साम्य आहे खरे. दोन्ही क्षेत्रात एकनिष्ठा आणि सचोटी यांना किंमत नाही. स्वार्थ, फायदा आणि सौदेबाजी यांची या दोन्ही क्षेत्रात चांगलीच आणि सारखीच चलती असते. अखेर मार्क लँगट्रेसारख्या राजकारण धुरंधराला योग्य ते क्षेत्र सापडले, याचे मला समाधान झाले.

तो सांगत होता, -'आमच्याकडे कसलीही बनवाबनवी नाही. आमचा आकार जास्त वाटेल. -आम्ही एका वेळी तीन पौंड घेतो. पण त्यात फसवणूक नाही. आमच्या सभासद-मुलींच्या फोटोंचे हे आल्बम पाहा. त्यातून तुम्ही हवी ती मुलगी निवडून घ्या. तुमच्या आणि तिच्या सोयीनं एक संध्याकाळ ठरवू. ती संध्याकाळी सहा वाजता तुम्हाला भेटेल आणि रात्री अकरा वाजेपर्यंत तुमच्याबरोबर राहील. तुम्ही दोघं नृत्याला जाऊ शकता, सिनेमेला जाऊ शकता, किंवा एकमेकांच्या संमतीने आणखी काही गंमत करू शकता.'

त्याच्या वाक्यातील शेवटचा भाग सूचक होता. पण खरे सांगतो, 'आणखी काही करणे' हा माझा उद्देश नव्हताच. मी तीन पौंड म्हणजे जवळजवळ चाळीस रुपये मोजले आणि एका छायाचित्राची निवड केली.

लँगट्रेने सांगितले. ‘ तुम्ही परवा फोन करा. मी तिला विचारून वेळ ठरवतो. ’ मग दोन दिवसांनी मी फोन केला आणि शनिवारी संध्याकाळी मार्कच्या कचेरीत जाऊन मी त्या ‘ हेलन ’ला बरोबर घेऊन जायचे ठरवले. मात्र, लँगट्रेने अशीही सूचना दिली की, शनिवारी दुपारी मी पुन्हा एकदा टेलिफोन करून खात्री करून घ्यावी हे बरे.

शनिवारी दुपारी मी टेलिफोन केला, तेव्हा लँगट्रे म्हणाला, “ माफ करा मिस्टर मंत्री. पण हेलन आज सकाळी अचानक आजारी पडली आणि ती येऊ शकणार नाही. तेव्हा तुम्ही ही भेट पुढे ढकलणार की, दुसरी मुलगी चालेल ? ”

मी म्हटले, “ कोणीही चालेल. ” कारण मला वाटत होते की, त्याने असे पुढे ढकलून मग अगदीच बनवले तर काय घ्या ? आणि हेलनशी काही माझे भावनेचे संबंध गुंतलेले नव्हते की, मी तिचाच आग्रह धरावा.

‘ ठीक. मी चेरीला संध्याकाळी सहा वाजता आमच्या कचेरीत यायला सांगतो. तुम्ही याल ? ’

मी ते मान्य केले आणि ठरल्या वेळी त्याच्या कचेरीत गेलो. सहा वाजून दहा मिनिटांनी चेरी आली. थोडा उशीर झाल्याबद्दल तिने दिलगिरी व्यक्त केली. ती साधारण बावीसतेवीस वर्षांची, गोरीपान, अत्यंत सुंदर नव्हे, पण विलोभनीय अशी होती. मार्कने विचारले, “ कुठं जायचा विचार आहे तुमचा ? ”

मी म्हटले, “ मी काहीच ठरवलेलं नाही. कुठं जायचं ते नंतर ठरवता येईल. ”

त्याने मार्गदर्शकाच्या सुरात सांगितले, “ कुठंही जा. तुम्हाला सिनेमाला जाता येईल, नृत्याला जाता येईल. You can get rooms for short purpose on Greek Street. हवं तर जेवायला जा. Have fun!"

त्याची सूचना उघड होती, तरीही बाहेर पडल्यावर मी चेरीला स्पष्ट

सांगितले, " मला खोली वगैरे काही नको. आपण सहज जरा फिरून येऊ हवं तर. त्यापूर्वी चहा घेऊ. "

चेरी ही आपण होऊन फारशी न बोलणारी होती. किंबहुना, अशा प्रसंगी बोलण्याची फारशी आवश्यकता नसावी अशी तिची समजूत असावी. मी गप्पा सुरू करण्यासाठी विचारले, " तुम्ही काय वाचता ? "

ती निर्विकारपणे म्हणाली, " मी फक्त शॉर्ट-हँडची पुस्तके वाचते. "

आता यावर मी साहित्यिक गप्पा काय मारणार ? मग मी विचारले, ' तुम्ही कधी भारताविषयी वाचलं आहे काय ? "

त्यावर ती नाक मुरडून म्हणाली, " नाही, पण माझी आई पूर्वी एकदा भारतात गेली होती. ती म्हणते, भारत हा घाणेरडा देश आहे. "

मला तिचा संताप आला. मी म्हटले, " एका भारतीयाजवळ तुम्ही मुद्दाम असं अधिक्षेपानं बोलणं योग्य नव्हे. इंग्लंडचेही काही भाग घाणेरडे आहेत. आणि इंग्लंडमधील काही माणसंही हीन संस्कृतीची आहेत. "

अर्थातच या उघड हल्ल्याने तिलाही राग आला. झाले! आमच्या त्या सहवासाच्या आनंदाला प्रथमच सुरुंग लागला. तिने अगदी तुटकपणे विचारले, " बरं, मग आता आपण काय करायचं असं तुमचं म्हणणं आहे. ? "

मीही तितक्याच रुष्टपणे म्हटले, " माझं काहीच म्हणणं नाही, पाश्चात्य मुलीबरोबर बाहेर पडण्याची माझी ही पहिलीच खेप आहे. तुम्ही मात्र यात रुळलेल्या आहात. तेव्हा तुम्हीच काय ते सुचवा "

" ठीक. मग प्रथम आपण सिनेमाला जाऊ. मग जेवण. " तिने निकाल दिला.

मला त्याच वेळी वाटले की, या बाईला आता नमस्कार करावा. पण पुन्हा उत्सुकता वाटली की, या प्रकरणाचा शेवट काय होतो हे तर पाहू. मग आम्ही जवळच्याच कसल्या तरी सिनेमाला जाऊन बसलो. मी आपण होऊन तिच्याशी एक शब्दही बोललो नाही. मध्यंतरात तिचे

तिलाच काय वाटले कोण जाणे, पण तिने आपली पर्स उघडली आणि तिच्यातून दोनतीन फोटो बाहेर काढले. त्यातील वर्षभराच्या मुलाचा एक फोटो माझ्यासमोर धरून ती म्हणाली, “ हा माझा मुलगा. माझं एकाशी लग्न ठरलं होतं. पण लग्नाआधीच मला हा मुलगा झाला आणि दुर्दैवानं माझे नियोजित पतीही अपघातात मरण पावले. म्हणून मला या व्यवसायात नाइलाजानं शिरावं लागलं. ”

माझ्या तिच्या या शब्दांवर विश्वास बसेना. आपण उच्च संस्कृतीच्या असून केवळ अडचणीत सापडल्यामुळे अशी कामे करतो, असे तिला सुचवायचे असावे. कदाचित् तिची कहाणी खरीही असेल. पण तिने माझी सहानुभूती पूर्वीच गमावली होती आणि क्षणाभराचे दोन स्नेही म्हणूनही आम्ही जवळ येणे शक्य नव्हते. मी मध्यंतरात एकदोन तुटक वाक्ये बोललो असेन तेवढीच. पण नंतर मी चेरीबरोबर बोललो नाही, की तिला स्पर्शही केला नाही. सिनेमा संपल्यावर वास्तविक जेवणाचा कार्यक्रम तिने ठरवला होता, पण माझी एकंदर उदासीन वृत्ती पाहून ती म्हणाली, “मी तुम्हाला काहीच आनंद देऊ शकले नाही, याबद्दल मला वाईट वाटतं. पण मला आता उशीर होतो आहे, मी जाऊ का ? ”

मी अलगतेने म्हटले, “ होय. तुम्ही जाऊ शकता. ”

त्यावर ती क्षणभर थांबून म्हणाली, “ पण लक्षात ठेवा, तुमचे पैसे परत मिळणार नाहीत. ”

“ माझी तशी अपेक्षाही नाही. ”

चेरिंग क्रॉस ट्यूब स्टेशनच्या (भुयारी रेल्वे) जिन्यापाशी तिने हस्तांदोलन करून माझा निरोप घेतला. त्यावेळी तिने आपला हातमोजाही दूर केला नव्हता. आणि मीही आभाराचे अवडंबर न माजविता अगदी व्यावहारिकपणे तिचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी रविवार होता आणि आमच्या राजकीय लँगट्रेच्या ऑफिसला सुट्टी होती. पण सोमवारी मी फोन करून स्पष्टपणे सांगितले

की, 'लोक तुमच्याकडे पैसे भरतात ते काही आपल्या देशाचा अपमान करून घेण्यासाठी नव्हे.' त्याने चेरीच्या वतीने माझी माफी मागितली आणि माझे हे मैत्रिणींच्या शोधातले अखेरचे साहस तेथेच संपले. पुढे आमच्या वर्गातील आणि नृत्यगृहातील काही मुलींशी माझा परिचय वाढला आणि सुरुवातीला वाटणारे पाश्चात्य स्त्रियांबद्दलचे औत्सुक्यही कमी झाले. पण रोजंदारीच्या मैत्रिणीची आठवण कधी कधी येते आणि आता तो साराच प्रकार पोरकट वाटतो, एवढेच!

◇◇◇◇

# आठ : ‘ एजन्सी ’तील बनेल तरुणी

फॉवरशॅमच्या फळांच्या कारखान्यातून कष्टप्रद काम करून लंडनला आल्यावर मला अगदी मोकळेमोकळे वाटले. लंडन शहरातील मित्र, मैत्रिणी, नृत्यगृहे, मद्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम मला चुकले होते. आमच्या वृत्तपत्रव्यवसायाच्या शाळेची परीक्षा संपली होती आणि आता भारतास परत जाण्यापूर्वी लडंनमधील मुक्कामाचा शक्य तेवढा फायदा घ्यावा आणि लांबविता येईल तेवढा हा मुक्काम लांबवावा, असा विचार मी करू लागलो. पण महागड्या लंडनमध्ये मुक्काम लांबविणे ही काही माझ्यासारख्या माणसाला सोपी गोष्ट नव्हती. अर्थातच मग नोकरीचा शोध घेणे आलेच.

इंग्लंडमध्ये परकीय माणसाने नोकरीचा शोध करणे ही एक अवघड बाबच आहे. मला कुठून तरी बातमी लागली, की रेल्वेखात्यात काही लोक घ्यायचे आहेत. म्हणून मी सेंट पॅक्रॉस स्टेशनजवळच्या या खात्याच्या ‘ पर्सोनेल ’ विभागात गेलो. तेथे मला एक फॉर्म देण्यात आला, तो मी भरला आणि मुलाखतीची वाट पाहत बसलो. मला तेथील अधिकाऱ्याने

आत बोलावलेच नाही. उलट तो आपण स्वत:च बाहेर आला आणि माझ्या खुर्चीजवळ येऊन उभा राहिला. अगदी प्रेमळपणे हसत माझ्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला, "रमेश, तुम्ही पूर्वी कुठे काम केलं आहे?"

या अनपेक्षित सलगीने मी अगदी बावरून गेलो. इंग्रज माणूस हस्तांदोलन करतानाही अगदी निर्विकारपणे हात आखडतच हस्तांदोलन करतो. आणि हा उमदा गृहस्थ तर माझा शाळकरी मित्र असल्याप्रमाणे मला पहिल्या नावाने-रमेश म्हणून-हाक मारून खांद्यावर हात ठेवीत आहे हे दृश्य मला जरा चमत्कारिक वाटले.

"मी... मी पूर्वी ब्रिटिश लष्करात थोडे दिवस काम केलं आहे." मी त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले.

"असं का? व्हेरी गुड! मग तुम्ही असं करा, की लष्कराच्याच एखाद्या केंद्रात जा. तिथंच तुम्हाला काम मिळण्याचा जास्त संभव आहे. ठीक आहे मिस्टर... रमेश... गुड बाय्!" असे म्हणून, मला अधिक बोलण्याची संधीही न देता त्या गृहस्थाने घाईघाईने आपल्या खोलीत प्रयाण केले.

आता माझ्या लक्षात आले, की खोलीबाहेर येऊन इतके सलगीने बोलण्यातला त्याचा उद्देश माझा सन्मान करण्याचा नव्हता, तर उभ्याउभ्याच मला पिटाळून लावण्यासाठी त्याने फॉर्मवरील माझे नाव वाचून 'रमेश' म्हणून कृत्रिम जवळिकीने बोलणे सुरू केले होते. मी विचार केला, ठीक आहे. हाही एक अनुभवच!

मग मी 'ऑक्स्फर्ड स्ट्रीट' वरच्या एका खाजगी 'एम्प्लॉयमेंट एजन्सी'त गेलो. ही कचेरी एका तळघरात, पण अगदी अद्ययावत् होती. एका सुंदर ब्रिटिश तरुणीने माझे हसून स्वागत केले. मी 'नोकरी किंवा काम पाहिजे' असे म्हटल्यावर तिने माझे खास क्षेत्र, पात्रता वगैरे विचारून घेतली. आता लंडनमध्ये काम करण्यासाठी आमची पात्रता काय असणार

कपाळ ? तरी पण नोकरी मागावयास जाणाऱ्याच्या बुद्धीप्रमाणे मी असलेली व नसलेली पात्रता सांगितली. त्या प्रमेदेने हे सारे ऐकून अगदी परब्रह्म भेटल्याचा आनंद दाखविला. मग ती एका खुर्चीवरून उठून माझ्याशी हस्तांदोलन करून म्हणाली, "ठीक आहे मिस्टर मंत्री, आपल्याला योग्य असं काम आत्ता आमच्याकडे नाही. पण तशी विचारणा आली, तर मी आपल्याला अवश्य कळवीन."

"थँक यू." मी पुटपुटलो आणि मग एकदम माझ्या लक्षात आले, की या बयेने माझे नाव आणि पत्तासुद्धा घेतलेला नाही. मग ती मला कळवणार कशी ? मी क्षणभर थबकलोसुद्धा. पण पुन्हा मला वाटले, की खरे म्हणजे ही मला काहीच कळविणार नाही.उगीच तोंडदेखले काहीतरी बोलायचे म्हणून ही साखर-पेरणी करते आहे. मग उगीच पत्ता देण्याचा त्रास तरी कशाला घ्या. म्हणून मी जाण्यासाठी वळलो. माझे विचार त्या मुलीनेही हेरले असावेत. कारण तिलाही एकदम हसू आले. आपण याला बनवीत आहोत हे याच्या लक्षात आले आहे आणि तरीही काही मोठे बिघडले नाही, असे तिला वाटत असल्याचे तिच्या मुद्रेवरून स्वच्छ दिसत होते. अखेर आम्ही दोघांनीही एकमेकांना चांगले ओळखले या भावनेनेच निरोप घेतला.

माझ्या नोकरीच्या शोधातील आणखी काही प्रसंग मला चांगले आठवतात. एकदा नॅशनल स्टुडंट्स युनियनच्या कचेरीत 'नोकर पाहिजेत'च्या जाहिराती मी वाचीत होतो. इतक्यात साधारण विशी-बाविशीची एक मुलगी माझ्या शेजारी आली. तीही माझ्या जवळच उभी राहून जाहिराती वाचीत होती. वाचता वाचता तिचा मला किंचित्सा धक्का लागला. तिने तो मुद्दामच मारला असावा, असेही मला कळून चुकले. कारण त्यावेळी गर्दी नव्हती, आम्ही दोघेच एकमेकांकडे डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहत जाहिराती वाचीत होतो. मला धक्का लागल्याची खात्री करून घेऊन ती खोटया विनयाने म्हणाली,

" आय ॲम सॉरी ! "

" ठीक आहे चालायचंच ! " मी उत्तर दिले, " तुम्ही काम शोधीत आहात वाटतं ? "

" होय. तुम्ही कोणत्या देशाचे ? "

" मी भारताचा. तुम्ही ? "

" मी म्हटलं तर भारताचीच. कारण माझी आई गोव्याची आहे. आम्ही' पोर्तुगालमध्ये राहतो. "

ओळख झाल्यापासून अवघ्या पाचसहा मिनिटातच आम्ही रसेल स्क्वेअर स्टेशनजवळच्या एका उपाहागृहांत चहा घेत होतो.

तिने धडाधड आपली माहिती सांगून टाकली. तिचे नाव शकुंतला मिरांडा. तिच्या आईने मोठ्या हौसेने तिचे नाव भारतीय-' शकुंतला ' ठेवले होते. तिची आई आजारी होती. हवापालट म्हणून ती, तिची आई आणि बारातेरा वर्षांचा भाऊ लंडनला आली होती. मला सर्वात आश्चर्य वाटले ते याचे, की या शकुंतलेने पहिल्याच भेटीत सांगून टाकले, " मी लंडनला अगदी थोडेच दिवस आहे. या दिवसात मला मिळाली तर नोकरी करायची आहे आणि जमलं तर लग्नही करायचं आहे. मी लंडनला आले खरी, पण इथं माझी कुणाशीच ओळख नाही. "

मी म्हटले, "It's too early to speak on marriage, पण तुम्हाला हव्या तर मी काहीजणांच्या ओळखी करून देऊ शकेन ! "

' मी तुमची खूप आभारी आहे. मला फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रजी आणि जर्मन या भाषा येतात. ' तिने माहिती दिली.

' ईस्ट अँड वेस्ट फ्रेंडशिप क्लब ' (गॉवर स्ट्रीट) या संस्थेचा मी सभासद होतो आणि त्या संस्थेची एक पार्टी दोनचार दिवसातच होणार होती. मी तिला म्हटले, " तुम्ही या पार्टीला याल तर तुमची अनेकांशी ओळख होईल. "

त्याप्रमाणे शकुंतला त्या पार्टीला आली. तिने कबूल केल्याप्रमाणे

संस्थेच्या कचेरीच्या जवळच्या भुयारी स्टेशनवर ती मला भेटली आणि कचेरीत माझ्याबरोबर आली. तिथे तिची अनेकांशी ओळख झाली आणि मग कुणाशीतरी तिचे सूत जमले असावे. कारण त्यानंतर ती मला कधीच भेटली नाही आणि तिच्या पत्त्यावर फोन केला तेव्हा ती तेथून निघून गेल्याचे कळले. ' कामापुरता मामा ' या न्यायाने तिने माझा उपयोग करून घेतला आणि अखेर मीच मामा झालो. मग तिला पुढे नोकरी मिळाली, की तिचे लग्न ठरले, की ती लंडन सोडून पोर्तुगालला गेली की काय, ते मला कधीच कळले नाही आणि पुढेही कळणार नाही. पण नव्या ओळखीसाठी एवढी आसुसलेली, पहिल्या पंधरा मिनिटातच ' मला कुणाशी तरी लग्न करण्याची इच्छा आहे ' असे स्पष्टपणे सांगणारी ती कोवळी, नाजुक, गुलाबी, सुंदर मुलगी माझ्या चांगली लक्षात राहिली आहे, हे मात्र खरे.

एके दिवशी मी विद्यार्थी-संघटनेच्या कचेरीत पुढील नोटीस वाचली:-

'Four students wanted for washing the paint in a London Hotel.'

आता खरे म्हणजे हे ' वॉशिंग द पेंट ' हे काय प्रकरण आहे, याची मला कल्पनाच आली नाही. तरी पण मी विचार केला की, या रंगखात्याचा मला फॉवरशॅमच्या फळांच्या कारखान्यातील थोडाफार अनुभव आहेच. तेव्हा आता ' वॉशिंग द पेंट ' काय आहे हे पाहू तर खरे. नाही जमले, तर सोडून देता येईल. गाजराची पुंगी, वाजली तर वाजली...

कचेरीतील चिटणिसांना मी जाऊन सांगितले, "हॉटेलमधलं हे काम करण्यास मी तयार आहे."

"ठीक आहे" त्याने माझे विद्यार्थी संघटनेचे कार्ड घेतले, माझ्याकडून दहा शिलिंग घेतले आणि माझ्या हाती नेमणुकीचे कार्ड देऊन म्हटले "उद्या सकाळी आठ वाजता शॅफ्टस्बरी अव्हेन्यूमधील किंग्स्ले हॉटेलमधे मिस् बार्बरा स्मिथ यांना भेटा."

शॅफ्टस्बरी अव्हेन्यू हा ब्रिटिश म्युझियमच्याजवळचा एक श्रीमंत विभाग आहे. मुंबईच्या ताजमहाल हॉटेलप्रमाणेच किंग्स्ले हे एक भव्य हॉटेल आहे. येथे मला नक्की कोणते काम करावे लागणार आहे, याची मला काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे हॉटेलच्या रिसेप्शन विभागात गेल्यावर माझी छाती दडपूनच गेली. त्या बादशाही दिवाणखान्यात उत्तमोत्तम आणि खानदानी सुंदरींची व रुबाबदार पुरुषांची ये-जा चालू होती. कोणीही मोठ्याने बोलत नव्हते आणि तरीही सर्वांनी एकमेकांविषयी अतिशय आदर ठेवल्याचे दिसत होते. तेथील वेटर्सचे पोषाखच इतके कडक इस्त्रीचे आणि निर्दोष होते, की माझ्या समजुतीने अद्ययावत् म्हणून लंडनला शिवलेल्या माझ्या उत्कृष्ट सुटाचीही मला लाज वाटू लागली. आता या राजेशाही हॉटेलात माझे कसे काय निभावणार ही चिंता मला लागून राहिली. फार काय, असेच परत जावे, असाही विचार माझ्या मनात चमकून गेला.

बावरलेल्या अवस्थेत संकोचाने मला उभा असलेला पाहून तेथील हेडवेटर माझ्याकडे आला. किंचित् लवून तो मला म्हणाला, "गुड मॉर्निंग सर. मे आय् हेल्प यू?"

मी अडखळत म्हटले, "मला मिस् बार्बरा स्मिथ यांना भेटायचं आहे."

त्याने मला 'रिसेप्शनिस्ट' (स्वागत करणारी) तरुणीकडे नेले. तिला मी माझे काम सांगितले. तिने एका मार्गदर्शकाला माझ्याबरोबर दिले.

मिस् स्मिथ ही मोठी देखणी पण अदबशीर तरुणी होती. साधारण साडेपाच फूट उंच, अत्यंत प्रमाणबद्ध शरीर-जणू काही सेंटिमीटर मिलिमीटरपर्यंत मापे आधी ठरवून परमेश्वराने निर्माण केलेले; आकर्षक पण औपचारिक स्मित, काळ्याभोर पोषाखात अधिकच उठून दिसणारा गुलाबी मेणासारखा वर्ण...

मला निरीक्षणाची फारशी संधी न देताच ती व्यावसायिक सफाईने म्हणाली; "आपण आमच्याकडे काम करण्याचं मान्य केलंत हे पाहून

मला आनंद वाटला. मिस्टर रिज्वे हे आपल्या खात्याचे प्रमुख आहेत. त्यांच्याकडे माझ्याबरोबर येण्याची आपण तसदी घ्याल काय ? ''

अर्थात् अशी तसदी घेण्यासाठीच मी तेथे गेलो असल्याने मी हरकत घेण्याचा प्रश्नच नव्हता. वास्तविक, साधे घरगुती काम करण्याचा प्रश्न. पण ही स्मिथबाई अशा थाटात बोलत होती की, इंग्लंडची राणी मला पंतप्रधानपद स्वीकारण्याची विनंती करीत आहे, असे कोणाला वाटावे.

रिज्वेची कचेरी तळमजल्यावर होती. दुरुस्ती, रंगकाम, स्वच्छता इत्यादी कामे रिज्वे या पन्नाशीच्या सुमाराच्या इसमाकडे होती. तो इंजिनियर होता आणि तो कायमपणे त्या हॉटेलच्या नोकरीत होता. त्याला स्वत:ला फारसे काम नसे. पण खाते-प्रमुख म्हणून इतरांच्याकडून कामे करून घेणे आणि पाणी पुरवठा. [illegible] पुरवठा, हवा ऊबदार करण्याची यंत्रे यांची कामे उत्तम रीतीने चालू ठेवणे ही त्याची जबाबदारी होती. बार्बरा स्मिथने माझी आणि रिज्वेजी ओळख करून दिली. त्याने मला दोनचार औपचारिक प्रश्न विचारले आणि लगेच काम सुरू करण्याची माझी तयारी आहे काय असे विचारले. मी होकार दिला. पण त्यावेळेपर्यंतसुद्धा हे काम म्हणजे काय याची मला कल्पना नव्हती.

रिज्वे म्हणाला, 'ठीक. तुमच्या विभागाचे प्रमुख वायली ट्रिप यांच्याकडे जा आणि ते सांगतील ते काम करा.' अशा रीतीने अक्षरश: सांगकाम्या होऊन मी ट्रिप यांच्याकडे गेलो. वायली ट्रिप हा इसम साधारण पस्तीशीच्या सुमाराचा, मोठा दिलदार आणि रंगेल वृत्तीचा होता. त्याने मला पहिल्याच भेटीत सांगितले, '' तुम्ही केवळ अंगमेहनतीचं काम करणारे नसून बौद्धिक क्षेत्रात काम करणारे विद्यार्थी आहात, याची मला जाणीव आहे. मी तुमच्यावर देखरेख करणार आहे असं तुम्ही मानू नका. मी तुमचा मित्रच आहे. '' असे म्हणून त्याने आणखी दोन विद्यार्थ्यांची आणि माझी ओळख करून दिली. हे दोघेही आफ्रिकन होते आणि दोघांचेही नाव जॉन असेच होते! अर्थात् मग आम्ही त्यांचा उल्लेख 'उंच जॉन'

आणि 'गिड्डा जॉन' असा करू लागलो.

किंग्स्ले हॉटेलच्या भिंतींना ऑईल-पेंट दिलेला होता. या सर्व भिंती वर्षातून दोनदा ओल्या फडक्याने पुसून काढायच्या, असा शिरस्ता होता. आमचे 'वॉशिंग द पेंट' म्हणजे हेच ते काम होते, असे आम्हाला सांगण्यात आले. मग आम्ही शिडच्या, बादल्या आणि फडकी घेऊन आमच्या कामाला लागलो. आमच्यावर देखरेख करणारा वायली ट्रिप इतका उदार होता की, त्याने आम्हाला स्वच्छ सांगून टाकले, "हे पाहा, काम करायचं म्हणजे ते झटपट उरकून टाका असं नव्हे. हे काम तुम्ही लवकर संपविण्यात तुमचा काही फायदा नाही. तुम्ही असं करा की, हॉटेलच्या एकेका खोलीत जाऊन सरळ आतून दार लावून घ्या. मग थोडंसं काम करून तुम्ही वाचीत बसलात तरी चालेल."

"आणि कुणी तपासायला आलं तर?" एका जॉनने विचारले.

"तर तुम्ही सांगा की, दाराजवळ शिडी लावली होती, म्हणून दार लावून घ्यावं लागलं."

आम्ही या पडत्या फळाची आज्ञा घेतली आणि खोलीत जाऊन ओल्या फडक्याने भिंती पुसू लागलो. थोडा वेळ काम झाले आणि दीड वाजता जेवणाची वेळ झाली. जेवणाचा थाट मोठा नामी होता. किंग्स्ले हॉटेल हे बडच्या लोकांचे राहण्याचे ठिकाण असल्याने तेथे जेवणही उच्च दर्जाचे असे. विशेष म्हणजे, हॉटेलमध्ये राहणाऱ्या लोकांना एका प्रकारचे जेवण आणि आमच्यासारख्या कामकऱ्यांना निकृष्ट प्रतीचे जेवण असा प्रकार तेथे नव्हता. दररोज प्रत्येक जेवणाला निराळा बेत असे. सकाळी ब्रेकफास्टला मासे, कॉर्नफ्लेक्स, दूध, अंडच्याचा एक पदार्थ, पाव, लोणी, जॅम, चहा. मग एक वाजता भरपूर मांस, अंडी, मासे, दूध, भाज्या, पाव, लोणी. पुन्हा चार वाजता चहाबरोबर उत्तम केक्स, बिस्किटे इत्यादी असे. आमची कामाची वेळ सकाळी आठ ते दुपारी चार अशी होती. त्यामुळे रात्रीचे डिनर सोडून इतर जेवण आम्हाला हवे तेवढे आणि उत्तमातील

उत्तम असे मिळे. स्वैपाकघरात एक वृद्ध ब्रिटिश स्त्री होती. ती आम्हाला वाढीत असे. अनेकदा ती आम्हाला अगदी घरगुती आग्रह करून म्हणे, ' आज चिकन फार छान जमलंय्. तुम्ही आणखी घेऊन तर पाहा. ' आम्ही सारे तिला ' मॉम ' (आई) म्हणत असू आणि तीही ' माय् सन ' असे प्रेमळ संबोधन आम्हाला उद्देशून वापरीत असे.

वर मी खाण्यापिण्यातील पदार्थांची काही नावे दिली आहेत आणि खरोखरच किंस्ले हॉटेलमध्ये मी जसे राजेशाही जेवणखान केले, तसे इतरत्र कुठे केले नसेल. खाण्यापिण्याची रेलचेल अशी साहित्यात देणे मोठे प्रतिष्ठेचे मानीत नाहीत हे खरे, पण मला वाटते, ही चूक आहे. याचे कारण असे, की दुर्दैवाने आमच्याकडे श्रीमंती, पैसा, ऐषआराम आणि चैन यांच्याविषयीच नव्हे, तर एकंदर जीवनाच्या उपभोगाबद्दलही जाणूनबुजून अनादर निर्माण करण्याची प्रवृत्ती आढळते. आळस आणि केवळ ख्यालीखुशाली चांगली नव्हे. पण भरपूर काम करावे, भरपूर पैसा मिळवावा, आपल्या विश्रांतीचा आणि पैशाचा भरपूर उपभोग घ्यावा, यात वाईट ते काय ? दारिद्र्याची हेटाळणी करू नये हे खरे, पण म्हणून दारिद्र्य तेवढे चांगले आणि श्रीमंती म्हणजे ' लुळी-पांगळी ' ही कमकुवत आणि मनोभंग करणारी प्रवृत्ती हा आम्हाला मिळालेला एक शाप आहे. इंग्लंडसारख्या कोणत्याही प्रगत देशात संपत्तीबद्दल योग्य तो आदर असतो. आमच्याकडे दारिद्र्य असेल, तर तो एक वर आहे असे न मानता, त्यातून बाहेर पडले पाहिजे असे सतत वाटत राहिले पाहिजे. दारिद्र्य हा व्यक्तीचा व समाजाचा एक भयंकर रोग आहे, तो नष्ट केला पाहिजे ही जाणीव अधिकाधिक रुजली पाहिजे. गरिबीबद्दल आणि गरिबांबद्दल सहानुभूती असणे निराळे आणि धनाबद्दल आकस असणे निराळे. इंग्लंडमधील वास्तव्यात माझ्या मनावर ज्या अनेक गोष्टी रुजल्या, त्यातील ही महत्त्वाची एक आहे, की संपत्ती आणि तदनुषंगिक भौतिक सुखे यांच्याविषयी आकर्षण वाटण्यात काहीही पाप नाही. त्यांचा मन:पूर्वक आणि निर्भयपणे उपभोग घेतला पाहिजे. दारिद्र्याचे देव्हारे न

माजवता श्रमपूर्वक संपत्ती मिळवावी आणि या विशाल व सुंदर जीवनातील अधिकाधिक सुरस सुखे अनुभवावी. ही भौतिक सुखे म्हणजेच जीवनातील सर्वस्व नव्हे. त्याहूनही उदात्त असे हे जीवन आहे हे खरे, पण या उदात्ततेकडे नेणारा मार्ग म्हणजे सर्वसंगपरित्याग हा नव्हे, - निदान हा एकमेव मार्ग नव्हे.

मी ज्या हॉटेलमध्ये काम करीत होतो, तेथे अर्थात् बऱ्याच वेट्रेसिस् होत्या. त्यातल्या बऱ्याच आयर्लंडमधील होत्या, काही स्कॉटलंडमधील होत्या व थोड्या ब्रिटिश होत्या. त्यांपैकी तीनचारजणी माझ्या चांगल्या लक्षात राहिल्या आहेत. मेरी डन् नावाची एक अगदी तरुण, सुंदर, विशीच्या आसपासची आयरिश मुलगी होती. तिच्या तारुण्यामुळे की काय कोण जाणे, पण बाकीच्या बऱ्याचजणी तिचा द्वेष करीत. वरून त्या तिच्याशी औपचारिक गोडव्याने वागत, पण तिच्यामागे तिची हेटाळणी करीत. एक दिवस मी वायलीला विचारले, "तुम्हाला, म्हणजे तुम्हा ब्रिटिशांना या आयरिश मुली का आवडत नाहीत ?"

तो म्हणाला, "हे लोक दरिद्री असतात, म्हणून इथं नोकरीसाठी येतात. त्यापैकी बऱ्याच मुली इथं भानगडी करतात. अनौरस मुलांना सरकारी अनाथाश्रमात टाकतात आणि भरपूर पैसा मिळवून आपल्या आयर्लंडमध्ये जातात. मग यांच्या मुलांना कोण पोसणार ! आम्ही-आम्ही इंग्रज लोक कर भरतो आणि त्यातून यांच्या चैनीखातर जन्माला आलेल्या मुलांना पोसतो. अशा बायकांच्याबद्दल आम्हाला का सहानुभूती वाटावी ?'

जीन नावाची एक स्कॉच मुलगी होती-मुलगी कसली ? बाईच ती ! इंग्रज माणूस खुशाल पन्नाशीच्या वयाच्या स्त्रीला पोरगी म्हणो, पण आम्हा मराठी माणसांना तरी हे झेपणारे नाही. तिला सिगरेट ओढायची सवय होती आणि अधूनमधून ती आमच्याकडून सिगरेट घेत असे. एकदा एका कॉरिडॉरमध्ये तिची आणि माझी कामाची एकच वेळ आली. इकडच्या तिकडच्या गोष्टी करता करता ती मला म्हणाली, "आज मी लवकर

काम संपवणार आहे. मला सिनेमाला जायचं आहे. ''

मी थट्टेनं विचारले, '' एकटीच ? की कुणा मित्राबरोबर ? ''

'' माझा एक बॉयफ्रेंड आहे, त्याच्याबरोबर. ''

'' अस्सं ? म्हणजे तू प्रेमात पडली आहेस तर ? ''

'' प्रेम कसलं ? बॉयफ्रेंड असला म्हणजे खर्च वाचतो; एवढंच. तो तिकीट काढतो, ड्रिंक देतो आणि जेवणही देतो. काटकसर म्हणून मी बॉयफ्रेंड केला आहे झालं. ''

तिने आपल्या प्रेमाचा रोखठोक हिशेब ठेवला होता, हे उघड्च होते.

मेरी या नावाची आणखी एक स्कॉच तरूणी होती. ती इस्सेभी जादा होती. एक दिवस मी काम करीत असताना ती मागून आली आणि म्हणाली, '' सलाम आलेकुम्. ''

नाजुक आवाजातील हे हिंदुस्थानी अभिवादन ऐकून मी चमकून मागे पाहिले. साधारण तिशीच्या सुमाराची, सडपातळ बांध्याची, पण भरदार छातीची, करडय़ा केसाची उत्साही वेट्रेस होती. मीही तिला अभिवादन करून विचारले, '' मी भारतीय आहे ते तुम्ही कसं ओळखलंत ? ''

ती म्हणाली, '' आमच्या हॉटेलात पूर्वी भारतीय लोक राहून गेले आहेत. एकदा एक संस्थानिक इथं उतरले होते. मी त्यांच्या खोलीत वेट्रेस होते. त्यांच्या बरोबर एक बाई होती. माझी खात्री आहे, ती त्यांची बायको नव्हती. ''

पहिल्याच भेटीत इतक्या उघडपणे बोलणाऱ्या त्या मेरीचे मला थोडे आश्चर्यच वाटले. पण हॉटेलात काम करणाऱ्या या मुलींनी इतके विविध रंगढंग पाहिलेले असतात आणि काही अंशी केलेलेही असतात, की तिच्या या बोलण्याचे मला वास्तविक आश्चर्य वाटू नये, असाही विचार माझ्या मनात आला.

त्यावेळी मेरीचे काम अगदी साधे होते. तिला फक्त काडय़ाची

पेटी हवी होती. ती मी दिली आणि आमची 'पहिली मुलाखत' तिथेच संपली. पण मेरीने ही ओळख योजनापूर्वक काढली असावी, असे मला तिच्या नंतरच्या हालचालींवरून वाटले. कारण आमच्या या संभाषणानंतर दोन दिवसांनीच ती माझ्या कामाच्या जागेकडे येऊन म्हणाली, "आमचा एक छोटासा क्लब आहे, त्यात तुम्ही या ना एकदा."

"कसला क्लब?"

"त्याचं नाव आहे 'हाफ मून क्लब.' तिथं मद्याचा बार आहे, संगीत आहे, नृत्य करायला मुली आहेत. आणि प्रवेश-फी वगैरे काही नाही. मग याल ना?"

शनिवारी संध्याकाळी सहा वाजता तिच्या क्लबवर जायचं मी कबूल केलं. लंडनच्या कुप्रसिद्ध सोहो भागात एका छोट्याशा गल्लीत हा क्लब होता. मी त्याचा पत्ता शोधीत गेलो, तेव्हा एका घराच्या पहिल्या मजल्यावर 'हाफ मून क्लब'ची पाटी आणि तिच्यावर अर्धचंद्राचे चित्र दिसले. हा सोहो भाग म्हणजे असे संशयास्पद क्लब, जुगाराचे अड्डे, वेश्यांच्या वस्त्या इत्यादींनी भरलेला असे. त्यामुळे या क्लबबद्दल माझ्या मनात प्रथमपासूनच सावधगिरी होती.

दार ढकलून मी आत गेलो, तेव्हा एका सुंदर तरुणीने हस्तांदोलन करून माझे स्वागत केले. ती उघडउघड धंदेवाली दिसत होती. हा 'अर्धचंद्र' क्लब म्हणजे खाजगी व तात्पुरत्या मधुचंद्राचा रस्ताच होता, हे तिला पाहून कोणीही ओळखले असते. मी क्लबमध्ये चटकन एक नजर टाकली. साधारण वीसपंचवीस फूट लांबरूंद अशी ती जागा नीट, सुंदर होती. एका बाजूस मद्याचा बार होता आणि पंचविशीच्या वयाचा एक इटालियन इसम मद्य देण्यासाठी उभा होता. चारपाच टेबले भिंतीजवळ ठेवलेली होती. आणि त्यांच्याभोवती खुर्च्या होत्या. हॉलची मधली जागा रिकामी ठेवलेली होती. ती नृत्याकरिता होती हे उघड होते. एका कोपऱ्यात नाणी टाकून ध्वनिमुद्रिका लावण्याचे यंत्र होते. विशेष म्हणजे ती तरुणी आणि

तो तरुण ‘ साकी ’ यांच्याशिवाय त्या क्लबमध्ये इतर कोणी नव्हते.

त्या तरुणीने मला एका टेबलाजवळच्या खुर्चीवर बसविले आणि लाघवी नजरेने पाहत ती म्हणाली, “ आपण कोणतं मद्य घ्याल ? ”

मी किंचित् संकोचून म्हटले, “ मी-मी त्या मेरी एल्व्हिनची वाट पाहतो आहे. ”

“ म्हणजे ती स्कॉच पोरगी का ? ती कोणत्याही क्षणी इथं येईल. आपण थांबा हं ”

तिने एक ध्वनिमुद्रिका लावली आणि ती बारजवळ जाऊन उभी राहिली. त्या विचित्र अवस्थेत संभापण कसे सुरू करावे हे मला सुचेना आणि स्तब्धही बसणे चमत्कारिक वाटू लागले. अशी पाचदहा मिनिटे गेली असतील, तोच मेरी आली.

हॉटेलमध्ये काम करताना ही पोरगी पांढऱ्या-निळ्या गणवेपात वावरत होती. पण त्या क्लबमध्ये मात्र ती ऐटबाज फ्रॉक आणि त्यावर लोकरीचा फॅशनेबल ओव्हरकोट घालून आली होती. नुकताच ‘ मेकअप् ’ केल्यामुळे ती प्रसन्न आणि ताजीतवानी वाटत होती. मला पाहिल्याबरोबर ती जवळ आली आणि किंचित उशीर झाल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून माझ्याजवळच्या खुर्चीवर बसली. तिच्या सांगण्याप्रमाणे मी ‘ जिन ’ मागविली आणि त्या पांढऱ्या पारदर्शक द्रवाचे घुटके घेत आम्ही प्रथम हॉटेलबद्दल बोलू लागलो. हॉटेलमधले काम फार नसते, पण सर्व वेट्रेसेस्‌वरची प्रमुख म्हातारी बाई दुष्ट आहे, असे तिने सांगितले. इतक्यात तिला कसली तरी आठवण झाली आणि मद्याचा चपक मधेच थांबवून बारजवळच्या तरुणाला ती म्हणाली, “ रिचर्ड, तूही काहीतरी घे ना. ”

त्याने खोटया संकोचाने प्रथम किंचित आढेवेढे घेतले, “ मी ? कशाला-कशाला ! ”

“ छे: छे ! तू घेतलंच पाहिजेस. धिस ड्रिंक इज् ऑन मी. ”

पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्याने व्हिस्कीचे दोन पेग भरले. अर्थातच

मेरीचे हे औदार्य माझ्याच खिशावर आधारलेले आहे हे मी ओळखले. थोड्या वेळाने आलेल्या बिलाने माझी खात्री करून दिली. मी पौंडाची नोट ठेवली आणि रिचर्डने मोड परत आणून दिली. त्यातील दहा शिलिंगाची नोट मी खिशात ठेवण्यापूर्वीच मेरी अगदी लाडात येऊन म्हणाली, "हे बघ, मला दहा शिलिंग उसने देतोस का? दोन दिवसांनी पगार झाल्याबरोबर परत करीन मी."

हो-ना करण्याचा प्रश्नच नव्हता. मी उत्तर देण्याच्या आधीच तिने दहा शिलिंगाची नोट आपल्या पर्समध्ये ठेवली होती. तिने या व्यवहाराला जरी वरवर उसनवारी म्हटले असले, तरी ती देत असलेल्या सहवासाचा मोबदला म्हणून तिला ते पैसे हवे होते, हे मी ओळखले. आम्ही इकडच्या तिकडच्या थोड्या औपचारिक गप्पा मारतो न मारतो तोच साधारण पन्नास वर्षांचा एक टक्कलवाला इसम क्लबमध्ये आला. त्याने मेरीला पाहिले आणि 'हॅलो' म्हणून तो आमच्या टेबलाकडे आला. तिनेही त्याला पाहिल्यावर हर्षभराने त्याचे स्वागत केले. तिने आमची ओळख करून देण्यापूर्वी मला हळूच विचारले, "तुम्ही आमच्या हॉटेलात काम करता हे सांगू ना?" मी म्हटले, "चालेल." मग तिने ओळख करून दिली. तो गृहस्थ स्वित्झर्लंडमधला घड्याळांचा की कसला तरी फिरता एजंट होता. त्याचे आणि मेरीचे पूर्वीपासूनचे सूत असावे आणि तिने त्या दिवशी साडेसहाला त्याला हाफ मून क्लबमध्ये अपॉइंटमेंट दिली असावी, याची मला जाणीव झाली. मला तिचा थोडा रागही आला. कारण माझ्या समजुतीखातर माझ्याबरोबर दहापंधरा मिनिटे बसायचे, त्यासाठी दहा शिलिंग मिळवायचे, आणि मग दुसऱ्या मित्राबरोबर जायचे, असा तिचा पूर्वरचित डाव होता, हे माझ्या लवकरच लक्षात आले.

त्या विक्रेत्याने मला आणि मेरीला मद्य घेणार काय, अशी पृच्छा केली. मी नकार दिला. मेरीने नंतर (आपण दोघं) घेऊ, असे अर्थपूर्ण उत्तर दिले आणि म्हणून त्याने स्वत:ही ड्रिंक घेण्याचा बेत पुढे ढकलला.

त्याने बोलता बोलता खिशातून एक पत्राचे पाकीट काढले आणि तो म्हणाला, " आजच मला स्वित्झर्लंडहून पत्र आलं. मला दोन दिवसात परत जायला पाहिजे. " मग एकदम त्याच्या मनात एक कल्पना आली. त्या पत्रावरील तिकीट काढीत त्याने मला विचारले, " तुम्ही निरनिराळ्या देशांची तिकीटं जमा करीत असालच, नाही ? हे घ्या स्वित्झर्लंडचं. " खरे म्हणजे मी कसलीच तिकीटे गोळा करीत नव्हतो. पण इतक्या उत्साहाने तिकीट देणाऱ्याला ' नको ' म्हणण्याचा रोखठोकपणाही मला जमण्यासारखा नव्हता, म्हणून मी ते आभारपूर्वक घेतले. तेवढ्यात मेरी एकदम उठली आणि त्या एजंटाचा हात धरून मला म्हणाली, " आम्ही जरा कामासाठी गेलो तर चालेल ना ? "

यावर मी ' चालणार नाही ' असे तरी कसे म्हणणार ? मी मनातून शिव्या देत वरून सुहास्य मुद्रेने गुड नाईट म्हटले, आणि त्यांनी चट्कन आनंदाने प्रयाण केल्यावर माझ्या हातातील तिकिटाकडे शून्यपणे पाहत बसलो. एखाद्या लहान मुलाच्या हाती प्रणयी जोडप्याने चॉकलेट देऊन त्याला शिताफीने घराबाहेर पाठवावे त्याप्रमाणे या मेरीने आणि तिच्या मित्राने मला स्वित्झर्लंडचे तिकीट-आगगाडीचे किंवा विमानाचे नव्हे तर साधे टपालाचे-देऊन मला चांगले बनविले होते. आपण बनले जात आहोत, याची मला त्याच वेळी कल्पना आली होती. पण त्या परिस्थितीत मला अन्य काहीही करणे शक्य नव्हते.

त्यानंतर पगाराचा दिवस गेला, पण मेरी माझ्याकडे फिरकली नाही. इंग्लंडमधील सर्वसामान्य शिरस्त्याप्रमाणे आणि सौजन्यास अनुसरून, स्त्रियांनी घेतलेले पैसे मी परत मागणार नाही, अशी मेरीला अपेक्षा होती. एरवी मी मागितले नसते. पण दहा शिलिंगापेक्षा तिने मला फसविल्याची जाणीव अधिक संतापजनक होती. म्हणून मी आणखी एक पगार झाल्यावर तिला दोनदा त्या पैशाची आठवण करून दिली. अखेर तिने फणफणत एकदा ते पैसे लिफ्टमनबरोबर पाठवून दिले. आणि हाफ मून क्लबमधील

आमचा गावठी रोमान्स असा अगदी रूक्षपणे संपला.

किंग्स्ले हॉटेलमध्ये जॉर्ज नावाचा एक लिफ्टमन होता. अर्थात आम्ही इमारतीतील मागच्या बाजूचा लिफ्ट वापरीत होतो. पुढील लिफ्ट हॉटेलमध्ये राहणाऱ्यांसाठी होता. कर्मचारी या मागच्या लिफ्टनेच ये-जा करीत असत. हा जॉर्ज अगदी घुम्या आणि नेहमी विमनस्क असे. पण मी मुद्दाम कधी त्याची चौकशी केली नाही. कारण अनेक ब्रिटिश लोक मी असेच पाहिले होते, आणि इतरांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनात शिरावे हे त्यांना आवडत नसे. एकदा मी जॉर्जच्या लिफ्टमधून जात असता तो आपण होऊनच मला म्हणाला, " आज मी पहाटे साडेचारला उठलो. हल्ली कामं फार लवकर सुरू होतात. "

मी सहज त्याच्या कर्तव्यनिष्ठेचे औपचारिक कौतुक केले. दुसऱ्या दिवशी मी सहज त्याला विचारले, " आजसुद्धा तुम्ही पहाटे साडेचारला उठलात का ? "

त्याने तिरसटपणे विचारले, " तो माझा प्रश्न आहे! तुम्हाला त्याच्याशी काय करायचं आहे ? " त्याचे हे उत्तर मला चमत्कारिक वाटले. आदल्या दिवशी हा आपण होऊन मित्रत्त्वाने बोलतो काय आणि दुसऱ्या दिवशी विनाकारण तिरसटतो काय ! हा प्रसंग किरकोळ म्हणून मी विसरूनही गेलो असतो. पण दुसऱ्या दिवशी जॉर्जऐवजी दुसराच लिफ्टमन पाहून मला आश्चर्यच वाटले. जाडजूड अंगाचा, साठी उलटण्याच्या बेतात असलेला, घुम्या जॉर्ज अत्यंत वक्तशीर होता. त्याच्या गैरहजेरीबद्दल मी वायली ट्रिपला विचारले, तेव्हा तो म्हणाला, " ती एक दुःखद कहाणी आहे. जॉर्ज हा ब्रिटिश नाही, तो पोलिश आहे. गेल्या युद्धात तो पोलंडमधून पळून आला. तिथं काय झालं हे आम्हाला कधीच नीट कळलं नाही. पण पोलंडमधील लढाईत कसल्यातरी भयंकर प्रकारात जॉर्ज सापडला होता. त्याचा त्याच्या डोक्यावर परिणाम झाला होता. तो कुणाशी धड बोलत नसे. काल त्यानं आपला गळा कापून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अजून

तो बेशुद्धावस्थेत इस्पितळातच आहे.''

मला सुन्न झाल्यासारखे वाटले. आत्महत्या करण्याचा निश्चय केलेल्या माणसाशी काल मी बोलत होतो हे आता माझ्या लक्षात आले आणि जॉर्जच्या तुसडचा उद्गारांचा राग येण्याऐवजी मला त्याची दया वाटू लागली. माझ्याबरोबरीचे दोन आफ्रिकन जॉर्ज आणि मी एकमेकांशी स्नेहाने वागत होतो. पण ज्याला मैत्री म्हणता येईल असे आमचे संबंध कधी जडलेच नाहीत. आपल्या देशाविषयी किंवा वैयक्तिक जीवनाविषयी बोलण्यास ते फारसे उत्सुक नसत. पुढेपुढे आमच्याबरोबर एक ब्रह्मी मुलगा कामाला आला. तो अगदीच तरुण म्हणजे अठराएकोणीस वर्षांचा होता. तो निष्कारण गर्वात असे आणि आपल्या मैत्रिणींचे फोटो इतरांना दाखवून बढाई मारीत असे. त्याचा आणि रिज्वेच्या हाताखालच्या एका ब्रिटिश नोकराचा एकदा खटका उडाला आणि त्यानंतर रिज्वेने त्या ब्रह्मी तरुणाची लगेच दुसऱ्या खात्यात बदली केली. काचसामान धुऊन व पुसून ठेवण्याचे हे काम जोखमीचे होते. त्याला लवकरच तो कंटाळला आणि त्याने ही तात्पुरती नोकरीही सोडली.

किंग्स्ले हॉटेलमधील लक्षात राहण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे तेथील प्रत्येक खोलीतील पलंगपोस दररोज बदलले जात. प्रत्येक पलंगावर दोन पलंगपोस असत. एक गादीवर आणि दुसरा पांघरण्याच्या रगाखाली असे. हे पलंगपोस कोणी वापरले असोत वा नसोत, पण दररोज लाँड्रीतून ट्रकने पलंगपोस येत आणि सबंध हॉटेलमधील सर्व पलंगपोस दररोज सकाळी बदलण्यात येत. स्वच्छतेस दिलेले हे महत्त्व तेथील कामाच्या प्रत्येक क्षेत्रातच दिसत असे. कर्मचाऱ्यांचे कपडे, अन्न-पदार्थांच्या थाळ्या, टेबल-क्लॉथ्स्, गालिचे हे सर्व अतिशय नीटस, स्वच्छ आणि प्रसन्न असत.

या हॉटेलमधील काम मला चांगले मानवणारे असेच होते. काम अगदी हलकें, नाममात्र होते. दुपारी चारनंतर मला भरपूर वेळ होता. पैसेही बरे मिळत होते आणि जेवणा-खाण्याचा खर्चही वाचत होता. सुमारे पाच

आठवडे हे काम केल्यानंतर कामच संपले आणि आम्हाला किंग्स्ले हॉटेलला रामराम ठोकावा लागला. आता पुन्हा मी इंग्लंडमध्ये गेलो, तर गंमत म्हणून दोन दिवस याच हॉटेलमध्ये राहणार आहे!

◇◇◇◇

# नऊ : खेड्याची ओढ

मद्याचा प्याला, प्रमत्त रमणीचा सहवास किंवा साहसमय प्रवास चित्तथरारक असले, तरी अखेर प्रगल्भ शांततेची आणि नीरव प्रसन्नतेची मोहिनी काही वेगळीच असते. स्वत:ला विसरून, बँडच्या धडाक्यात बेभान होऊन नृत्य केल्यावरही, प्रशांत निसर्गाच्या सान्निध्यातील सायंकाळची सुखी रंगत वेगळीच आहे, अशी जाणीव झाल्यावाचून राहत नाही. लंडनच्या धांदलीत, गडबडीत, धावपळीत आणि गोंगाटात काही महिने काढल्यावर मलाही एखाद्या शांत खेड्यात जाण्याची ओढ लागली. एखाद्या मोठ्या शहरात केव्हाही उठून जाता येते, हॉटेलमध्ये उतरता येते. पण खेड्यात असे एकदम जाऊन राहणे सुलभ नसते. विशेषत: इंग्लंडसारख्या परदेशात तर अशक्यच असते. खेड्यात राहण्याचे हॉटेल असणे कठीणच आणि चुकून असलेच, तरी कुठेतरी हॉटेलमध्ये उतरून गावातील घरे बाहेरून पाहणे म्हणजे काही गाव पाहणे नव्हे. गाव म्हणजे माणसे, त्यांचे कौटुंबिक जीवन, त्यांचे सामुदायिक जीवन. दोनचार दिवसांच्या मुक्कामात या साऱ्याचे

उत्तम आकलन होईल असे नव्हे, पण काहीशी कल्पना तर येईल, या विचाराने मी इंग्लिश खेड्यात कोणाच्या घरी कसे राहता येईल, याची चौकशी करू लागलो.

चौकशी करता करता कळले की, ‘ईस्ट अॅन्ड वेस्ट फ्रेन्डशिप कौन्सिल’कडे असे काही पत्ते आहेत. मी त्यांच्या कचेरीत गेलो आणि सांगितले की, मला इंग्लंडमधील एखाद्या खेड्यात दोनचार दिवस राहायचे आहे. तो नोव्हेंबर महिना होता. आणि नाताळच्या सुट्टीत मला असा वेळ काढणे शक्य होते. श्री. कोल या त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी माझ्या इच्छेचे स्वागत करून सांगितले, ‘आपल्या घरी दोनचार दिवस एखादा परकीय पाहुणा किंवा पाहुणी राहावयास यावी अशी मनीषा व्यक्त करणारी काही कुटुंबे आहेत. आम्ही रोटरी क्लब्स, लायन क्लब्स व इतर सार्वजनिक संस्थांना पत्रे पाठवून अशा कुटुंबांचे पत्ते पाठविण्याची विनंती करतो. या कुटुंबांना अर्थातच पैशाची अपेक्षा नसते. परकीय संस्कृतीची आणि परकीय पाहुण्यांची थोडीफार ओळख व्हावी, विचारांची देवाणघेवाण करावी आणि काही चांगुलपणा जोडावा, अशी त्यांची इच्छा असते. केव्हा केव्हा जीवनात थोडे वैचित्र्य आणावे हाही उद्देश असतो. जे पाहुणे थोडे दिवस राहू इच्छितात, अशांचे पत्ते आम्ही त्यांना देतो व निमंत्रण बहुधा कुटुंब-प्रमुख किंवा त्याची पत्नी पाठविते.’

मग श्री. कोल यांनी मला काही गावे सुचविली. लंडनपासून दूर नसलेले पण अगदी लहानसे खेडे मला हवे होते. मी चारसहा गावांतून जॉर्डन्स या खेड्याची निवड केली आणि माझा पत्ता श्री. कोल यांना देऊन घरी परतलो.

दहाबारा दिवसांनी मला जॉर्डन्स येथील श्री. बर्नार्ड लॉसन यांचे अगदी प्रेमळ निमंत्रण आले. नाताळच्या सुट्टीत आपल्या घरी येऊन मी राहावे अशी त्यांनी विनंती केली होतीच, पण पुढे म्हटले होते, - ‘आपल्याबरोबर फिरायला कम्पॅनियन म्हणून येईल अशी मुलगी

आम्हाला नाही, याचे वाईट वाटते.' पाहुणा पुरुष असेल तर त्याला गाव दाखविण्यासाठी मुलीने जावे. आणि पाहुणी स्त्री असेल तर तिच्याबरोबर मुलाने जावे, असा तिकडील सर्वसाधारण शिरस्ता आहे.

पत्राने माझ्या जाण्याचा दिवस आणि वेळ ठरवून मी २५ डिसेंबर १९५५ रोजी सकाळी आठच्या रेल्वेने लंडनहून निघालो. त्या आधीची रात्र मी अशा गोंधळात काढली होती की, काही विचारू नका. नाताळ सुरू होण्याच्या आदली ती रात्र म्हणजे लंडनचे मुक्त निशाचरी जीवनच. त्या रात्री लंडनच्या ट्रॅफलगार चौकात येणाऱ्या कोणत्याही स्त्रीचे कोणीही चुंबन घेऊ शकतो. सामुदायिक चुंबनांचा हा सोहळा पाहण्यात आणि निरनिराळ्या नृत्यगृहातील सावळागोंधळ अनुभवण्यात मी ती जवळजवळ सारी रात्र घालविली होती. म्हणून चुरचुरत असलेले डोळे मिटून झोप घेण्याचा प्रयत्न करीतच मी सकाळी प्रवास केला. प्रवास काही फार मोठा नव्हता. -फक्त वीस मैलांचा. सीअर ग्रीन स्टेशनवर मी उतरलो. बर्नार्ड लॉसन हे पंचावन्नच्या सुमाराचे गृहस्थ त्या थंडीच्या दिवसातील भल्या सकाळीच कुडकुडत स्टेशनवर उभे होते. सबंध गाडीतून तीनचार लोकच उतरले आणि त्यात परकीय असा मी एकटाच होतो, त्यामुळे त्यांनी मला सहजच ओळखले. आमच्या मराठी बाण्याप्रमाणे मी चांगली खणखणीत लोखंडी (अॅल्युमिनियम) बॅग बरोबर घेतली होती. ज्या भागात मी जात होतो, त्या भागाविषयीची बरीच पुस्तके, माझे कपडे वगैरे सामान मी घेतले होते, म्हणून बॅग जरा जडच झाली होती.

मला उतरून घेताना लॉसन यांनी माझी बॅग घेतली आणि ते म्हणाले, " आमच्या गावी जायचं, म्हणजे अर्धा मैल चालावं लागेल. आणि ही जड बॅग घेऊन चालणं तुम्हाला सोपं वाटणार नाही. मी सायकल आणली आहे, तिच्यावर बॅग टाकू आणि आपण चालत जाऊ. चालेल ना? "

त्या गृहस्थाच्या बोलण्यात खराखुरा जिव्हाळा आणि गोडवा होता. लंडनसारख्या मोठ्या शहरातील लोकांची कलाकुसर आणि कृत्रिम आपुलकी

थोडऱ्या परिचयानंतर मला ओळखता येऊ लागली होती. आणि म्हणून खेडऱ्यातील या अकृत्रिम वागण्याची माझ्या मनावर अधिकच छाप पडली. आपल्याकडच्या जयसिंगपूर किंवा घोरपडी स्टेशनासारखेच 'सीअर ग्रीन' स्टेशन दिसले. स्टेशनपासून जॉर्डन्स गावाकडे जाणारा रस्ता लहानसाच, पण अतिशय स्वच्छ, सुंदर होता. गवतावर दवाचे थेंब चमकत होते. थंडीचा कडाका असूनही ढगांच्या मागून निष्प्रभ वाटणारा मंद सूर्य प्रकाशत होता. तो इतका मंद वाटत होता की, जवळजवळ चंद्राच्या गोळ्यासारखाच तो दिसत होता. सकाळचे गार वारे झोंबत होते. बकिंगहॅमशायर परगण्यातल्या त्या रमणीय भागात पाइन वृक्षाची उंचच उंच झाडे रुबाबात डोलत होती आणि पाखरांची चिवचिव चालू होती.

पंधरावीस मिनिटात आम्ही जॉर्डन्स गावाला पोहोचलो. वाटेत लॉसन यांनी मला आपली घरगुती माहिती सांगितली. त्यांच्या पत्नीचे नाव होते मेरी आणि त्यांच्या पंधरा वर्षांच्या एकुलत्या एक मुलाचे नाव होते ख्रिस्तोफर. लॉसन कुटुंब हे 'क्वेकर-पंथीय' होते. ख्रिश्चन धर्मातील उच्च तत्त्वे मानणाऱ्या, पण धर्मातील अनावश्यक, औपचारिक चालीरीतींना व धार्मिक अवडंबराला विरोध करणाऱ्या लोकांची ही संघटना आहे. 'सोसायटी ऑफ फ्रेंडस' हे या संघटनेचे नाव असून, या पंथाच्या सभासदांना 'क्वेकर्स' असे म्हणतात. ख्रिश्चन धर्मातील निरर्थक बाह्य अवडंबराला कंटाळून सतराव्या शतकात जॉर्ज फॉक्स याने इंग्लंडमध्ये हा पंथ सुरू केला. जगातील अनेक देशात या पंथाचे लोक विधायक कार्य करीत आहेत. भारतातसुद्धा ओरिसा आणि मध्यप्रदेश या राज्यात या संघटनेने समाजसेवेची दोन केंद्रे चालविलेली आहेत. या पंथास धर्मगुरूची किंवा चर्चचीही आवश्यकता नसते. कोणीही उपदेश केल्यावाचून प्रत्येकाला आपल्या आंतरिक प्रेरणेच्या बळावर परमेश्वराची उपासना करून चित्‌शांती मिळविता येईल, असे हा पंथ मानतो. निरपेक्षपणे जगभर समाजसेवा करणाऱ्या या संस्थेला १९४७ सालचे शांततेचे नोबेल पारितोपिक देण्यात आले होते.

आपल्याकडे खेडे म्हटले की, अनेक गैरसोयी अपरिहार्यपणे येतात. वाहतुकीच्या सोयी नाहीत, धूळ किंवा चिखल यांनी भरलेले वाकडेतिकडे रस्ते, कुबट अंधेरी घरे, जुन्या समजुतींचा पगडा असलेले लोक, इत्यादींचे चित्र खेडे या शब्दाने आपल्यापुढे उभे राहते. आमच्या ग्रामीण कथेतील नायक मारे तमाशातील छबेलीला घेऊन बैलगाडीतून गाणे म्हणत जात असला, तरी प्रत्यक्षात मात्र आपल्याला खेड्यात अस्वच्छता आणि कंटाळवाणा दिनक्रम यांचेच दर्शन होते. पण इंग्लंडसारख्या देशात खेडे आणि शहर यात फक्त लोकसंख्येचाच फरक असतो. आता हेच पाहा ना, जॉर्डन्स या गावची लोकसंख्या फक्त पाचशे आहे आणि गावात घरे फक्त एकशेतीस आहेत. पण गावचे रस्ते निर्मळ, डांबरी आहेत. गावात वीज आहे, टेलिफोन आहे, टेलिव्हिजन आहे, सर्व आधुनिक सुखसोयी आहेत.

आम्ही घरी पोहोचलो, त्यावेळी श्री. लॉसन यांनी माझी आपल्या कुटुंबीयांशी ओळख करून दिली. मेरी लॉसन किंचित् वृद्धावस्थेकडे झुकणाऱ्या पण प्रसन्न होत्या. ख्रिस्तोफर वयाच्या मानाने उंच दिसत होता आणि वयोमानानुसार उत्साहीही होता. त्यांचे घर स्वतंत्र, आटोपशीर, साधे पण सुंदर होते. तळमजल्यावर चार खोल्या आणि वरच्या मजल्यावर दोन खोल्या होत्या. थोडी औपचारिक प्रश्नोत्तरे झाली आणि यजमानीणबाईंनी चहा आणला.

थंडीतून रपेट करून आल्यावर गरम चहाचे घुटके घेताना मौज वाटली. आमच्या खेड्यात थंडीच्या दिवसात सकाळी उठल्यावर उबदार शेकोटी करावी आणि तीत कोवळी कणसे भाजून खावीत, त्याची आठवण झाली. यजमानीणबाईंचे नाव होते मेरी. पंचेचाळिशीच्या वयाची ती कृशा, करुणेचा भाव चेहेऱ्यावर असलेली सालस गृहिणी होती. भारतातील माझे गाव, माझे शिक्षण, लंडनमधील राहण्याचे ठिकाण अशा प्राथमिक माहितीचा जबाब मी दिला. मग लॉसन म्हणाले, ' तासाभरात आमच्या मित्र-मंडळाची

साप्ताहिक बैठक आहे. तिला तुम्ही आलात तर आम्हाला आनंद वाटेल. तोपर्यंत तुम्ही वर तुमच्या खोलीत विश्रांती घ्या.'

तासाभराने मी, लॉसन, मेरी, आणि ख्रिस्तोफर मित्र-मंडळाच्या सभागृहाकडे निघालो. गावात एक भले मोठे पटांगण आहे. ते ओलांडून आम्ही दुसऱ्या टोकाला गेलो. पटांगणाच्या मधोमध नाताळचे झाड सुशोभित करून लावले होते. आमच्यासारखेच अनेकजण मित्र-मंडळाच्या बैठकीसाठी चालले होते. त्या लहानशा गावात मी परकीय पाहुणा जरा वेगळाच दिसत होतो. त्यामुळे माझ्याकडे त्या लोकांचे लक्ष लागणे साहजिक होते. लहान मुले तर 'हू इज् दॅट मॅन ममी?' असे दबलेल्या आवाजात विचारताना आणि त्यांच्या आया त्याहून दबलेल्या आवाजात 'ही इज् ए फारेनर' (तो परकीय आहे) असे त्यांना सांगताना लक्षात येत होते.

जॉर्डन्समध्ये चर्चची जागा या मित्र-मंडळाच्या सभागृहाने घेतलेली आहे. तिला 'फ्रेन्ड्स मीटिंग हाऊस' म्हणतात. मात्र येथे 'फ्रेन्ड्स' या शब्दाचा अर्थ सर्वसाधारणपणे आपण मित्र म्हणतो तो नाही. क्वेकर पंथियांच्या 'सोसायटी ऑफ फ्रेन्ड्स' या नावातील मित्र हा अर्थ येथे लावला पाहिजे. केवळ स्नेहापेक्षा अधिक उदात्त अशा धार्मिक उद्दिष्टांनी हे लोक एकत्र येतात. मात्र चर्चमध्ये धर्मगुरू भाषण करतो, तसे या सभेत कोणी भाषण करीत नाही किंवा उपदेशही करीत नाही.

बरोबर अकरा वाजता सभेला सुरुवात झाली. 'जॉर्डन्स व्हिलेज कमिटी'चे अध्यक्ष हेच सभेचे अध्यक्ष होते. प्रथम सर्वांनी अर्धा तास स्तब्ध उभे राहून आपल्याला वाटेल त्या पद्धतीने मनातल्या मनात प्रार्थना केली. भौतिक विषयाचे विचार सोडून नम्रपणे परमेश्वराचे ध्यान करावे आणि उदात्त वातावरणाशी एकरूप व्हावे हा या प्रार्थनेचा हेतू असतो. कोणी कशी प्रार्थना करावी यावर बंधन नसते. मात्र इतरांना उपद्रव होऊ नये म्हणून ही प्रार्थना मनातच करावयाची असा शिरस्ता असतो. एका लहान खेड्यातील शेदोनशे लोक अर्धा तास स्तब्ध होऊन परमेश्वरचरणी

लीन होतात, हे दृश्य पाहून मी त्या पवित्र वातावरणात तल्लीन झालो. ऐहिक जीवनातील लहानमोठ्या आकर्षणात आणि उपद्रवात आपण सदासर्वकाळ बुडालेलोच असतो, पण त्याहून उच्चतर आणि समाधानी जीवन काही क्षण मिळाले, तर मनाला वाटणारे खोल समाधान आणि सात्त्विक प्रसन्नता किती वेगळी असते, याचा मला अनुभव आला.

प्रार्थना झाल्यावर अध्यक्षांनी सांगितले की, धार्मिक विषयावर कोणाला काही बोलायचे असल्यास त्याने पाच मिनिटे भाषण करावे. ही भाषणे आधी तयार केलेली नसतात. ती त्या त्या वेळी स्फुरलेली असतात. मी ज्या सभेस हजर होतो, त्या सभेत चार जणांनी नाताळ, परमेश्वर, धर्माचे जीवनातील स्थान, इत्यादीवर थोडा वेळ भाषणे केली. त्यानंतर सभा संपली [illegible] यांनी आपल्या मित्रांशी माझी ओळख करून दिली. मग त्यांनी मला सभागृहाजवळची काही थडगी दाखविली. अमेरिकेतील पेन्सिल्व्हानियाची वसाहत स्थापन करणाऱ्या विल्यम पेनचे थडगे तेथे आहे.

विल्यम पेन हा सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात धार्मिक क्षेत्रातील बंडखोर म्हणून प्रसिद्ध होता. ख्रिश्चन धर्मातील अनावश्यक प्रथांविरुद्ध त्याने बंड केले, म्हणून त्याला ऑक्सफर्ड विद्यापीठातून काढून टाकण्यात आले होते. त्यासाठी त्याच्यावर खटलाही भरण्यात आला. पण ज्यूरींनी त्याला निर्दोषी ठरविले म्हणून इंग्लंडचा राजा इतका भडकला की सरकारने या प्रमादाबद्दल ज्यूरीलाच दोषी ठरवून दंड केला व तुरुंगवासाचीही शिक्षा केली! विल्यम पेनच्या वडिलांच्या निधनानंतर त्याच्याकडे मोठ्या इस्टेटीचा वारसा आला. त्याशिवाय इंग्लंडच्या राजाकडे पेनच्या बापाचे सोळा हजार पौंड येणे होते. इंग्लंडमध्ये पेनला धार्मिक बाबतीत त्रास होऊ लागला म्हणून त्याने अमेरिकेस जायचे ठरवले. सोळा हजार पौंड कर्जाच्या मोबदल्यात राजाने त्याला अमेरिकेत जमीन दिली. तेथे जाऊन विल्यम पेनने वसाहत स्थापन केली. तीच आज पेन्सिल्व्हानिया म्हणून प्रसिद्ध आहे.

जॉर्डनच्या सभागृहाच्या आवारात थॉमस एल्वुडचे थडगेही आहे. महाकवी जॉन मिल्टनचा हा मित्र. मिल्टन अंध झाल्यावर एल्वुड त्याला लॅटिन काव्य वाचून दाखवीत असे.

इंग्लंडमधील प्रत्येक खेड्यात अपरिहार्यपणे असलेली ती 'स्मशान-कम्-प्रार्थनाभूमी' पाहून मी, लॉसन व ख्रिस्तोफर गावातील इतर सार्वजनिक ठिकाणांकडे गेलो. गावातील व्यवस्थापक-समितीचे थिएटर पाचसहाशे लोकांना पुरेसे मोठे आहे. त्यात कधीकधी नाटके, चित्रपट, नाच व इतर करमणुकीचे कार्यक्रम होतात. गावचे ग्रंथालय तर मला विशेषच कौतुकास्पद वाटले. भारताविषयी काही पुस्तके त्यात आहेत काय ते मी मुद्दाम पाहिले. भारत, हिमालय, भारतातील गिर्यारोहण इत्यादीविषयी दहाबारा पुस्तके त्या लहानशा खेड्यात पाहून मला सानंदाश्चर्य वाटले. रशिया, अमेरिका, चीन, इंडोनेशिया इत्यादी अनेक राष्ट्रांची माहिती देणारी पुस्तकेही बरीच दिसली. अमेरिकेस प्रथम गेलेल्या लोकांनी तयार केलेल्या नावेचे काही भाग एका शेडमध्ये जपून ठेवलेले होते, ती जागा मला दाखविण्यात आली. मग गावचे पटांगण, व्यवस्थापक समितीची कचेरी, इत्यादी स्थळे पाहून आम्ही घरी परतलो.

जगातली अनेक प्रसिद्ध शहरे मी पाहिली आहेत, पण जॉर्डन्स हे छोटेसे अद्‌भुत गाव आहे हे खरे. एखाद्या परीकथेतील हे गाव वाटते. त्यातील घरे लहानशी, सुशोभित, वृक्षवेलींनी सजलेली आहेत. रस्ते निर्मळ आहेत, लोक अत्यंत सुस्वभावी आहेत आणि गावात सहकार्य एवढे आहे, की जगातले कोणतेही गाव या बाबतीत त्याला मागे टाकू शकणार नाही. कारण हे सबंध खेडे म्हणजेच एक लिमिटेड कंपनी आहे! गेल्या महायुद्धाच्यावेळी क्वेकर पंथीय इंग्रजांना असे वाटले, की एक लहानशीच पण आदर्श वसाहत स्थापन करण्याचा प्रयोग करावा. या पंथातील सर्वच लोक उदात्त धर्मप्रेरणेने एकत्र आले होते. त्यांचे विचार, ध्येये आणि आचार समान होते. त्यांनी 'जॉर्डन्स व्हिलेज लिमिटेड' नावाची सहकारी संस्था

स्थापन केली आणि वीस हजार पौंड (सुमारे पावणेतीन लक्ष रुपये) भांडवल जमा केले. सीअर ग्रीन स्टेशनजवळ तीनशे एकर जमीन या संस्थेने खरेदी केली. स्नेह आणि स्वातंत्र्य ह्या संस्थेच्या मूलभूत प्रेरणा आहेत, म्हणून सामाजिक उन्नती करण्यात आणि राहणीचा दर्जा वाढविण्यात तिला चांगलेच यश मिळाले आहे. या गावाची व्यवस्था पाहण्यासाठी निवडणूक होते. तीत सर्व शेअरहोल्डर्स भाग घेतात. बारा लोकांची समिती निवडली जाते. नगरपालिकेचे व काही प्रमाणात सरकारचेही काम ही व्यवस्थापक-समिती करते. घरे व जमीन यापासून समितीला दरसाल चार हजार पौंड उत्पन्न येते आणि ब्रिटिश सरकारकडून बाराशे पौंड मदत मिळते. त्यामुळे गावचे आरोग्य, शिक्षण, दळणवळण, दिवाबत्ती इत्यादींची उत्तम सोय समितीने ठेवली आहे.

या लहानशा गावातील सार्वजनिक जीवन अतिशय मनोरम आहे. या गावात चर्च नाही हे एक विशेपच आहे. असे दुसरे खेडे खिश्चन धर्माच्या देशात क्वचितच आढळेल. पण धार्मिक कारणाकरिता लोकांना एकत्र येता यावे म्हणून ' फ्रेन्डस् मीटिंग हाऊस 'ची सार्वजनिक इमारत आहे. त्याशिवाय संगीत क्लब, नाट्य-संघ, सोशल क्लब, गार्डन क्लब, क्रिकेट क्लब, यूथ होस्टेल, वाचनालय, रिफरेक्टरी अशा अनेक इतर संघटना आहेत. जगाच्या गलबल्यापासून दूर असूनही शहरातील सांस्कृतिक जीवनाला न मुकण्याची सोय या गावात आहे. लंडनपासून जवळ असल्यामुळे लंडनच्या दैनिकांच्या शहरआवृत्त्या येथे अगदी सकाळी सहा वाजण्यापूर्वीच मिळतात. एखादे प्रचंड प्रदर्शन, जगविख्यात नाटक किंवा चित्रपट, महान् विचारवंतांचे भापण अथवा नामवंत चित्रकारांच्या कलाकृती, नृत्य-संगीताचे खास कार्यक्रम अशांसाठी लंडनचा प्रवास करायचे म्हटले तर तासाभराचे काम आहे. आणि शहरी संस्कृतीच्या कृत्रिमपणापासून दूर राहायचे म्हटले, तर उंचच उंच पाइन वृक्षांच्या राजीत खुशाल मंद डोळे करून सुखाने पहुडलेले जॉर्डन्स हे छोटे गाव आहे. लेखक, चित्रकार, संगीतकार इत्यादी कलावंतांना

असे गाव म्हणजे वरदानच आहे. निदान, मला तरी मुंबईसारख्या शहरात राहण्याऐवजी दोन संस्कृतीतील उत्तमोत्तम फलांचा लाभ देणारे असे सर्व सोयीचे खेडे अतिशय आवडते.

नाताळच्या सणात 'बॉक्सिंग डे' म्हणून एक दिवस असतो. हाही सार्वजनिक सुट्टीचा दिवस असतो. त्या दिवशी वनभोजनासाठी, सहलीसाठी, खेळासाठी किंवा फिरण्यासाठी घराबाहेर पडण्याचा प्रघात आहे. त्या नाताळात त्या दिवशी संध्याकाळी मी, लॉसन आणि सौ. लॉसन जॉर्डन्सपासून दोन मैलांवर असलेल्या सेंट जॉईल्स गावी फिरायला गेलो. लंडन शहरात प्लेगचा प्रादुर्भाव झाला, तेव्हा महाकवी जॉन मिल्टन या लहानशा गावात राहिला होता. जगप्रसिद्ध 'पॅराडाइज् लॉस्ट'चा काही भाग त्याने येथेच लिहिला. त्या महाकवीच्या सहवासाने पुनीत झालेले ते खेडे अगदी साधे, नम्र होते-महान् लोकांच्या व्यक्तिमत्वासारखेच. मिल्टन ज्या घरात राहत होता, त्यातच त्याच्या काही वस्तूंचा आणि हस्तलिखितांचा संग्रह आहे. तो इतर दिवशी लोकांना पाहायला खुला असतो, पण त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्याने तो बंद होता.

आम्ही येताना बसबधून आलो. कारण जातानाच्या रपेटीनेच आम्ही चांगले दमलो होतो. घरी आल्यावर सौ. लॉसन यांनी खास नाताळसाठी तयार केलेला मोठा केक कापला. त्याचे सारखे तुकडे केले. लॉसन, ख्रिस्तोफर, मी व मेरी यांनी ते घेतले. खाण्यापूर्वी आम्ही प्रार्थना केली आणि आता केकचा लचका तोडणार, तोच मेरी लॉसन म्हणाल्या, 'जरा जपून हं! या केकमधे 'लकी' नाणी आहेत. ज्याच्या वाट्यात नाणे येईल तो नशीबवान असतो.' ही ख्रिश्चनांच्या नाताळमधील एक परंपरा आहे. एखाद्या मोठ्या केकमधे एखादेच नाणे असले, आणि दहावीस जणांपैकी ते एखाद्याच्याच वाट्याला आले तर त्या परंपरेप्रमाणे तो भाग्यवान् म्हणता येईल. पण आम्ही केक खाताना लॉसन म्हणाले, 'अरे व्वा:! माझ्या केकमधे नाणे सापडले.' आम्ही त्यांचे अभिनंदन करतो आहोत

तोच माझ्या दातांना कच्कन् काहीतरी लागले आणि मीही नाणे सापडल्याचे जाहीर केले. इतकेच नव्हे, तर उरलेल्या दोघांनाही एक एक नाणे सापडले! आम्ही सर्वांनी आमची 'भाग्यवान' नाणी जपून ठेवली. आदर्श गृहिणी म्हणून सौ. लॉसन यांनी केकच्या प्रत्येक तुकड्यात नाणे सापडावे अशी व्यवस्था आधीच केली होती, हे उघड होते.

लॉसन दांपत्याला भारताबद्दल खूपच उत्सुकता होती. भारतातील जाती, विवाहाची पद्धत, जादू आणि जादूगारांची रोप-ट्रिक, शिक्षण, इत्यादी अनेक बाबतीत ती दोघे प्रश्न विचारीत आणि माझ्या मगदुराप्रमाणे मी उत्तरे देत असे. क्वेकर पंथ आणि त्याचे कार्य याबद्दल मीही माहिती घेण्याचा प्रयत्न करीत असे. ते लहानसे कुटुंब आपल्या लहानशा जगात सुखी होते.-किंवा त्यांचे जग लहान होते असे तरी कसे म्हणता येईल? त्यांना हजारो योजनांवरील भारतातील सामाजिक परिस्थितीबद्दल कळकळ होती आणि जगातील सर्व धर्मपंथांबद्दल आस्था वाटत होती. त्यांचे जग प्रचंड घडामोडीचे, धावपळीचे, गजबजाटाचे आणि झगमगाटाचे नसेल, पण ते विशाल, शांत आणि समाधानी होते, हेवा वाटण्यासारखे होते.

रोज सकाळी श्री. लॉसन मला हाक मारीत. मग आम्ही पहिला चहा घेऊन फिरायला जात असू. दीड-दोन मैलांची झाडा-वनातून केलेली ती सफर मोठी उत्साहवर्धक असे. मात्र तीमुळे थकवा येणार नाही एवढीच मर्यादा आम्ही ठेवीत असू. या रपेटीनंतर घरी येऊन ब्रेकफास्ट व्हायचा. मग मी काही वाचीत किंवा लिहीत बसे आणि लॉसन आपली कामे करीत. जेवणापूर्वी आम्ही थोड्या गप्पा मारीत असू. जेवणानंतर थोडी विश्रांती, मग चहा, नंतर लिहिणे-वाचणे, संध्याकाळी मोकळ्या हवेत खुशाल फिरावे आणि रात्री जेवणानंतर थोडा वादसंवाद झाल्यावर झोपावे, असा आमचा संथ पण सुखी कार्यक्रम चालला होता

पण माऱ्याच सुखाप्रमाणे त्याही सुखाला अखेर होतीच. माझा मुक्काम सपला आणि सात्त्विक समाधानाचे आकंठ पान करून मी लॉसन कुटुंबाचा

निरोप घेतला. जॉर्डन्सहून परत निघताना मला वाटले, अजून सुट्टी तर खूपच आहे. जाता जाता त्या भागातील एकदोन प्रसिद्ध गावे पाहून तर जावे. या विचाराने मी जॉर्डन्सहून बीकन्सफील्ड या गावी गेलो. इंग्लंडच्या इतिहासातील अतिशय गाजलेला नेता, वक्ता आणि लेखक एडमंड बर्क याचे हे गाव. त्याचे घर अजून चांगल्या स्थितीत राखून ठेवले असून बर्कच्या आठवणींच्या अनेक वस्तू, हस्तलिखिते, पुस्तके वगैरे येथे ठेवली आहेत, असे मी त्या भागाच्या मार्गदर्शक पुस्तिकेत वाचले होते. मोठ्या माणसांचा सहवास आपल्या नशिबी नाही, तर निदान मोठ्या माणसांच्या घराची हवा तरी चाखावी, म्हणून मी बीकन्सफील्डला उतरलो. हातात एक जड बॅग होती. बर्कच्या घराचा पत्ता मला माहीत नव्हता. पण मला वाटले, की बर्कसारख्या जगविख्यात माणसाचा अभिमान बीकन्सफील्डच्या प्रत्येक नागरिकाला असणारच. बरे, हे गाव म्हणजे काही लंडन शहरासारखे अवाढव्य नाही. तेव्हा बर्कचे घर सापडणे काही कठीण नाही.

स्टेशनमधून बाहेर पडल्यावर साठीच्या सुमाराचा एक इंग्रज दिसला. त्याला थांबवून व त्याची क्षमा मागून मी म्हटले, "बर्कचं घर कुठं आहे मला कृपा करून सांगाल काय?"

तो विचार करीत म्हणाला, 'बर्क? त्यानं तुम्हाला पत्ता काय दिला आहे?'

बर्क म्हणजे माझा कोणीतरी जिवलग मित्र असावा अशी त्याची समजूत झाली होती. मी म्हटले, "पत्ता काही माहीत नाही. पण तो इथं सर्वांना माहीत-'

"छे: छे:! तुम्ही नीट पत्ता विचारायला हवा होतात."

"म्हणजे? मला तो भेटला नाही. एडमंड बर्क-इंग्लंडचा सुप्रसिद्ध वक्ता आणि तत्त्ववेत्ता-"

"आय थिंक ही इज् डेड." (मला वाटतं, तो मरण पावला असावा.) त्याने मला शांतपणे इंग्रज माणसाच्या सभ्यपणाने उत्तर दिले. "अर्थातच

मला त्याचा पत्ता माहीत नाही." असे म्हणून तो आपल्या कामाला निघून गेला.

मग बरीच शोधाशोध केल्यावर कळले की, बर्कचे घर शहराच्या मध्यवस्तीपासून जरा दूरच आहे, आणि त्या दिवशी रविवार असल्याने ते खुले नाही. थोरामोठ्यांच्या घराचेही दर्शन आपल्या नशिबी नाही, म्हणून मी परतलो. आता रेल्वेने जाण्यापेक्षा बसने जावे असा विचार केला. त्या भागातील माहितीचे पुस्तक पाहिले. हायविकुंब नावाचे गाव मोठे इतिहासप्रसिद्ध आहे, असे मत त्या पुस्तकाच्या कर्त्याने व्यक्त केले होते. इंग्लंडचे पंतप्रधान बेन्जामिन डिझरेली यांनी या गावात वास्तव्य केले होते. आणि तेथून जवळच त्यांचे थडगेही होते. या गावचे चर्च आठनऊशे वर्षांचे जुने होते म्हणे. तेव्हा या माहितीचा लाभ उठवावा म्हणून मी बसने हायविकुंबला गेलो.

हायविकुंब येईपर्यंत पावसाची रिपरिप सुरू झाली होती. पाऊस काही मोठा नव्हता, पण कंटाळवाणा आणि भोवतीचे वातावरण उदास करणारा होता. थोड्या वेळाने पाऊस थांबला, पण ओल आणि चिकचिक काही थांबली नाही. त्यावेळी साधारण अकरा वाजण्याचा सुमार होता. चहा पिण्याची तल्लफ आली होती. पण चहा मिळणार कोठे? इंग्लंडमधील लहान गावात चहाची दुकाने अगदी तुरळक असतात. आणि रविवार असल्याने तीही आज बंद होती तरीही एका बंद घरावर 'Ye olde tea shoppe' अशी प्राचीन इंग्रजीतील पाटी दिसली, तेव्हा मी कपडे जरा व्यवस्थित केले आणि दार उघडण्यासाठी घंटेचे बटन शोधू लागलो. पण विजेचे बटण नव्हते. एका खिळ्याला बांधलेली दोरी दिसली. अर्थात् आपल्याकडे देवळात असतात, तशी लहानशी घंटा आत असावी, असा अंदाज मी केला. मला वाटले, प्राचीन इंग्रजी नाव धारण करणाऱ्या हॉटेलला विजेची घंटा बसविणे योग्य नव्हेच. त्यात अशीच-सुप्रसिद्ध घोड्याने घंटा वाजवून न्यायाची मागणी केली त्या गोष्टीतील घंटेसारखी-न्यायाची जुनी

घंटा पाहिजे. मी दोरी ओढली.

एका वृद्ध इंग्रज बाईने दार उघडले. मी चाचरत म्हटले, "मला चहा मिळेल का?"

तिने नम्रपणे पण स्पष्टपणे सांगितले, "नाही. माफ करा. आज दुकान बंद आहे."

एका अर्थी मलाही न्यायच मिळाला. कारण सुट्टीच्या दिवशी तिने चहा दिला असता, तरच इंग्लंडच्या परंपरेवर अन्याय झाला असता! आमच्या पुस्तकाच्या मार्गदर्शकाने म्हटले होते की, हायविकुंब शहरातील इतिहासप्रसिद्ध चर्च एका टेकडीवर आहे. या चर्चचा भेदक इतिहास आणि त्या चर्चच्या आवारात पुरलेल्या थोर थोर माणसांची यादीही त्याने दिली होती. मी विचार केला, बर्कच्या घराचा नसेना का, पण इतक्या थोर थोर माणसांच्या थडग्यांचा तरी सहवास घ्यावा.

टेकडीच्या पायथ्याशी गेलो, तेव्हा हा उत्साह जरा कमीच झाला. हातात बॅग होती. टेकडी उंच, ओलसर, निसरडी आणि अगदी निर्जनही होती. गेले तीन तास पोटात काही गेले नव्हते, थोरामोठ्यांच्या थडग्यांचा सहवास घेण्यासाठी ही काही आदर्श शारीरिक आणि मानसिक अवस्था नव्हती. पण म्हटले, हिंदुस्थानला परत गेल्यावर जर कोणी विचारले, "इतकं तुम्ही पाहिलं म्हणता, तर काय हो, हायविकुंब गावच्या टेकडीवरचं ते इतिहासप्रसिद्ध चर्च पाहिलंत काय?" तर या प्रश्नाला नकारार्थी उत्तर देऊन मान खाली घालण्याचा प्रसंग यायला नको. नाहीतरी बरेचसे लोक प्रवासातील गंमत आणि अनुभव घेण्यापेक्षा त्याचे वर्णन नंतर लिहिता येईल, इकडे नजर ठेवूनच प्रवासाच्या खस्ता खातात. तेव्हा आपणही जरा व्यावसायिक प्रवासी व्हायला काय हरकत आहे?

हो-ना करता करता अखेर टेकडी चढायला सुरुवात केली. चार वेळा बॅग पडत असताना आणि दोन वेळा बॅगधारक पडत असताना सावरले. टेकडी निर्जन असल्याबद्दल तेव्हा मात्र आनंद झाला. तासाभराच्या

खटाटोपानंतर चर्चपाशी आलो. इंग्लंडमधील कोणत्याही खेड्यातील कोणत्याही चर्चसारखेच ते होते. इतकेच नव्हे, तर ते अधिकच ओसाड, भयाण दिसत होते. चर्चचे दार ढकलून पाहिले. आत चिंटपाखरूही नव्हते. आतील भकास्पणा एवढा मोठा होता, की मला आत प्रवेश करावासाही वाटला नाही. दार ओढून आजूबाजूला पाहिले. सगळ्या स्मशानभूमीप्रमाणे लहानमोठे दगड जमिनीबाहेर आले होते. त्यावर मृतांची नावे, जन्म-मृत्यूच्या तारखा, क्वचित् एखाद्या कवितेच्या किंवा बायबलमधील एकदोन ओळी होत्या.

चर्चच्या पायरीवर बसलो. वाटले, इतकी उंच टेकडी चढून कशाला आलो असेन मी? या खटाटोपाची व्यर्थता पूर्वीच माझ्या ध्यानी यायला नको होती का? पण अचानक कुठेतरी काही भव्य दिव्य दिसेल, या आशेने वर आलो झाले. मला फसवून इतका त्रास देणारे ते पुस्तक लायब्ररीचे होते आणि रागाच्या पायी आणखी दहा शिलिंग घालविण्याचा मूर्खपणा करण्यात काही अर्थ नाही असा विचार करून मी टेकडी उतरू लागलो. निसरड्या टेकडीवर चढण्यापेक्षा उतरणेच कठीण आहे, याचा त्यावेळी पुन: प्रत्यय आला. पण साहित्यातील पुन:प्रत्ययासारखा तो काही आनंददायक ठरला नाही.

खाली येईतो पावसाचे तुरळक थेंब झिरपू लागले. इंग्लंडमध्ये आपल्याकडच्या पावसासारखा धो धो पाऊस बहुधा केव्हाच पडत नाही. पण कुरकुऱ्या बायकोसारखा तो बहुतेक सर्वकाळ चिरचिरत असतो. म्हणून माझ्याकडे छत्री नसली तरी वॉटरप्रुफ हॅट आणि जाड ओव्हरकोट यावर निभावून नेता येत होते. पण भुकेपासून रक्षण करण्याकरता त्यांचा काही उपयोग नव्हता. म्हणून एखादे उपाहारगृह उघडे आहे की काय हे मी पाहू लागलो. एका मोठ्या हॉटेलच्या नोटिसा बाहेरच्या काचेच्या फलकात लावल्या होत्या. त्यातील एका नोटिशीत म्हटले होते: 'रोटरी क्लबची मासिक जेवणाची बैठक रविवारी दुपारी दीड वाजता.' माझ्या मनात आले,

रोटरी क्लबला-निदान-जेवणासाठी-हजर राहायला काय हरकत आहे? नाही तरी मी पत्रकार म्हणून चक्क भाषणही केले होते. मग या बैठकीत हजर राहून इंग्लंड व भारत या दोन देशांतील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्यास-आणि जेवणावर ताव मारण्यास काय हरकत आहे?

पण माझ्याने ते सांस्कृतिक विकास करण्याचे धाडस झाले नाही हे खरे. (भारतमाता मला त्याबद्दल क्षमा करो!) माझे कपडे प्रवासातले होते. भिजलेले होते. हातात बॅग असल्याने रोटरीच्या ध्येयापेक्षा मला 'वदनिकवल' घेण्याची जास्त आच आहे असे लक्षात येण्याची शक्यता होती. 'Service above self' असे ध्येयवाक्य घोषित करणाऱ्या त्या उच्चभ्रूंना माझे पळीपंचपात्र घेऊन अनाहूतपणे भोजनास उपस्थित राहणे कितपत आवडले असते कुणास ठाऊक! म्हणून मोफत जेवण काढण्याचा विचार रहित करून आदिमानवाप्रमाणे स्वतःच आपल्या अन्नाचा शोध घेण्याचा मी निश्चय केला. कारण जेथे ती जेवणाची बैठक होती, ते हॉटेलही इतरांना त्या दिवशी बंदच होते.

हायविकुंबच्या मेनस्ट्रीटवरून फिरताना एका लहानशा रस्त्याकडे लोकांची गर्दी जाताना दिसली. लांबून पाहिले तो एका चित्रपटगृहावरची निऑन साइनची लाल अक्षरे लखलखत होती. त्याच्याजवळ, निदान आत तरी, कांही खाद्यपदार्थ किंवा चहापाणी मिळेल, म्हणून तिकडे गेलो. त्यासाठी लागल्यास सिनेमा पाहण्याचीही आता माझी तयारी होती. सुदैवाने चित्रपट गृहाजवळच एक चहाचे छोटेसे दुकान उघडे होते. आत जाऊन विक्रेत्या बाईला विचारले, "प्लीज, मला चहा मिळेल का?" ती म्हणाली, "होय. पण फक्त चहाच मिळतो." मी काकडीलाही राजी होतो. त्या बाईने तिशी ओलांडली होती. ती एकटीच ते हॉटेल चालवीत होती आणि मधल्या भिंतीपलीकडेच ती राहतही होती. माझ्या टेबलावर चहा ठेवून ती म्हणाली, "सिक्स पेन्स प्लीज." मी पैसे दिले आणि चहाचा पहिलाच मोठा घुटका गप्कन् गिळून म्हटले, "तुमचा विश्वास बसणार नाही, पण सकाळी

आठनंतर मी हा पहिलाच चहा घेतो आहे." ती दयार्द्र बुद्धीने म्हणाली, "म्हणजे तुम्ही जेवलासुद्धा नाही का? तुम्ही कोणत्या देशाचे?" मी सांगितले, "मी भारताचा लंडनला मी शिकतो. आज रविवार असल्यामुळे मला कुठंच काही मिळालं नाही." ती आईच्या मायेनं म्हणाली, "असं का? थांबा तर. आम्ही आज इथं दुकानात चहाशिवाय काही विकत नाही. पण मी इथंच राहते. घरातलं मी काहीतरी आणते. तुम्हाला सँडविच चालेल का?"

तिने आत जाऊन अंड्यांची दोन सँडविचेस् आणली. आणि माझ्या त्या दिवसाचा फार मोठा प्रश्न निकालात निघाला. इंग्रज माणसांच्या सहज-सुंदर चांगुलपणाचे असे अनेक हृद्य प्रसंग माझ्या मनात घर करून राहिले आहेत. अशा प्रसंगांची आठवण करीतच मी बसस्टॉप गाठला. ग्रीन लाईनच्या बसेस् या मार्गाने जात असत. आता अधिक प्रवासाची आणि साहसाची हाव न धरता सरळ लंडन गाठावे असा विचार मी केला होता. अर्ध्या तासातच हिरवी बस आली आणि मी लंडनला गेलो. मुंबईसारखेच लंडन शहरही माणसाला घेरते. गेले काही दिवस मी निवांतपणे घालविले होते. पण लंडन मध्ये शिरताशिरताच नवा सिनेमा कोणता आहे, एखादे मोठे प्रदर्शन येते आहे का, ओल्ड व्हिकमध्ये कोणते नाटक चालले आहे, याचा शोध मी घेऊ लागलो. लंडनची गर्दी, घाई, अस्वस्थता आणि अशांतता पुन्हा सुरू झाली. जीवनाच्या प्रवासात मी क्षणभर थांबून प्रशांत संध्याकाळ पाहिली होती, तिची आठवण अस्पष्ट होऊन दैनंदिन जीवनाला पुन: गती मिळाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४८
२९८९८
संदर्भ शाखा

◇ ◇ ◇ ◇

REFBK 0026898
REFBK-0026898

## आमची नवीन पुस्तके

● **भाल पाटील**
स्त्री जन्मा

● **डॉ. यु.म. पठाण**
पाऊल खुणा

● **सौ. शुभदा शहा**
बिंदा, साविया आणि

● **सुहास शिरवळकर**
क्षितिज

● **कुमुदिनी रांगणेकर**
लग्नाविना पत्नी

● **अरूण हरकारे**
काळोखी रात्र

● **नयनतारा देसाई**
पराक्रमाची शर्थ जाहली

**समीक्षा आणि वैचारिक**

● **डॉ. अश्विनी धोंगडे**
स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन

● **डॉ. वसंत डोळस**
दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप



## रमेश मंत्री यांचे
## आम्ही प्रकाशित केलेले साहित्य

★ चोरांचा सौजन्य सप्ताह
★ एक हाती टाळी
★ मी मंत्री झालो
★ थंडीचे दिवस
★ वाटाण्याच्या अक्षता
★ आपलेच दात आणि दुसऱ्याचे ओठ
★ खसखशीचा मळा
★ बायको रिटायर होते
★ रविवारचं नाटक
★ पंतप्रधानांची छत्री
★ हसवाहसवी

**दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.**

२५१ क. शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०

कव्हर छपाई विनायक आर्टस् पुणे ३०.